**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ.शी.**: भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयक

**मु.शी.**: L.A. BILL NO XLII OF 2009

( A BILL TO FACILITATE AND ENSURE SUSTAINABLE, EQUITABLE AND ADEQUATE SUPPLY OF GROUNDWATER OF PRESCRIBED QUALITY, FOR VARIOUS CATEGORY OF USERS, THROUGH SUPPLY AND DEMAND MANAGEMENT MEASURES, PROTECTING PUBLIC DRINKING WATER SOURCES AND TO ESTABLISH THE STATE GROUNDWATER AUTHORITY AND DISTRICT LEVEL AUTHORITIES TO MANAGE AND TO REGULATE, WITH COMMUNITY PARTICIPATION, THE EXPLOITATION OF GROUNDWATER WITHIN THE STATE OF MAHARASHTRA; AND MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

( विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन: प्रस्तुत करण्यात आला )

**तालिका सभापती** : या विधेयकावर सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विधेयकावर मला बोलावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चा चालू आहे आणि आज एक तास सुध्दा पुरेल असे काही नाही.

प्रा. लक्ष्मण ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 42 - महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयकावरील संयुक्त समितीच्या अहवालाच्या प्रती नागपूरच्या अधिवेशनात दिनांक 13 डिसेंबर, 2011 रोजी वितरित केल्या होत्या त्यामुळे उद्देश व कारणे पुन्हा नव्याने देण्याची गरज नाही असे कार्यालयाला वाटले त्यामुळे काल सन्माननीय सदस्यांना ते परत देणे किंवा उद्देश व कारणासह ते पोहोचविणे शक्य झाले नाही. म्हणून आज सकाळी 10.00 वाजता पुन्हा ते सादर करावे असे म्हणत असताना त्या सर्व दुरुस्त्यांसह हे विधेयक आम्ही सभागृहासमोर ठेवलेले आहे. त्यातील उद्देश व कारणाचे एक पान मी वाचून दाखवितो.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

प्रा. लक्ष्मण ढोबळे ...

**"उद्देश व कारणे यांचे निवेदन**

सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे व त्याच्याशी संबंधित आणि तदानुषंगिक बाबी यांसाठी भूजलाच्या समुपयोजनाचे विनियमन करण्यासाठी, महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, 1993 ( 1993 चा महा. 28) अधिनियमित करण्यात आला होता. तथापि, उक्त अधिनियमामध्ये भूजलाच्या स्त्रोतांसाठी सामूहिक सहभागाची आणि त्याच्या प्रभावी व्यवस्थापनाची तरतूद करण्यात आली नव्हती. 1993 च्या विद्यमान उक्त भूजल अधिनियमामधील त्रुटी व मर्यादा दूर करण्यासाठी आणि एका बाजूला पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करण्याच्या दृष्टीने, विनियामक व प्रागतिक उपाययोजना यांमध्ये समतोल राखण्याकरिता आणि दुसऱ्या बाजूला, वर्धनक्षमरितीने सिंचन क्षमतेच्या आधारे भूजलाच्या इष्टतम उपाययोजनेस चालना देण्यासाठी, शासनाने, महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम, 1993 निरसित करण्याचे आणि,---

(एक) वापरकर्त्यांच्या विधि प्रवर्गासाठी विहित दर्जाच्या भूजलाचा कायम व पुरेसा पुरवठा सुकर करणे व पुरवठा होत असल्याची खातरजमा करणे ;

(दोन) पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे ;

(तीन) भूजलाच्या स्त्रोतांचे संवर्धन करणे आणि भूजलाचे पुनर्भरण व समुपयोजन यांच्यात समतोल राखला जात असण्याची खातरजमा करणे ;

(चार) नियामक यंत्रणा अधिक प्रभावी करणे आणि अति समुपयोजन व पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या पाणलोट क्षेत्रांमध्ये भूजलाचे व्यवस्थापन करणे ;

(पाच) नियोजन तसेच कार्यान्वयन या दोन्ही पातळ्यांवरील सामूहिक सहभागाची खातरजमा करण्यासाठी संस्थात्मक चौकट तयार करण्याची तरतूद करणे ;

(सहा) ग्रामीण क्षेत्रांतील शासकीय योजनांची परस्परव्यापी तफावत टाळण्यासाठी व त्यांचा अधिकतम लाभ मिळविण्यासाठी आणि राज्यातील पाणीपुरवठा पध्दतीला सहाय्यभूत ठरेल अशारीतीने भूजलाच्या पातळीत वाढ करण्यासाठी पावसाचे पाणी साठवण्याची यंत्रणा तसेच

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे ....

छपरावर पावसाचे पाणी साठवण्याची यंत्रणा यांसारख्या शहरी क्षेत्रातील भूजलाच्या प्रश्नांवर देखील भर देण्यासाठी मंचाची स्थापना करणे,

यासाठी नवीन कायदा अधिनियमित करण्याचे ठरविले आहे.

2. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे."

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे म्हणजे आदरणीय मंत्री महोदयांच्या मी लक्षात आणून देतो की, आपल्या खात्याच्या संदर्भात ज्या काही त्रुटी असतात त्या दाखविणे हे विरोधी पक्षाचे कामच आहे. ते योग्य की अयोग्य हे सरकारने ठरवावयाचे असते. सभापती महोदय, आपण या संदर्भात स्पष्ट निदेश दिले होते. त्यामुळे मंत्री महोदयांनी आज या विधेयकाची उद्देश व कारणे सभागृहाला सादर केली आहेत. हा संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल सभागृहाला सादर केलेला आहे. त्यातील पहिल्या पाच पानांवर मंत्री महोदयांच्या सहीसहित निवेदनही सादर केलेले आहे. त्यामुळे या विधेयकाचा मूळ उद्देश अस्तित्वात राहिला नाही. त्या मूळ उद्देशामध्ये आमूलाग्र बदल करुन संयुक्त समितीमध्ये कोणता निर्णय घेतला आहे त्याबाबतची पाच पाने मंत्री महोदयांच्या सहीनिशी सादर केलेली आहेत. त्यानंतर सुधारित विधेयक त्यामध्ये दिलेले आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी आज उद्देश व कारणे वाचून दाखविली आहेत ते आज अस्तित्वात नाही. त्यात बदल झालेला आहे. बदल झालेले विधेयक निवेदनासहित सभागृहासमोर आलेले आहे. माननीय सभापतींनी निर्देश दिल्यानंतर मंत्री महोदयांनी आज खुलासा करणे अयोग्य होते. अशा प्रकारची प्रथा योग्य नाही. विधिमंडळामध्ये कायदेविषयक अशी प्रथा नाही. कायदेविषयक ज्या पध्दती आहेत त्याच अवलंबवाव्या लागतात. मला काय वाटते, त्यांना काय वाटते आणि माननीय सभापतींना काय वाटते याबाबत कोणालाही चॉईस नसतो. आम्ही मंत्री महोदयांना भुरळ घातली आणि त्याला आपण बळी पडलात. हे बरोबर झाले नाही.

मंत्री महोदयांना असे वाटले होते की, विधानसभेच्या माजी अध्यक्षांनी यासंबंधी मुद्दा उपस्थित केला असल्यामुळे तो बरोबर आहे. परंतु मी सुरुवातीलाच हा अहवाल पाहिला होता. पण पक्षीय दबाव काम करण्यास कसे भाग पाडतो त्याचे उत्कृष्ट उदाहरण आम्ही आज पाहिले आहे. कायद्याच्या कृतीमध्ये अशा गोष्टी घडता कामा नयेत. मंत्री महोदयांनी आपल्या मनाचा मोठेपणा दाखवून आज उद्देश व कारणे वाचून दाखविली आहेत. परंतु ते बरोबर नाही. ते कायद्याच्या तरतुदीमध्ये बसत नसल्यामुळे आपण सचिवांचा सल्ला घेऊन सभागृहाच्या कामकाजातून ते काढून टाकावे, असे माझे मत आहे. आपण त्याप्रमाणे करावे अशी मी विनंती करतो. मी आज सभागृहात आल्याबरोबर कालची प्रक्रिया बरोबर होती असे मंत्री महोदयांना सांगितले होते. तरीही त्यांनी आग्रह धरल्यामुळे मी आज बोलण्यासाठी उभा राहिलो आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, हे विधेयक चिकित्सा समितीकडे जाऊन आलेले आहे. चिकित्सा समितीमध्ये काही त्रुटी राहिल्या आहेत असे आम्हाला वाटल्याने आम्ही चर्चा करीत आहोत. या समितीच्या कामकाजाबाबत आमची तक्रार नाही. हे विधेयक मंजूर करणे आमच्यावर बंधनकारक आहे. या विधेयकामध्ये कोणतीही त्रुटी राहिली तर शासनाला भविष्यात पुन्हा दुरुस्ती विधेयक आणावे लागू नये असा आमचा उद्देश आहे. चिकित्सा समितीकडे विधेयक जाऊन आल्यावर सभागृहात फारशी चर्चा केली जात नाही.

सभापती महोदय, प्रत्येक व्यक्तीला पाण्याशिवाय जगता येत नाही, लोकांना पाणी देऊनच जगवावे लागते. या भूतलावर किडे मुंग्यासहित जी काही सजीव सृष्टी आहे ती पाण्याशिवाय जगू शकत नाही, म्हणून पाणी मिळालेच पाहिजे. ही या विधेयकातील तरतूद आहे. त्यामुळे आम्ही या विधेयकाबाबत जे मत प्रदर्शित करीत आहोत ते कोणाच्याही विरोधात नाही. मंत्री महोदय श्री.लक्ष्मणराव ढोबळे हे याबाबत विचार करतील याची आम्हाला खात्री आहे. कामकाज रेटून नेण्याची त्यांची पध्दत नाही. दुसऱ्यांच्या संवेदना जाणून घेण्याची त्यांच्यात क्षमता आहे, या सभागृहाच्या संवेदनांचा ते आदर करतील आणि या विधेयकात भविष्यात जर एखादी त्रुटी आढळली तर ते अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करतील. त्याबाबत योग्य तो न्याय देतील. या विधेयकावरील चर्चा एक तासापेक्षा अधिक लांबली तरी चालेल. कारण महाराष्ट्रातील मूलभूत विषयाबाबतचे हे विधेयक आहे. महाराष्ट्रात सर्वांचा आक्रोश आहे. हा पाण्याचा आक्रोश आहे, शेतीच्या पाण्याचा असेल, पिण्याच्या पाण्याचा असेल, उद्योगाचा असेल. पाणी नसेल तर कोणताही देश उभाच राहू शकत नाही. म्हणून या विधेयकासंबंधी चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, या अधिवेशनाच्या पहिल्याच आठवडयामध्ये आम्ही टंचाईच्या विषयासंबंधी चर्चा केली आहे. राज्यातील भ्रष्टाचाराचा विषय आम्ही घेतला नाही. विरोधी पक्षातील सदस्यांनी भ्रष्टाचाराला महत्व देऊन आघाडी सरकारला अडचणीत आणावे असे मला व्यक्तिश: वाटले नाही, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनाही वाटले नाही. आम्ही एकत्र बसून लोकांच्या जीवनमरणाचे प्रश्न या सभागृहात सोडविण्याचा निर्णय घेतला. लोकांच्या प्रश्नांना प्राथम्यक्रम देण्याचे आम्ही दोघांनी ठरविले. भ्रष्टाचाऱ्यांनी जे खाल्ले आहे ते आम्हाला कधीही बाहेर काढता येते.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

जे लुटले ते लुटले, ते कधी तरी सांगता येते. पण लोकांच्या जीवन मरणाचा प्रश्न जो ऐरणीवर आलेला आहे तो धसास लावणे महत्वाचे होते म्हणून त्या प्रश्नाबाबत प्रथम सभागृहामध्ये चर्चा केली. म्हणून पक्षाचा आणि सरकारचा विषय न करता शेतक-यांच्या प्रश्नावर, लोकांना मिळावयाच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर, दुष्काळावर चर्चा केली. पत्रकार बोलत होते की इतर विषयावर विरोधी पक्ष आवाज उठवत नाही. आम्ही या ठिकाणी सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी येतो. सर्वसामान्य माणसांचे ऐरणीवरचे प्रश्न पहिल्यांदा चर्चिले गेले पाहिजेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांची देखील हीच भूमिका होती म्हणून आम्ही दुष्काळाचा प्रश्न धसास लावला . या ठिकाणी महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) विधेयकाच्या संयुक्त समितीचा अहवाल मांडलेला आहे. या अहवालातील पृष्ठ क्रमांक 14 वरील कलम 26 संबंधी चर्चा झाली. त्यामध्ये समितीने योग्य तो बदल केलेला आहे. मला या निमित्ताने ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणावयाची आहे की, जेव्हा आपण विहीर बंद करण्याची कृती करतो त्यावेळी आपण न कळत कुणाला तरी अवमानित करीत असतो. ती चूक आहे असे मी म्हणणार नाही.

या विधेयकाच्या संदर्भात नेमण्यात आलेली संयुक्त समिती अभ्यास करण्यासाठी राजस्थानला गेली होती. राजस्थानमध्ये कोणकोणत्या गोष्टींचा अभ्यास केला, ज्या ज्या गोष्टी पाहिल्या, त्या गोष्टींचे कौतुक मंत्री महोदयांनी आम्हाला सांगितले. त्यांनी जे जे काही सांगितले त्या बद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्या राजस्थान सरकारने स्फूर्ती कोणाकडून घेतली ? तर ज्या महाराष्ट्रामध्ये अशा स्वरुपाचे मूलभूत काम झाले त्या महाराष्ट्रातील श्री. अण्णा हजारे यांच्याकडून स्फूर्ती घेतली. श्री. अण्णा हजारे यांनी त्यांच्या राळेगण सिध्दीमध्ये ग्रामीण विकासाची सृष्टी निर्माण करण्याचे काम केले. आमची श्री. अण्णा हजारेबद्दल एकच तक्रार आहे आणि ती म्हणजे ते एकच गाव आणि मंदिर घेऊन बसले. एक-एक, दोन-दोन वर्षानी त्यांनी अशा प्रकारे एकेक गाव विकासासाठी घेतले असते तर आतापर्यन्त 20-30 गावे श्री. अण्णा हजारेंच्या नावाने नावारुपाला आली असती, त्या गावांचे भले झाले असते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, पाणलोट क्षेत्र विकास कसा करावा यासंबंधीचे हे विधेयक आहे. श्री.अण्णा हजारेंची मूलभूत संकल्पना राजस्थानामध्ये राबविण्यात आली. आपल्या महाराष्ट्रामध्येही जागतिक कीर्तिचे जल तज्ज्ञ आहेत. जगाच्या पातळीवर अमेरिकेपासून कोणत्याही देशामध्ये पिण्याच्या पाण्याच्या नियोजनाचा प्रश्न आला की त्या बाबतीत मार्गदर्शन घेण्यासाठी श्री.माधवराव चितळेंना बोलावले जाते. श्री. माधवराव चितळे हे आमच्या मराठवाड्यातील आहेत. आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो. या चितळेसाहेबांनी या संयुक्त समिती समोर येऊन आपले मत दिले. विविध तज्ज्ञांना समितीने बोलावलेले होते. पाण्याच्या संदर्भात वाल्मिने परिषद घेतली. त्या परिषदेचे 5 व्हॉल्यूम प्रसिध्द झालेले आहेत. सर्वांना ते वितरित करण्यात आलेले आहेत. प्रत्येकाने ते आवर्जून वाचले पाहिजेत. श्री. माधवराव चितळे हे जागतिक कीर्तिचे जलतज्ज्ञ आहेत. त्यांचे आपण या विधेयकाच्या संदर्भात मागदर्शन घेतले. त्यांना पद्श्री किंवा अन्य किताब दिला की नाही मला माहीत नाही. परंतु त्या क्षमतेचे, त्या उंचीपर्यन्तचे त्यांचे कार्य आहे. असे जागतिक कीर्तिचे तज्ज्ञ महाराष्ट्रामध्ये तयार होतात त्याची नोंद महाराष्ट्र सरकार घेत नाही. हे सरकार काय करणार ? कै. यशवंतराव चव्हाण यांच्या 100 व्या जयंती निमित्त त्यांना पद्मभूषण किताब दिला. तोपर्यन्त ते एवढे मोठे होते हे यांना कळले नव्हते. आपल्या प्रत्येकच्या बोलण्याच्या मर्यादा असतात. श्री. माधवराव चितळे यांचा सन्मान का करत नाही, केवढे मोठे काम त्यांनी केलेले आहे ? संपूर्ण जगामध्ये ज्या व्यक्तीला पाण्याच्या नियोजनाच्या संदर्भात मान्यता आहे, जी व्यक्ती पाण्याची ॲथॉरिटी आहे,जी व्यक्ती मराठी आहे तिचा सन्मान केला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. आपल्या राज्यामध्ये अनेक चांगले तज्ज्ञ आहेत. सर्वांचीच नावे मी घेत नाही. या अहवालामध्ये ती नावे आलेली आहेत.

हिवरे गावचे श्री. पोपटराव पवार यांचे नाव घेता येईल. मी परभणीला एक गाव विकास करण्याकरिता घेतले होते. माझ्या पध्दतीप्रमाणे मी ते काम पूर्ण केले. श्री. पोपटराव पवारांनी मी विकसित केलेले गाव पाहिले आणि त्यापासून त्यांनी प्रेरणा घेतली.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 10:15

श्री.दिवाकर रावते...

मराठवाडयातील काही गावांचा विकास श्री.दिवाकर रावते यांनी केला आणि ती गोष्ट मी बघितल्यानंतर मला पुढची कल्पना आली, त्या अनुषंगाने मी देखील गावांचा विकास केला असा संदर्भ श्री. पोपटराव पवार अनेक वेळा संदर्भ देतात. श्री.पोपटराव पवार यांनी विकासासंदर्भात शंभर पाऊले पुढची गाठली. ती मला गाठता आली नाही. त्याला स्थानिक असावे लागते. गावातील विकास करावयाचा असेल तर सर्व जबाबदारी ही सरपंचाना डोक्यावर घ्यावी लागते. श्री. पोपटराव पवार हे देशाला आदर्श झाले पाहिजेत. अशी आणखी ही माणसे आपल्याकडे आहेत. तरी देखील आपण भूजलाची कामे बघण्यासाठी राजस्थानमध्ये गेलो. राज्यातील या दोन लोकांचा अवमान केला असे मी म्हणणार नाही. ज्यांना मार्गदर्शन करण्याची क्षमता प्रचंड मोठी असताना समितीला दुसऱ्या राज्यात माहिती घेण्यासाठी जावे लागते याचा मला खेद वाटतो. त्या दोन्ही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने मोठया आहेत.

महोदय, प्रकरण 4-पाणी टचाई क्षेत्र घोषित करणे यातील कलम 25 मध्ये असे म्हटले आहे की, पावसाळयाच्या कालावधीत किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सल्ल्याच्या आधारे, स्वत:हून किंवा पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समिती किंवा पंचायत यांच्या विनंतीवरुन, पावसाचे प्रमाण व स्वरुप आणि पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या पातळीची माहिती किंवा अन्य कोणतीही संबंधित बाब लक्षात घेता जिल्हयाच्या त्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांमधील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता ही त्या क्षेत्राच्या (मानवी आणि पशुधन) पशुधन आणि नविन लोकसंख्येच्या आवश्यकतेपेक्षा कमी आहे असे जिल्हा प्राधिकरणाचे मत असेल तर किंवा पंचायत व पंचायत समिती यांच्या मागणीनुसार त्यास आदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे परंतु एका वेळी एका जल वर्षापेक्षा अधिक नाही अशा कालावधीकरिता आदेशाव्दारे, अशा क्षेत्राला पाणी टंचाई क्षेत्र म्हणून घोषित करता येईल. माननीय मंत्री महोदय, आपण काल असे म्हणालात की, प्रत्येक वेळेला वेगवेगळे असेल. या आधारे आपण म्हणाला असेल असे मला वाटते. या वर्षी जे घेतले जाईल ते पुढच्या वर्षी नसेल. आपले म्हणणे बरोबर आहे. कोकणात पडणाऱ्या पावसाचे प्रमाण बघितले तर तेथे पाणी टंचाई घोषित होऊ शकत नाही. कोकणात पावसाचे प्रमाण नेहमी सारखे असतेच. परंतु तेथे जास्त पाऊस पडूनही टँकर्स लावावे लागतात. याचा अर्थ या विधेयकापासून अभिप्रेत असलेले जल नियोजन करावयाचे आहे. पिण्याच्या पाण्यासाठी विहिरीच्या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

साठयांमधून पाणी उपलब्ध करणे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविणे, हा जो मूळ उद्देश आहे, तो कोकणात का होत नाही, तो कसा करणार आहात याचे आम्हाला मार्गदर्शन हवे आहे. आपण कलम 25 मध्ये पावसाच्या पाण्याच्या निकष टाकला असल्यामुळे कोकणातील याबाबतचा प्रश्न कसा सोडविणार आहात याची या सभागृहात माननीय मंत्री महोदयांनी माहिती सांगावी. कलम-26 मध्ये असे म्हटले आहे की, " कलम 25 अन्वये पाणी टंचाई क्षेत्र घोषित केल्यावर, जिल्हा प्राधिकरणास अशा पाणी टंचाईच्या काळात, आदेशाव्दारे, प्रभाव क्षेत्रामधील किंवा सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून एक किलोमीटर अंतरामध्ये, यापैकी जे अधिक असेल अशा क्षेत्रातील अशी विहीर, तात्पुरती बंद करुन, भूजल काढण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा रीतीने विनियमन करता येईल. ते पाणी वापरण्याकरिता तरतूद करण्यात येत आहे. परंतु ती तरतूद आहेच. पाणी टंचाईच्या काळात आपण गावातील मोठया विहिरी खाजगी असल्यातरी अधिग्रहीत करतो. या ठिकाणी तलाव हा शब्द कोठेही वापरला गेलेला नाही. गावातले तलाव हे गावकीचे असतात. विहीर हा शब्द या विधेयकामध्ये वापरण्यात आलेला आहे. आपण पाणी टंचाईच्या काळात विहिरी अधिग्रहीत करतो. त्या विहिरीतील पाणी टँकरमध्ये भरुन त्याचे त्या पाण्यांच्या गावोगावी वाटप केले जाते. ही व्यवस्था सध्या आपल्याकडे सुरु आहे. तलाव या शब्दाचा या विघेयकात वापर केलेला दिसून येत नाही. याबाबतीत समितीने फेरफार केलेले आहेत. परंतु तो फेरफार मला अजून समजू शकला नाही. मी मघाशी कलम-26 वाचून दाखविले.

महोदय, कलम-27 मध्ये असे म्हटले आहे की, " कलम 26 अन्वये, विहीर तात्पुरती बंद करावी असा आदेश काढण्यात आला असला तरी ". मी गावातील प्रमुख आहे. सरकार दरबारी माझ ो वजन आहे. मी आमदार आणि खासदाराच्या जवळचा आहे. सत्तारुढ पक्षाच्या जवळचा आहे. माननीय मंत्री महोदय, आपण विश्लेषण बघावे. कायदा करताना आपण पळवाटा का ठेवतो. मरणा-या माणसांना वाचविण्याकरिता मोठा, छोटा, जवळचा, वशिलेवाला वगैरे कोणी नको. तुझे पाणी आहे, ते तू लोकांना दिलेच पाहिजे असा कायदा पाहिजे. परंतु हा तसा कायदा नाही. या विधेयकात शासनाने पळवाट ठेवलेली आहे. तुम्ही कितीही सांगण्याच्या प्रयत्न केला तरी या कायद्यात आपण पळवाट ठेवलेली आहे. श्री. दिवाकर रावते यांची विहीर अधिग्रहीत करावयाची

3...



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 10:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

असे आदेश आपण काढले. मी माननीय श्री. ढोबळे साहेबांचा अतिशय जवळचा आहे. मी जे काही सांगतो ते श्री.ढोबळे साहेब ऐकतात. मी माननीय मंत्री महोदय श्री.ढोबळे साहेबांचा माणूस आहे आणि तुम्ही माझी विहीर अधिग्रहीत करीत आहात. तुम्हाला काही वाटत नाही काय ?

श्री.भोगले....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ पूर्वी श्री.गिते. 10:20

श्री.दिवाकर रावते.......

असे झाले तर काय करायचे? याठिकाणी म्हटले आहे की, " जिल्हा प्राधिकरणास राज्य शासनाच्या संबंधित विभागाशी विचारविनिमय करुन त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि असा पुरावा सादर करण्यासाठी मालकास आवश्यक करुन आदेशाच्या वेळी केवळ उभ्या असलेल्या फळबागेच्या फळांचे व झाडांचे बाजारमूल्य विचारात घेऊन जी त्यांच्या बाजार मूल्यापेक्षा कमी नाही अशी नुकसान भरपाई देण्यासाठी विहित करण्यात येईल." मग त्याची विहीर सोडून द्यायची की अधिग्रहित करायची? या ठिकाणी कायद्यातील पळवाट स्पष्टपणे दिसून येते. असा आदेश काढला तर त्या विहिरीच्या मालकाला मंत्री महोदय म्हणतील, गावाला पाणी पाहिजे आहे म्हणून तुझी विहीर दे. विहीर दे म्हटल्यानंतर त्याच्या नुकसानीचे काय? नुकसान भरपाईबाबत काय म्हटले आहे?

सभापती महोदय, मूळ विधेयकामध्ये "शेती" असा उल्लेख होता. संयुक्त समितीने त्यामध्ये बदल करुन "फळबागा" असा बदल केला आहे. फळबागांचा, फळांच्या झाडांचा समावेश केला आहे. झाडांचे बाजारमूल्य, फळांचे बाजारमूल्य निश्चित करावयाचे आहे. या संदर्भात कोणते निकष लावणार आहात हे सभागृहाला कळले पाहिजे. माझी संत्र्याची बाग आहे आणि त्या बागेत 100 झाडे आहेत. त्याचे उत्पन्न कसे मोजणार आहात? फळांचे बाजारमूल्य हा विषय या ठिकाणी आणलेला आहे. समितीने हा बदल केला आहे. शेतीऐवजी फळबागा म्हटले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील मंडळी समितीमध्ये असतील तर ते आपले संरक्षण करतातच. त्यामुळे झाडांचे बाजारमूल्य हा विषय आलेला आहे.

सभापती महोदय, दुष्काळग्रस्त भागामध्ये, आमच्या नागपूर आणि अमरावती जिल्हयात संत्रा झाडांची उद्ध्वस्तता झाली. आम्ही तो प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. एका संत्रा झाडाला 20 रुपये नुकसान भरपाई जाहीर करण्यात आली होती. एक संत्रा झाड किमान 10 वर्षे मालकाला उत्पन्न देते. एका संत्रा झाडापासून दरवर्षी किमान 450 ते 500 फळांचे उत्पादन मिळते. आंबट आणि गोड अशी दोन प्रकारची संत्री असतात. पाऊस आला नाही, पाणी मिळाले नाही म्हणून संत्र्यांचे झाड सुकले. त्यासाठी शासनाने प्रती झाड 20 रुपये आर्थिक मदत दिली. आम्ही त्या निर्णयाविरुध्द आरडाओरड केली होती. परंतु सरकारने निर्णयामध्ये बदल केला नाही. ज्या संत्रा उत्पादकाची 100 झाडे सुकली त्याला 2000 रुपये आर्थिक मदत देण्यात आली. 100

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ पूर्वी श्री.गिते. 10:20

श्री.दिवाकर रावते.......

झाडांची बाग निर्माण करायची, ती झाडे जोपासायची. पाच वर्षे त्यापासून काही उत्पन्न मिळत नाही. पाच वर्षानंतर फळांचे उत्पादन सुरु होते. तोपर्यंत उत्पन्न काही नाही. झाडांचे बाजारमूल्य हे कशाच्या आधारे ठरविणार आहात? त्या शेतक-याची विहीर तुम्ही अधिग्रहित केली. त्यामुळे त्याला झाडांना पाणी देता येणार नाही. त्याची झाडे सुकणार आहेत.

हा विषय समितीमध्ये चर्चेला आला होता. सुकलेल्या झाडांचे बाजारमूल्य त्याला दिले गेले पाहिजे. त्यामध्ये बाकीची हेराफेरी होणार आहे. 100 झाडे असतील तर कागदोपत्री 200 झाडे दाखविली जातात. अर्धे तुझे आणि अर्धे माझे असा प्रकार सुरु होतो. अधिकारी आणि शेतकरी यांच्यात संगनमत होऊन जो भ्रष्टाचार चालतो तो भाग वेगळा आहे. तो विषय चर्चेला आल्यानंतर मी त्यावर बोलणार आहे. परंतु फळांचे बाजारमूल्य हा विषय तुम्ही निर्माण केला आहे. बाजारमूल्य फळांचे देता येईल किंवा झाडांचे देता येईल. पावसाळा संपल्यानंतर डिसेंबरपर्यंत संत्रा झाडाला बहर येतो. मे महिन्यात किंवा अवर्षणप्रवण काळात संत्रा पीक येत नाही.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात संत्र्याचे पीक नसते, आंब्याचे पीक असते. माझी अशी सूचना आहे की, समितीने सविस्तर चर्चा करुन यात जो बदल केला आहे तो मला माहीत आहे पण ही झाडे आणि फळांची नुकसान भरपाई कशी देणार, त्याचे निकष कसे लावणार हे स्पष्ट होत नाही. मी नेहमी म्हणतो नारळाचे झाड वाढल्यानंतर त्याला फळे मात्र 10 वर्षांनी लागतात आणि ते झाड 40 वर्षापर्यंत फळे देते. त्याचप्रमाणे आक्रोडच्या झाडाची लागवड केल्यानंतर त्याला 60 वर्षानंतर फळे येण्यास सुरुवात येते आणि 100 वर्षे टिकते. अशा प्रकारे आजोबांनी आक्रोडचे झाड लावले तर नातवाच्या मुलाला त्याची फळे दिसतील अशी परिस्थिती आहे. अशा प्रत्येक फळाची आपापली जगण्याची व जगविण्याची ख्याती आहे. म्हणून अशा झाडांची व फळांची नुकसान भरपाई तिचे बाजारमूल्य विचारात घेऊन ठरविणार की कसे हे स्पष्ट होत नाही. फळांचे बाजारमूल्य हे बाजार कमिटीमध्ये ठरत असते परंतु झाडांचे बाजारमूल्य हे तर मी पहिल्यांदाच ऐकतो.

आमच्या मराठवाड्यात मोसंबीचे पीक घेतले जाते. वर्षानुवर्षे हे पीक मराठवाड्यात होत असले तरी त्याची बाजारपेठ मात्र संत्र्याची बाजारपेठ असलेल्या नागपूरसारख्या ठिकाणी आहे हे कोणाच्याच लक्षात आले नव्हते. आमचे सरकार असताना माननीय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील हे कृषी मंत्री होते. त्या काळात मी ती बाजारपेठ मराठवाड्यात आणण्याचा आग्रह धरला व शेवटी मराठवाड्यात ही बाजारपेठ सुरु झाली. मोसंबीचा भाव नगर जिल्ह्यात 120 रुपये तर मराठवाड्यातील आष्टीला मात्र फक्त 60 रुपये पण आता जालना येथे बाजरपेठ सुरु झाल्याने याच मोसंबीला चांगला भाव मिळाला असून वर्षाची उलाढाल 350 कोटीपर्यंत गेली, हे मी घडवून आणले त्याचा मला अभिमान वाटतो. अन्यथा आमच्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना ट्रकमध्ये मोसंबी भरुन नागपूरला पाठवावी लागत होती. इकडे मात्र आम्ही संत्र्याचा प्रकल्प नांदेडमध्ये नेल्याबरोबर बोंबाबोंब करण्यात आली पण वर्षानुवर्षे मोसंबीची बाजारपेठ नागपूरला असताना मात्र कोणीच आरडाओरड केली नाही.

महोदय, विधेयकातील खंड 28 च्या कलम (1) मध्ये असे म्हटले आहे की, "जिल्हा प्राधिकरण, सार्वजनिक पिण्याचे पाणी स्त्रोताचे संरक्षण किंवा सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल यांच्याशी संबंधित, या अधिनियमान्वये, जेव्हा जेव्हा चौकशी करणे किंवा ते अंमलात आणणे आवश्यक असेल तेव्हा, पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीचे निर्णय अंमलात आणील" तसेच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

जिल्ह्याचे पालक मंत्री हे त्या जिल्ह्याचे प्रमुख असणार आहेत तर पंचायत समिती क्षेत्राचे प्रमुख म्हणून त्या त्या पंचायत समितीचे सभापती हे असणार आहेत. त्यांच्या नियुक्त्या सुध्दा सरकारच करणार, यात आमचा समावेश नसेल हे सत्य आहे. विहिरीच्या संदर्भात या विधेयकात म्हटले आहे ते तर अत्यंत गंभीर आहे. विहिरी खोदावयाच्या असतील, समजा माझ्या शेतात मला विहीर खोदायची असेल तर त्यावरही या कायद्यामुळे निर्बंध येणार आहेत.......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सरकारने पाणी टंचाईमुळे एक लक्ष विहिरी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. विधयेकामध्ये पृष्ठ क्रमांक 14 वरील पोट कलम (क) मध्ये म्हटले आहे की, "सर्वेक्षण करील किंवा त्यांची मोजणी करील,(ख पंपाची तपासणी करील आणि भूभौतिक सर्वेक्षण करेल.(ग) विहिरीवर जलपातळी आलेखक यंत्र आणि जल प्रमाप यंत्र बसवील आणि त्याची देखभाल करील."

सभापती महोदय, मूळ विधेयकात हे सर्व शेतकऱ्याने करावयाचे होते परंतु संयुक्त समितीमध्ये यावर आक्षेप घेतला होता. शेतकऱ्याचीच विहीर व पंप असे असतांना तुम्ही त्याच्यावर मुकादमगिरी करणार आहात काय ? मग सरकारने विहिरीवर यंत्र बसवावे असे ठरले. माझ्या विहिरीवर तपासणीच्या दृष्टीने सरकारी अधिकाऱ्यांचा राबता सुरु होईल. माझ्या प्रॉपर्टीत कोणी यावयाचे व कोणी यावयाचे नाही यावर आता माझा अधिकार राहणार नाही.

सभापती महोदय, पोट कलम (घ) मध्ये असे म्हटले आहे की, "जमिनीच्या संबंधात तपासणी करण्याच्या आणि कोणतेही मोजमाप करण्याच्या किंवा भूपृष्ठावर किंवा भूमिगत पाण्याच्या ठिकाणाची तपासणी करण्याच्या हक्कासह, शासकीय मालकीसह कोणत्याही मालमत्तेमध्ये प्रवेश करील."

सभापती महोदय, शासकीय मालमत्तेमध्ये शासकीय अधिकाऱ्याला केव्हाही जाता येते त्यामुळे हा उल्लेख येथे यावयास नको होता.

सभापती महोदय, पोट कलम (ङ) मध्ये म्हटले आहे की, "पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीच्या परवानगीने किंवा परवानगीशिवाय खोदकाम केले असले किंवा करण्यात येणार असेल अशा विहिरीची तपासणी करील आणि त्यामधून खोदकाम केलेली माती आणि इतर वस्तू यांची आणि अशा मातीचे किंवा इतर वस्तूंच्या नमुन्याची तपासणी करील किंवा पाण्याचा दर्जा आणि दूषितपणा तपासण्याकरिता अशा विहिरीमंधून काढलेल्या पाण्याची तपासणी करील."

सभापती महोदय, पोट कलम (च) मध्ये म्हटले आहे की, "विहिरीचे खोदकाम करणाऱ्या व्यक्तीस, जिल्हा प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे काम पूर्ण केले असेल वा सोडले असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यापेक्षा अधिक होणार नाही अशा कालावधीकरिता त्यामधून काढलेल्या मातीच्या किंवा कोणत्याही वस्तूंचे नमुने विहित रितीने ठेवण्यासाठी व त्यांचे जतन करण्यासाठी लेखी आदेश देईल आणि ती व्यक्ती अशा मागणीचे अनुपालन करील." ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, शेतकऱ्याला पाण्यासाठी विहीर खोदावयाची असेल तर त्यासाठी शासनाने फार बंधने घातलेली आहेत.

सभापती महोदय, पोट कलम (छ) मध्ये म्हटले आहे की, "या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी , आवश्यक असलेली कोणतीही माहिती मिळविण्यासाठी, संबंधित अभिलेखे किंवा दस्तऐवज यांची तपासणी करील आणि त्याच्या प्रती घें्ईल आणि चौकशी चालविल."

सभापती महोदय, विहीर खोदणारा माणूस कसले दस्तऐवज ठेवतो व त्यामुळे आपण कशाची तपासणी करणार ? विहीर खोदणारा माणूस असे लिहून ठेवतो काय, मी आज पाच फूट विहीर खोदली, एवढे दगड मिळाले, एवढा मुरूम मिळाला, या अंतरावर पाणी मिळाले, पाणी कमी असल्यामुळे मी आता आडवा बोअर करेल असे काही लिहीत असतो काय ?

सभापती महोदय, पोट कलम (ज) मध्ये असे म्हटले आहे की, "भूजल वापरकर्त्याला कोणत्याही भूजल प्रत्याहरण संरचनेवर जिल्हा प्राधिकरणाच्या खर्चाने असे मोजमाप यंत्र बसविण्यासाठी आणि पाण्याचे परिमाणाचे संनियंत्रण करण्यासाठी आदेश देईल."

सभापती महोदय, पोट कलम [(झ) मध्ये असे म्हटले आहे की, "अनाधिकृत खोदकामाकरिता व पूर्णत: किंवा अशंत: बांधलेले काम पाडण्यासाठी वापरलेली साधनसामग्री किंवा साधन जप्त करील.]

सभापती महोदय, आता मला माझ्या शेतात विहीर खोदावयाची असेल तर सरकारची परवानगी घेतल्याशिवाय विहीर खोदता येणार नाही. 1 कि.मी च्या परिसरात खाजगी विहीर की, सरकारी विहीर याबाबत मला स्पष्टीकरण झालेले नाही. सार्वजनिक विहीर एक कि.मी. परिघात असता कामा नये असा मी अर्थ लावतो.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.

परंतु या विधेयकामध्ये तसा शब्द आलेला नाही.

एक किलोमीटरच्या परिसरामध्ये नवीन विहीर घेता येणार नाही. म्हणजे आपण जर अशाप्रकारे नियंत्रण आणले तर एका शेतकऱ्याच्या शेतामध्ये विहीर असेल तर बाजूच्या शेतकऱ्याला आपल्या शेतामध्ये विहीर घेता येणार नाही, ती कां घेता येणार नाही याचे या विधेयकामधून स्पष्टीकरण होत नाही. त्या शेतकऱ्याने जर तशी विहीर आपल्या शेतामध्ये घेतली तर त्या विहिरीला पाणी लागेलच असे नाही. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये एकेका शेतकऱ्याने दोन ते तीन विहिरी खोदल्या तरी पाणी लागत नाही, म्हणून त्याने केलेला खर्च फुकट जातो, त्या विहिरींचा काही उपयोग होत नाही. परंतु या विधेयकामध्ये असा नियम करण्यात आला आहे की, "या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन न करणाऱ्या कोणत्याही भूजल वापरकर्त्याला भूजल काढणे, काम बंद करणे, त्याचा (तात्पुरता) वीजपुरवठा खंडित करणे व या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार कोणतेही जलविषयक काम अवैध असल्याचे आढळल्यास ते सीलबंद करणे, यांकरिता निदेश देईल". याचा अर्थ आपण त्या शेतकऱ्याची वीज तोडणार. या तरतुदीचा अर्थ आपणास अभिप्रेत होत नाही त्याबाबत आपण कोणता खुलासा करणार आहात याची मला उत्सुकता आहे. त्यानंतर (ट) मध्ये असे म्हटले आहे की, "या अधिनियमान्वये, कोणत्याही ठिकाणी अपराध घडला होता किंवा घडत आहे असे त्यास सकारण वाटत असेल तर, अशा ठिकाणी अशा सहाय्यानिशी, कोणतेही असल्यास, आवश्यक असेल तर, प्रवेश करील व तपास करील, आणि तसे केल्याच्या (तीस दिवसांमध्ये) तीस दिवसांच्या आत ज्या व्यक्तीने अपराध केला आहे किंवा करत आहे अशा व्यक्तीला विनिर्दिष्ट कालावधीकरिता त्याने भूजल काढू नये किंवा त्याचा वापर करु नये असा लेखी आदेश काढील" म्हणजे तहानलेल्याला पाणी द्यावयाचे नाही असा याचा अर्थ होतो. तसा अर्थ नसेल तर आपण मला आपल्या उत्तरामध्ये सांगा.

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, नोटिफाईड एरिया जाहीर होईल तेवढयापुरते काम करीत असतांना तो जर 7 मीटर खोल गेला तर तो विषय येईल, म्हणजे त्याने नियमांचा भंग केला तर तो विषय येईल.

श्री. दिवाकर रावते : बरोबर आहे, मी म्हटले आहे की त्याने नियमाचा भंग केला तर...शेतकऱ्याकडे पाणी नाही म्हणून तर तो विहीर खणतो. आपण टंचाईग्रस्त भागांसाठी केंद्र

20-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

शासनाची 1 लक्ष विहिरींची योजना जाहीर केली. त्यावर टिका करण्यात आली की, तुम्ही 1 लक्ष विहिरीची योजना जाहीर केली परंतु तुमच्या अर्थसंकल्पामध्ये 3 हजाराची तरतूद कशी केली? या ठिकाणी आपण टंचाईग्रस्त भागाचा विषय मांडीत आहोत.

सभापती महोदय, त्यानंतर (ठ) मध्ये असे म्हटले आहे की, "खोदकाम करणे, भूजल काढणे, भूजलाचा वापर करणे व भूजल दूषित करणे अशा गोष्टी होत असतील तर भूजलाच्या कायम विकासास जे हानीकारक ठरत आहे अशा व्यक्तीला (व्दार) प्रवेशव्दार उघडण्यास सांगितले असतानाही तसे करण्यास त्याने नकार दिल्यास कोणत्याही जागेचे (व्दार) प्रवेशव्दार तोडील". त्यानंतर, (ड) मध्ये म्हटले आहे की, "या अधिनियमाच्या तरतुदीनुसार अशा खटल्याची चौकशी करणे व त्याची तपासणी करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे यासाठी आवश्यक असल्याप्रमाणे इतर सर्व गोष्टी करील". इतर गोष्टी कोणत्या? त्यावेळी तुम्ही सांगणार की, नियमात बसतील अशा गोष्टी....

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ते नियमात बसेल. ते मग उप विधान समितीपुढे येईल. आपण जर काही लफडी केली तर ती माननीय सदस्य श्री.बापट साहेबांच्या लोकलेखा समितीकडे जातील. चांगले काम उप विधान समिती पुढे येते. या विधेयकात ज्या त्रुटी मला दिसतात त्या निदर्शनास आणून दिल्या पाहिजेत. त्या जर मांडल्या नाहीत तर आपल्या विधेयक कळले नाही असा त्यातून अर्थ निघेल. हे इतके जाचक आहे काय, जाचक होणार आहे काय, याचा फायदा एखाद्या विशिष्ट व्यक्तीमत्त्वाला राजकीयदृष्ट्या छळण्यासाठी काम होईल. टंचाईग्रस्त भागात राजकीय अभिनिवेश पूर्णपणे करता येईल. तुमचा दरवाजा तोडून येतो असे म्हणून दरवाजा तोडण्याची कृती होईल. गावात बेइज्जत तर झाली. हा काही गंमतीचा भाग नाही.

अवर्षणप्रवण भागामध्ये टंचाई जाहीर करावी लागते. त्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा झाली होती. त्यावेळी मी मराठवाडा, विदर्भातील आक्रोश मांडला होता की, आम्हाला तेवढा सन्मान मिळत नाही. आमच्या तहानलेला घशाला सुद्धा सन्मान नाही. तिकडच्या तहान लागलेल्या घशासाठी मंत्रिमंडळ उतरते असे बोललो होतो. त्यामुळे मला येथे एक वेगळा पर्दाफाश करावयाचा आहे. हे विधेयक अवर्षणग्रस्त भागासाठी आहे असे माननीय मंत्री महोदय म्हणाले. काँग्रेसचे सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.प्रतिक पाटील काय म्हणाले हे मला जाणीवपूर्वक येथे मांडावयाचे आहेत. जाणीवपूर्वक काही तालुके दुष्काळग्रस्त कसे ठेवले जातात त्याचा पर्दाफाश केला आहे. ही वाक्ये माझी नाहीत. 2673 कोटी रूपयाचा केंद्राचा निधी परत जाणार काय, असे त्यांनी विचारले आहे. हा निधी ताकारी, म्हैसाळ आणि टेंभू या उपसा योजनेकरिता आला होता. पश्चिम महाराष्ट्रामध्ये 4 तालुक्यांचा आक्रोश आहे. ते अवर्षणप्रवण झाले आहेत. त्या करिता हे प्रकल्प आहेत. त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, राज्यातील अनुशेषाचा मुद्दा घेत येत्या काही दिवसात राज्य शासनाने संपुष्टात न आणल्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील दुष्काळी परिसरातील जीवनदायी ठरणारी ताकारी, म्हैसाळ व टेंभू या उपसा जलसिंचन योजनेसाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला 2673 कोटी रूपयाचा निधी परत जाण्याची भीती केंद्रीय कोळसा राज्यमंत्री यांनी व्यक्त केली. राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांनी जलसिंचन योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी मिळत नसल्याचा गोबल्स प्रचार थांबवावा व खरी वस्तुस्थिती दुष्काळी जनतेला समजावून सांगावी, अशी खरमरीत

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

टीकाही त्यांनी केली. हे फार गंभीर आहे. मी हे सगळेच्या सगळे वाचत नाही. पण काही आकडेवारी मला येथे मुद्दाम सांगितली पाहिजे.

केंद्र शासनाने सन 2009 ला एआयबीपीसाठी मान्यता दिली, तर टेंभू योजनेला सन 2011 ला मान्यता मिळाली. म्हैसाळ योजनेसाठी सन 2009-10 ला केंद्र शासनाने 111 कोटी 92 लाख तर राज्य शासनाने 18 कोटी 58 लाख, सन 2010-11 ला केंद्र शासनाने 115 कोटी 75 लाख तर राज्य शासनाने 19 कोटी 22 लाख तर सन 2011-12 ला केंद्र शासनाने 120 कोटी तर राज्य शासनाकडून 12 कोटी रूपये दिले आहेत. या तीन वर्षात केंद्र शासनाने 347 कोटी 75 लाख रूपये दिले आहेत त्यात राज्य शासनाने आपली वाटा 49 कोटी 80 रूपये घातला. ताकारी व म्हैसाळ योजनेला केंद्र शासनाने 973 कोटी रूपये तर टेंभू योजनेसाठी 1700 कोटी रूपये मंजूर केले आहेत. टेंभू योजनेसाठी सन 2011-12 चा पहिला 81 कोटी रूपयांचा हप्ता केंद्र शासनाने राज्य शासनाकडे वर्ग केला असल्याचेही त्यांनी सांगितले. एवढा निधी असताना 4 तालुक्यातील शेतकऱ्यांना पाण्या पासून का दूर ठेवले जाते. ही बातमी एकाच वर्तमानपत्रात आली आहे. ती सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी वाचली पाहिजे. ते आता सभागृहात उपस्थित नाही. ही बातमी वाचतना मी अस्वस्थ झालो. एवढा निधी असून देखील राज्य शासन तो वापरत नाही. टंचाईग्रस्त लोकांसाठी जेवणावळी घालता. त्यास माननीय मंत्री, माननीय मुख्यमंत्री जातात.

यानंतर सौ.रणदिवे....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

ही योजना राबवित असताना हे सगळे कशासाठी सुरु आहे.

सभापती महोदय, त्यादिवशी मी माझ्या भाषणामध्ये टेंभू प्रकल्पाच्या बाबतीत उल्लेख केला. टेंभू प्रकल्प 5 लिफ्टचा आहे आणि या प्रकल्पासाठी शासन पैसे का देत नाही. याबाबतीत कसल्या प्रकारचे नियोजन करीत आहात हे माननीय पुनर्वसन व मदत कार्यमंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सरकारला विचारावे. काखेत कळसा आणि गावाला वळसा अशा पध्दतीने आम्हाला दुष्काळग्रस्त भागाची परिस्थिती सांगण्यात आली.सध्याचे त्या भागातील खासदार हे केंद्रीय मंत्री आहेत. त्यामुळे ते असत्य बोलणार नाहीत. त्यांनी तुम्हाला घरचा अहेर देऊन तुमचा बुरखा फाडला आहे. हे विधेयक आणत असताना आपणच केलेले पाप फेडण्यासाठी हे विधेयक आणले आहे काय ? अशा प्रकारची शंका व्यक्त करतो, आपल्या विनंतीचा सन्मान करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, हे विधेयक आणण्याची शासनावर का परिस्थिती आली? मी काल या ठिकाणी हरकतीचा मुद्दा उपस्थित करताना बोललो होतो. जवळजवळ 62 टक्के नागरीकरण झाले आहे असे सरकार सांगत आहे. आज ज्या गतीने नागरीकरण होत आहे,त्या गतीने नियोजन झालेले नाही.आता सातवी पंचार्षिक योजना सुरु होणार आहे. तसेच आपण स्व.यशवंतरावजी चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत त्या वेळी या पंचवार्षिक योजनेचे खरे जनक पंडित जवाहरलाल नेहरु यांनी आणि नंतर स्व.यशवंतरावजी चव्हाण यांनी खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये याचा पाठपुरावा केला. पण पंचवार्षिक योजनेच्या बाबतीत जे नियोजन व्हावयास पाहिजे ते झालेले नाही. आजकाल नागरीकरणामुळे रहाणीमान बदलत चालले आहे, सुधारत आहे आणि त्याबरोबरच तफावतही वाढत आहे. एकीकडे रहाणीमान सुधारत आहे हे चांगले आहे पण दुसरीकडे ग्रामीण भागातील जनता पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहात आहे अशी परिस्थिती या महाराष्ट्रामध्ये दिसते. तसेच लोकांचे रहाणीमानही बदलत आहे. पूर्वी लहानपणी मी एक वेळ आंघोळ करीत होतो. पण आता दोन वेळा करतो. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना मी बाहेर जाऊन बोलावून आणले. ते तर दिवसातून 8 वेळा आंघोळ करतात ही फॅक्ट आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना म्हटले की, तू पाण्याचा किती अपव्यय करतो हे बरोबर नाही. रहाणीमानामध्ये एवढा बदल ? मला असे वाटते की, ते नगर पालिका क्षेत्रामध्ये रहातात, माझ्यासारखे ग्रामीण भागामध्ये रहात नाहीत. मात्र ही गोष्ट हसण्यावारी नेली तरी पाण्याच्या बाबतीत राज्य शासनाने नियोजन केलेच नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय मंत्री महोदय श्री.लक्ष्मणराव ढोबळे साहेबांना सांगू इच्छितो की,परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी टंचाई भागातील दौरे केले आणि 9 जिल्ह्यात पाणी टंचाई असल्याचे जाहीर केले. आज माननीय मुख्यमंत्र्यांनी 9 जिल्हे दुष्काळी जिल्हे म्हणून जाहीर केले त्यातील 8 जिल्ह्यांचे नेतृत्व हे महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांनी केलेले आहे आणि ते आजही करीत आहेत.सन्माननीय कृषीमंत्री श्री.शरदचंद्रजी पवार, सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे, सन्माननीय पाणी पुरवठा मंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, सांगलीमध्ये सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम,सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील, सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटील नेतृत्व करतात. त्यापूर्वी कै.वसंतदादा पाटील, कै.राजारामबापू पाटील यांनी नेतृत्व केले.साताऱ्यामध्ये स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे नेतृत्व होते. आता ते माननीय श्री.पृथ्वीराजजी चव्हाण यांच्याकडे आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये बॅरिस्टर ए.आर.अंतुले, माननीय श्री.बाबासाहेब भोसले, पुणे येथील माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

श्री.शरदचंद्र पवार आणि आता माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार तसेच माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील,

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

अहमदनगरमध्ये श्री. बाळासाहेब थोरात आहेत. या आठ जिल्ह्यांमध्ये या महाराष्ट्रातील सर्व सूत्रे आणि महाराष्ट्राच्या सर्व किल्ल्या राहिलेल्या आहेत. सर्व आर्थिक किल्ल्या त्यांच्याकडेच राहिलेल्या आहेत. असे असताना या आठ जिल्ह्यांमध्ये आज जर ही परिस्थिती येत असेल तर महाराष्ट्रातील बाकीच्या जिल्ह्यांमध्ये काय परिस्थिती असेल याचा आपण विचार करावा.

सभापती महोदय, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना राज्य शासनाला अपयश आलेले आहे. पाच वर्षाचा अपवाद वगळता या राज्यामध्ये सातत्याने कॉंगेसचे सरकार राहिलेले आहे आणि आज हा कायदा आणला जात आहे. मला कल्पना आहे की, वेळ अपुरा आहे. मी जास्त वेळ बोलणार नाही असा शब्द दिलेला आहे. यावर बोलण्यासारखे भरपूर मुद्दे माझ्याकडे आहेत पण मी दोन तीन मुद्दे या ठिकाणी मांडणार आहे. काल संध्याकाळी मी माननीय सभापती महोदयांना सुध्दा शब्द दिला होता की, मी पाच दहा मिनिटात माझे विचार मांडणार आणि विधेयक मंजूर करणार. मी शब्दाला पक्का आहे. आज महाराष्ट्रामध्ये काय परिस्थिती आहे ? यामध्ये एक जी गंभीर बाब आहे ती मी सांगणार आहे. मी रात्री सुध्दा थोडे वाचन केले. या विभागाच्या सचिव महोदया भेटल्या. त्यांना मी हे काय आहे असे विचारले ? त्या म्हणाल्या की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब काय बोलतात हे मला कळलेले नाही. मग मी रात्री थोडे वाचन केले.

सभापती महोदय, परदेशामध्ये काय नियोजन चालले आहे ? मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब बसून जुम्मा ते जुम्मा आंधोळ करतात असे म्हणाले. जुम्मा ते जुम्मा आंधोळ करण्याचा प्रकार कसा आला, शुक्रवारीच आंघोळ का करतात ? त्यामागे सुध्दा एक शास्त्र आहे. याचे कारण असे आहे की, दुबई आणि इतर काही देशांमध्ये पाणीच नाही. पाणी नाही म्हणून त्यांनी शास्त्र निर्माण केले. देवाला म्हणजे अल्लाला हाताशी धरुन त्या ठिकाणी दर शुक्रवारीच आंधोळ करावयाची असे शास्त्र त्यांनी निर्माण केले. माझा दुबईला व्यवसाय असल्यामुळे बऱ्याचदा मी त्या ठिकाणी जातो. ते किती वेळा नमाज पढतात वगैरे ठीक आहे पण ते काम करतात. नमाजासाठी ते काम बंद करीत नाहीत. परंतु ते सूत्र आपल्याकडे येईल का ही भीती

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

श्री. जयंत प्र. पाटील ....

वाटते. अमेरिकेमध्ये आता 2 किलोमीटर खोलीतून पाणी काढण्याच्या मशिनचे संशोधन चालू आहे. आज आपल्याकडे 400 ते 500 मीटर खोलीतून पाणी काढले जाते. परंतु अमेरिका आतापासून तयारी करीत आहे. 2 किलोमीटरपेक्षा जास्त खोलीतून पाणी काढण्याची गरज अविकसित देशांमध्ये पडणार आहे आणि त्या दृष्टीने अमेरिका संशोधन करीत आहे. त्या पाणी काढण्याच्या यंत्राचा धंदा अमेरिका करावयास मागत आहे. याचा आपण अभ्यास केला आहे का ?

सभापती महोदय, या ठिकाणी आपण हसण्यावारी कविता, पणजोबा, आजोबा, नातू वगैरे बोलतो पण ही गंभीर बाब आहे. मी हे का बोलतो ? माझा स्वत:चा पोर्टचा व्यवसाय आहे. माझ्याकडे काही कंपन्या जॉइन्ट व्हेंचर करावयास येतात. दुबईमध्ये एक दोन इंटरनॅशनल मार्केट्स आहेत. सिंगापूर, दुबई या ठिकाणी इंटरनॅशनल कंपन्या एकत्रित येऊन पुढे 50 वर्षानंतर काय होणार, शंभर वर्षानंतर काय होणार, या बाबतीत विचार करतात. आमचा जो धक्का आहे त्या ठिकाणी अविकसित देशामध्ये पाण्यासाठी टॅक बांधण्यासाठी आताच जागा आणि परवानगी घेण्याचा विचार विकसित देश करीत आहेत. ही किती गंभीर बाब आहे आणि त्याचा आपण कधी विचार केला आहे का ? आपल्याकडे पाण्याची टंचाई येणार त्या दृष्टीने ते आपल्या पुढे जाऊन विचार करीत आहेत.

काल सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, पाण्यासाठी उद्योग निर्माण होणार. 2005 मध्ये माननीय श्री. शरद पवार यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या संचालकांची एक बैठक घेतली होती. ते दरवर्षी बैठक घेऊन त्यांच्याशी हितगूज करतात. आमच्या संचालकांशी गप्पांच्या स्वरुपात, चर्चेच्या स्वरुपात ते वर्षातून एकदा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या संचालकांची बैठक घेत असत. त्यांनी एकदा आम्हाला जे सांगितले ते खरे ठरले. त्यांनी सांगितले होते की, 2014 सालानंतर कोकणामध्ये 7/12 फिरणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

जमिनी विकत घेण्यासाठी कोणी येणार नाही. कारण जमिनी काही लोकांनी अगोदरच घेऊन ठेवलेल्या आहेत. 2020 साली या देशामध्ये 7/12 फिरणार नाही. मुंबईलगतच्या जमिनी विकण्यासाठी शिल्लक राहणार नाहीत. त्याचबरोबर पाणी शिल्लक राहणार नाही. या दोनच गोष्टी त्यांनी सांगितल्या होत्या. मी त्यांना असे म्हटले होते की, आपण काय बोलत आहात ? त्यावर त्यांनी मला असे म्हटले की, मी कृषी मंत्री म्हणून पदभार सांभाळल्यानंतर याचा अभ्यास केला आहे. त्यांचे म्हणणे मला आज पटू लागले आहे. या संदर्भात शासनाने कोणतेही नियोजन या विधेयकात केल्याचे दिसत नाही. उलट अनेक बंधने घालण्यात आलेली आहेत. त्यामुळे पुन्हा राजकारण होण्याची शक्यता आहे.

काल मी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते माननीय सभापतींच्या दालनामध्ये गेलो होतो. पालक मंत्री कसे वागतात, पालक मंत्री कसा अन्याय करतात, एकाधिकारशाही कशी राबवितात हे सांगितले होते. माननीय राज्यपालांनी अभिभाषणामध्ये 3 हजार तळी बांधण्याचा संकल्प सोडलेला आहे. हे विधेयक आज मंजूर केल्यानंतर राज्यपालांनी त्याला मंजुरी दिल्यानंतर सरकारला 30 तळीही बांधता येणार नाही. इतक्या अडचणी पुढच्या काळात येणार आहेत. आमचा या विधेयकाला विरोध नाही. यामध्ये पंचायत समित्यांचे सदस्य असल्यामुळे मंजुरी देत असताना वेगवेगळ्या ठिकाणी वाद निर्माण होणार आहेत. या विधेयकामध्ये तलावांचा उल्लेख केलेला नाही. तो या कारणामुळे केलेला नाही का ? राज्यपालांनी 3 हजार तलावांचे उद्दिष्ट ठरविलेले आहे. ते पूर्ण झाले पाहिजे. पाण्याचा साठा कशाप्रकारे वाढेल त्यादृष्टीने सरकारने काम केले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यातील सिंचनक्षमता वाढविण्यासंबंधी या विधेयकात काहीच तरतूद केलेली नाही. देशामध्ये 45.3 टक्के सिंचन होते. महाराष्ट्रामध्ये फक्त 17 टक्के सिंचनाची व्यवस्था आहे. 17 टक्के सिंचनक्षमता कशामुळे निर्माण झाली आहे त्याचाही मी अभ्यास केला आहे. 17 टक्क्यांपैकी 10 टक्के सिंचन व्यवस्था शिवकालीन विहिरी, तळी आहेत त्यातून निर्माण झालेली आहे आणि उर्वरित 7 टक्के सिंचन व्यवस्था विविध प्रकल्पातून निर्माण झालेली आहे. त्याचाही या विधेयकात उल्लेख आलेला नाही. या विधेयकात आम्ही असे करु, तसे करु याचा

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

उल्लेख आहे. पण सिंचनक्षमतेमध्ये वाढ करु, भ्रष्टाचार बंद करु, अंदाजपत्रके वाढीव दराची तयार केली जातात ते बंद करु याचा उल्लेख या विधेयकात केलेला नाही. भ्रष्टाचारामुळे सिंचनक्षमता अपेक्षेप्रमाणे वाढलेली नाही. सभापती महोदय, आपण माझ्याकडे सारखे गोड हसून बघत आहात. आपल्या गोड हसण्यामध्ये मी लवकर खाली बसावे असा आपला उद्देश दिसून येत आहे. या विधेयकात जर काही त्रुटी असतील तर त्या दुरुस्त करुन जेणे करुन सर्वसामान्य जनतेला पाणी कसे मिळेल याची सोय शासनाने करावी अशी मी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

-----

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सभागृहाची वेळ 15 मिनिटांपर्यंत वाढविण्यात येत आहे.

3......

अशुध्दारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी वि.स.वि.क्रमांक 42 वर माझे विचार मांडण्यासाठी या ठिकाणी उभी आहे.

माननीय मंत्री महोदय, श्री.लक्ष्मणराव ढोबळे हे सामाजिक चळवळीशी संबंधित आहेत. त्यामुळे त्यांना याबाबतची वस्तुस्थिती माहीत असेल. परंतु रेकॉर्डवर उल्लेख आला पाहिजे म्हणून आम्हाला बोलणे क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदय, 1993 सालातील पाण्याचे विनियमन करणे याबाबत या विधेयकात उल्लेख करण्यात आलेला आहे. 1985 पासून 2000 पर्यंत अनेक मान्यवरांनी पाणलोट विकास कार्यक्रमासाठी व सर्व प्रकारच्या पाण्याचे चांगल्या प्रकारे नियोजन करावे यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये श्री.विलासराव साळुंखे, पाणी पंचायत, ता.पुरंदर, 1985 सालापासून सातत्याने महाराष्ट्रात काम केले आहे. कृषी तज्ज्ञ श्री.जयंतराव पाटील, कोसबाड, जि.ठाणे, त्यांनी नियोजन आयोगामध्येही काम केलेले आहे. श्री.मोहन धारिया, श्री.मणिभाई देसाई, कृषी तज्ज्ञ, श्री.अण्णा हजारे, श्री.पोपटराव पवार, पूर्वीच्या काळात श्री.अण्णासाहेब शिंदे, नाशिकचे वनाधिपती श्री.विनायकराव पाटील, श्री.देवल, म्हैसाळ, जि.सांगली अशा अनेकांनी वेगवेगळया पध्दतीने पाण्याच्या नियोजनाबाबत लोकांनी गाव पातळीवर स्वत:वर बंधने कशी घातली पाहिजेत याबाबत मांडणी केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ D/ ST/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:00

डॉ. नीलम गो-हे...

मला एक गोष्ट येथे खेदाने नमूद करावयाची आहे ती म्हणजे आमच्या सरकारची संघटनात्मक स्मृती नाही. जसा एखाद्या हिंदी सिनेमामध्ये स्मृतिभ्रंश झालेला माणूस पहिल्या पासून कामाला सुरुवात करतो तशा प्रकारे आपले सरकार अनेक गोष्टींवर निर्णय घेत असते.

या विधेयकाच्या पान क्रमांक 8वर समान यंत्रणा उभी करण्याचे म्हटलेले आहे. तसेच भूजल प्रदूषित करण्यापासून आपण लोकांना परावृत्त करणार आहोत. पाण्याची गुणवत्ता राखण्यासाठी देखील प्रयत्न होणार आहे. मला या निमित्ताने हे निदर्शनास आणावयाचे आहे की, उजनी धरणाच्या परिसरामध्ये अनेक स्त्रोत प्रदूषित झालेले आहेत. गावांची नावे देखील आपण सांगितलेली आहेत. त्यामध्ये नगर, अकोला, कोपरगांव पाथर्डी, अमरावती, औरंगाबाद, धुळे, जळगाव, बुलढाणा, लातूर नाशिक, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर ही गावे आहेत. मी नोटिफिकेशन पाहिलेले आहे. एकूण 1274 गावे संकटग्रस्त आहेत. ज्या गावांच्या संदर्भात नोटिफिकेशन निघालेले आहे, त्या गावांमध्ये हा कायदा पहिल्यांदा लागू होणार आहे कारण त्या ठिकाणी बंधने घालण्याची आवश्यकता आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही गावे या कायद्याखाली येणार आहेत हे त्या गावातील लोकांना माहीत आहे काय ? तर ते त्यांना माहीत नाही. अति खोल विहिरी असता कामा नयेत, पाण्याचे स्त्रोत प्रदूषित झाले असतील तर काय करायला पाहिजे, असे विषय समोर येत असताना काही ठिकाणी पाण्यावरुन देखील वेगळया प्रकारची राजकीय सत्ता असते. आपण पंचायत समिती किंवा स्थानिक पातळीवर जे निर्णय घेतो ते घेताना त्यासंबंधीचे निकष व्यवस्थित असले पाहिजे अन्यथा सूड बुध्दीने किंवा राजकीय स्वार्थापोटी गावपातळीवर एखाद्यावर अन्याय होऊ शकेल का असा प्रश्न मला पडतो.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची बाब ही आहे की, ही बंधने घालण्याची वेळ का आली ? आपण तापमान बदलाचा विचारच केलेला नाही. भूगर्भातील पाण्याची पातळी सातत्याने खाली खाली जात आहे. हा विषय आपल्याला नवीन नाही. गेली 10 वर्षे या विषयावर आपण चर्चा केलेली आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे अनेक विपरित परिणाम होत आहेत.

सभापती महोदय, मला आणखी एका महत्वाच्या प्रश्नाकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे. नव्या जल उपसा सिंचन योजना झाल्यानंतर हा भाग नंतर बदलण्यात येणार आहे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

काय ? पाणी झिरपल्यानंतर भूगर्भातील पाण्याची पातळी वाढेल आणि ती वाढल्यानंतर आपण जे काही निकष लावलेले आहेत त्यामध्ये बदल करावे लागतील. नाही तर आता ज्या गावांना बंधने घातलेली आहेत त्या गावांमध्ये वर्षानुवर्षे ती बंधने तशीच रहातील. म्हणून या गावातील लोकांना पाण्याच्या संदर्भात आपण कशा प्रकारे दिलासा देणार हा प्रश्न आहे ?

सभापती महोदय, भूजलाचा कमीत कमी वापर करावा, जलसंधारणाच्या योजना स्वखर्चाने कराव्यात असे अहवालाच्या पृष्ठ क्र. 11वर म्हटलेले आहे. जे स्वत: पैसे खर्च करु शकतात असे लोक ठिबक सिंचन सारख्या मोठ्या योजना राबवू शकतील. अन्य सर्वसामान्य शेतकरी अशा खर्चिक योजना राबवू शकणार नाही. या विधेयकातील एक भाग अतिशय स्तुत्य आहे. शहरामध्ये पाण्याचा पुनर्वापर करण्यास सांगितलेले आहे. इमारातीच्या आराखड्यामध्ये छापरावर पडलेले पाणी साठवण्यासाठी बांधकाम करणे बंधनकारक केलेले आहे. ही चांगली तरतूद आहे. अशा पध्दतीने पाण्याचे कॉन्झर्व्हेशन करणे ही काळाची गरज आहे. दुसरे असे की, हा विषय आपण सुट्यासुट्या पध्दतीने हाताळत आहात. महाराष्ट्रामध्ये जलसंधारणाचे अनेक प्रयोग झालेले आहेत. 1993 साली श्री. अण्णा हजारे यांच्या अध्यक्षतेखाली आदर्श गाव समिती स्थापन करण्यात आली होती. आज आदर्श हे नाव वेगळया पध्दतीने ऐकायला मिळते. गाव पातळीवर पाण्याचा वापर कशा चांगल्या प्रकारे करता येईल या दृष्टीने अनेक समित्या झालेल्या आहेत मग त्या भारतीय विकास कार्यक्रमांतर्गत झालेल्या असतील, अन्य कार्यक्रमांतर्गत झालेल्या असतील त्यांनी केलेल्या कामाचा, त्यांच्या अनुभवाचा आपण कशा प्रकारे उपयोग करुन घेणार आहात असा माझा प्रश्न आहे. पडीक जमीन विकास महामंडळच्या संदर्भात श्री. मोहन धारिया यांनी बरीच वर्षे काम केलेले आहे. त्याच प्रमाणे आदर्श गाव समिती, दुष्काळ निवारण समिती, राज्यस्तरीय पाणलोट विकास समिती, या सर्वांचा सहभाग घेणे अतिशय गरजेचे आहे.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 11:05

श्रीमती नीलम गोऱ्हे...

म्हणून भूजल व्यवस्थापनाची कार्यवाही हितसंबंधाच्या पलीकडे जाऊन झाली पाहिजे, अन्यथा गावा गावात वादविवाद वाढणे आणि त्याच्यापुढे जाऊन मला असे वाटते की, काही वेळेला काही विषयाची सगळी ताकद त्या भागातील एकाच माणसाकडे एकवटली जाते. त्यामुळे गावामधील जे सामान्य लोक आहेत, त्यांना त्यांच्या सर्व अधिकारापासून वंचित व्हावे लागते.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी श्री.माधवराव चितळे यांचा उल्लेख केला. त्यांनी राज्यातील उप खोरे आणि खोरेनिहाय जलयोजना मांडली होती. आपण उप खोरे हा या योजनेचा एक भाग असेल असा उल्लेख विधेयकात केलेला आहे. त्याचा अंतर्भाव कशा पध्दतीने करणार आहोत, यावर चर्चा करणे आवश्यक आहे. वेळ कमी आहे, म्हणून मी माझे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची मानसिक तयारी ठेवली होती. त्यानुसार मी माझे बाकीचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवतो आणि माझे मनोगत पूर्ण करते. धन्यवाद.

-----------

2....

श्री एस. क्यू. जमा ( विधानासभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, सन् 1993 का जो एक्ट है उसको रिपील करके यह नया एक्ट यहां पर लाया गया है. यह कॉम्प्रीहेंसिव बिल है. इस बिल पर ज्वाइंट कमेटी में चर्चा होने के बाद ही यह बिल यहां पर लाया गया है. मैं यहां पर इस बिल का समर्थन करने के लिए खड़ा हुआ हूं.

इस बिल के बारे में मेरे दो-तीन छोट-छोटे सुझाव हैं. एक सुझाव तो यह है कि इसमें डेफिनिशन का जो क्लॉज है उसमें आपने 25 नंबर पर "सेंड माइनिंग" के बारे में लिखा है. मेरा सुझाव है कि महाराष्ट्र के अंदर हमारे विदर्भ एरिया में भी कोल तथा मिनरल्स की माइनिंग होती है, इसलिए मेरा कहना है कि उसकी डेफिनिशन भी इसमें शामिल की जानी चाहिए. आपने यहां पर सिर्फ सेंड माइनिंग के बारे में ही लिखा है. उसमें "coal and any other minerals", एड किया जाना चाहिए.

मेरा दूसरा सुझाव यह है कि आपने चॅप्टर तीन में लिखा है कि आप जो डिस्ट्रीक्ट ॲथारिटी बनाएंगे, उसका चीफ तहसीलदार लेवल का अधिकारी होगा. मुझे कहना है कि तहसीलदार एक तहसील में रहता है. जिले की आप जो ॲथारिटी बनाएंगे, उस बारे में मेरा कहना है कि आपकी यह बात ठीक है कि जिला अधिकारी पर कार्य का भार बहत ज्यादा रहता है. लेकिन एडीशनल कलेक्टर रेंक का अधिकारी उस ॲथारिटी का चीफ बनाया जाना चाहिए. तहसीलदार लेवल के अधिकारी को आप वहां पर चीफ बनाएंगे तो उस ॲथारिटी के हिसाब से वह बहुत छोटे लेवल का अधिकारी हो जाएगा.

चॅप्टर 3 में आपने डिस्ट्रीक्ट ॲथारिटी की बात कही है. आपने कहा है कि आप डिस्ट्रीक्ट ॲथारिटी बनाएंगे, "The State Government shall by its Notification or Official Gazette designate any officer not below the rank of Tahsildar..."
मेरा कहना है कि वह डिप्टी कलेक्टर लेवल से नीचे का अधिकारी वहां का चीफ नहीं होना चाहिए, क्योंकि यह एक ॲथारिटी है.

इसी प्रकार आपने नंबर 18 में लिखा है कि जो डिस्ट्रीक्ट वाटरशेड मॅनेजमेंट कमेटी बनेगी, पालक मंत्री उस कमेटी के चेयरमेन होंगे और सदस्यों में लेजीलेस्चर के सिर्फ एक ही माननीय सदस्य वहां पर मेम्बर होंगे. मुझे लगता है कि ऐसा करने से कॉम्पलीकेशन बढ़ जाएगी.



अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 11:05

श्री एस. क्यू.जमा....

डिस्ट्रीक्ट वाटरशेड कमेटी के चेयरमेन वहां के पालक मंत्री रहेंगे. इसलिए मेरा कहना है कि वहां से विधान सभा और विधान परिषद के जितने भी सदस्य होंगे, उन सभी को उस कमेटी का मेम्बर बनाया जाना चाहिए. ऐसा मेरा सुझाव है. इस बिल को मेरा पूरा समर्थन है, इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे ( पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने भावना व्यक्त केल्या आणि अतिशय जिव्हाळयाने या विधेयकाबद्दलची चर्चा या ठिकाणी केली. सन्माननीय सदस्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण सूचना केलेल्या आहेत, या विधेयकाचे कायद्यात रुपांतर करीत असताना जरुर त्या सूचनांचा विचार करु. श्री. माधवराव चितळे आणि श्री. पोपटराव पवार यांची पद्मभूषण केंद्र सरकारकडे शिफारस करण्यासंबंधीचा विषय माझा जरी नसला तरी त्यांनी जे योगदान दिलेले आहे. त्यादृष्टीने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्याकडे हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा अशी शिफारस करणे योग्य राहील.

महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी उत्तम अशा सूचना केलेल्या आहेत. या ठिकाणी प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतांवर उत्तर देणे आवश्यक होते, परंतु वेळे अभावी हे जरी शक्य नसले तरी देखील या विधेयकाचे ज्या पध्दतीचे गांभीर्य आहे, ज्या पध्दतीने दुष्काळाचे, पाण्याच्या टंचाईचे सावट महाराष्ट्रावर आहे...

यानंतर श्री. भोगले...

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे.......

त्याचा विचार करता मी सभागृहाचा फार वेळ न घेता पुन्हा एकदा संबंधित माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सर्व माननीय सदस्यांना बोलावून विभागाचे सचिव, संचालक,जीएसडीए आणि आमचे कार्यालय एकत्रित बसून आपल्या सूचना पुन्हा एकदा ऐकून घेण्याचा प्रयत्न करुनच या विधेयकाला अंतिम स्वरुप देण्याबद्दल प्रयत्न करु अशी अपेक्षा व्यक्त करतो. पाण्यासाठी एक चांगले काम या निमित्ताने भावी पिढीसाठी आपण करीत आहोत याबद्दलचे समाधान व्यक्त करुन हे विधेयक एका पक्षाचे किंवा एका बाजूचे नसून सर्व सभागृहाच्या वतीने एकमताने हे विधेयक मंजूर करुन स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीला मुजरा करावा अशी कळकळीची विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 59 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42 संमत करण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 42 संमत झाले आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**............

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.30 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.12 ते 11.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सभापती** : आता सर्वप्रथम अल्पसूचना प्रश्न क्र. 29920 चर्चेला घेण्यात येईल.

**"बीड जिल्ह्यातील परळी येथील औष्णिक वीज केंद्रातील संच कोळशाअभावी बंद पडल्याबाबत"**

**(1) *29920 डॉ. नीलम गोऱ्हे** : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यातील परळी औष्णिक वीज केंद्रातील एक संच कोळशाअभावी बंद ठेवल्याचे दि. 27.3.2012 रोजीच्या सुमारास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कोळशाअभावी वीज केंद्र बंद झाल्यास राज्यातील वीज भार नियमनाचे संकट वाढत जात आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, वीज भारनियमन कमी करण्यासाठी शासन कोणते विशेष प्रयत्न करीत आहे ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री. अजित पवार, यांच्याकरिता** : (1) होय, हे खरे आहे. परळी औष्णिक वीज केंद्रातील संच क्र. 3, दि. 23.3.2012 रोजी कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे व तांत्रिक बिघाडामुळे बंद करण्यात आला आहे.

2) व 3) कोल कंपनीकडून येणारा कोळसा हा निकृष्ट दर्जाचा व कमी प्रमाणात येतो. त्याची तूट भरुन काढण्यासाठी महानिर्मिती कंपनी केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार 3.35 दशलक्ष टन कोळसा आयात करीत आहे.

वीज भार नियमन कमी करण्यासाठी मागणी व्यवस्थापन योजनांची सुनियोजित अंमलबजावणी, विविध कंपन्यांकडून आवश्यक तेव्हा वीज खरेदी, वीज गळती व तांत्रिक हानी कमी करणे, वीज प्रकल्पांची क्षमता वाढ करणे इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, कोळशाचा अपुरा पुरवठा होत असल्याने आणि तांत्रिक बिघाडामुळे परळी येथील संच बंद पडला असे म्हटले आहे. त्याची दुरुस्ती कधी होणार आहे, त्यामुळे भार नियमन किती करावे लागणार आणि त्याचबरोबर इतर औष्णिक केंद्रे मग त्यात कोराडी, चंद्रपूर, भुसावळ, खापरखेडा आणि नाशिक या ठिकाणी देखील फक्त 8 दिवस, 6 दिवस आणि 21 दिवस पुरेल इतकाच साठा आहे याची माहिती शासनाला आहे काय, तसे असेल तर या कोळशाचा पुरवठा होण्यासाठी शासन काय प्रयत्न करणार आहे आणि परळी येथील औष्णिक वीज केंद्र कधीपर्यंत सुरु होणार आहे ?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्रमांक 29920........

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, दि. 23.3.2012 रोजी परळी येथील संच क्र. 3 बंद पडला. त्याचे कारण म्हणजे सप्टेबर आणि ऑक्टोबर महिन्यात अपुरा कोळशाचा पुरवठा असल्यामुळे हा संच बंद पडला. आपल्याला ज्या ओड़िसा आणि तेलंगणा भागातून कोळशाच पुरवठा होतो त्यातील ओड़िसा राज्यातील माईन्स फ्लडेड झाल्यामुळे हा पुरवठा कमी होत गेला पण तो आता मार्चपर्यंत सुरळीत झाला आहे. त्याचबरोबर रेल्वेच्या रॅक्सची उपलब्धता देखील पर्टिक्युलर काळात कमी झाल्यामुळे हा प्रकार घडला व या कारणांनी हा संच दि. 23.3.2012 रोजी बंद पडला. त्याच वेळेस ईएसपी म्हणजे वायुमधील राखेपासून होणारे प्रदूषण कमी करणारे यंत्र बंद पडल्यामुळे देखील काही काळासाठी हा संच बंद ठेवावा लागला अशी दोन वेगवेगळी कारणे आहेत. हा संच एकूण 14 दिवस बंद ठेवावा लागला आणि आता पुन्हा 5 एप्रिल, 2012 रोजी सुरु झाला. यासाठी साधारणतः कोळशाचे लिंकेज कोराडी केंद्रात 4.49 दशलक्ष मे.टन इतके आहे त्या तुलनेत फक्त 2.93 दशलक्ष मे.टन इतकाच कोळसा उपलब्ध होतो. भुसावळ येथील केंद्रातील लिंकेज 65.42 टक्के इतके असताना दर दिवशी दोन रॅक्स कोळसा उपलब्ध होतो. तसेच नाशिक मधून 5.67 दशलक्ष मे.टन इतके लिंकेज असून त्यापैकी 3.52 दशलक्ष मे.टन इतका कोळसा उपलब्ध होतो.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अल्पसूचना प्रश्न क्रमांक** :29920...

श्री. राजेंद्र मुळक .....

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रामध्ये 3.15, परळी औष्णिक केंद्रामध्ये 5.77 द.मे.टन कोळशाची आवश्यकता असते परंतु 4.31 द.मे.टन कोळसा आपल्याला मिळतो म्हणजे साधारणत 74 टक्के कोळसा उपलब्ध होतो. कोराडी, भुसावळ, नाशिक, परळी, चंद्रपूर, पारस, खापरखेडा औष्णिक विद्युत प्रकल्पांना 42.74 द.मे.टन कोळशाची आवश्यकता असते परंतु 32.30 द.मे.टन कोळशाची एकंदरीत आवक आहे. एकंदरीत 75 टक्के कोळसा आपल्याला उपलब्ध होत असतो. WCL मधून 22.68 द.मे.टन कोळसा उपलब्ध व्हावयास पाहिजे परंतु 17.42 द.मे.टन कोळसा प्राप्त होतो. MCL मधून 8.54,SCCL मधून 6.24, HCCL मधून 2.24 द.मे.टन कोळसा मिळावयास पाहिजे असतो व आयात केलेला कोळसा 3.24 द.मे.टन कोळसा मिळावयास पाहिजे असतो. एप्रिल 2012 मध्ये WCL मधून रोज कोळशाच्या 12 रॅक्स उपलब्ध व्हावयास पाहिजे होत्या परंतु त्यापैकी रोज केवळ 6 रॅक्स मिळत आहेत. MCL मधून रोजच्या 6 रॅक्स आल्या पाहिजे परंतु केवळ 3 रॅक्स मिळत आहेत. SCCL मधून 4 रॅक्स आल्या पाहिजे त्या 4 येतात व HCCL मधून 2 रॅक्स आल्या पाहिजे त्या 2 येतात. एकंदरीत कोळशाच्या 28 रॅक्स आल्या पाहिजे परंतु त्यापैकी केवळ 22 रॅक्स कोळसा उपलब्ध होत आहे. कोल मिनिस्ट्री व रेल्वे मिनिस्ट्रीबरोबर सातत्याने संपर्क ठेवण्यात आलेला आहे.

रेल्वे मिनिस्ट्री बरोबर राज्याचे मा. उप मुख्यमंत्र्यांनी अनेकदा बैठका घेतल्यामुळे मध्यंतरीच्या काळात आपल्याला कोळसा पुरेशा प्रमाणात मिळावयास लागला होता. कोल मिनिस्ट्रीबरोबर मा. मुख्यमंत्री तसेच अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली होती. कंपन्याकडून आपल्याला ज्या प्रमाणात कोळसा उपलब्ध व्हावयास पाहिजे तो उपलब्ध होत नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु कोळसा पुरेशा प्रमाणात मिळण्यासाठी आमच्या माध्यमातून व कोल मिनिस्ट्रीच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत.

सभापती महोदय, सद्याच्या परिस्थितीत ऊर्जा संच सुरु आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, दि. 8 एप्रिल, 2012 पासून तांत्रिक कारणामुळे संच बंद झाला असून या संचाच्या पी.ए.फॅनची बेअरींग खराब झाली असून दोन दिवसात हा संच पूर्ववत सुरु होणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अल्पसूचना प्रश्न क्रमांक** :29920...

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कोळसा शिल्लक नसल्यामुळे वीज निर्मितीचे काम बंद पडणार आहे काय ? नियमा प्रमाणे औष्णिक केंद्रामध्ये किती कोळशाचा स्टॉक ठेवणे आवश्यक असते ? आयात कोळसा व इंडियन कोळसा किती खरेदी केला जातो ? इंडियन कोळसा किती वापरावा लागतो व आयात केलेला कोळसा किती वापरावा लागतो ? इंडियन कोळसा मिळत नसेल तर आयात केलेल्या कोळशामुळे आपला फायदा होतो काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, दि. 18.04.2012 पर्यंत आपल्या सर्व प्रकल्पांमध्ये कोळशाचा स्टॉक पुढील प्रमाणे आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असूप्र. 29920....

श्री. राजेंद्र मुळक...

सभापती महोदय, कोराडी येथे 0.17 दशलक्ष मे.टन साठा आहे म्हणजे सहा दिवसांचा साठा उपलब्ध आहे. नाशिक येथे 0.20 दशलक्ष मे.टन साठा आहे म्हणजे 18 दिवसांचा साठा उपलबध आहे. परळी येथे 0.66 दशलक्ष मे.टन साठा आहे म्हणजे 4 दिवसांचा साठा उपलब्ध आहे. भुसावळ येथे 0.72 दशलक्ष मे.टन साठा आहे म्हणजे 10 दिवसांचा साठा उपलब्ध आहे. चंद्रपूर येथे 0.28 दशलक्ष मे.टन साठा आहे म्हणजे 7 दिवसांचा साठा उपलब्ध आहे. पारसमध्ये 0.62 दशलक्ष मे.टन साठा आहे म्हणजे 7 दिवसांचा साठा उपलब्ध आहे. खापरखेडामध्ये 0.61 दशलक्ष मे.टन साठा आहे म्हणजे 4 दिवसांचा साठा उपलब्ध आहे. या उपलब्ध साठयामध्ये रोज कमी-जास्त प्रमाणात वाढ होत असते. आजच्या जनरेशनप्रमाणे कोळसा वापरला गेला असला तरी रोज रेक्स येत असतात त्यामुळे हा साठा पूर्ववत होत असतो. कोराडी, नाशिक, परळी, पारस, भुसावळ, चंद्रपूर इत्यादी ठिकाणी उपलब्ध असलेला साठा कमी जास्त झाला तरी तो एक दोन दिवसात पूर्ववत होतो. आपल्याकडे चार-पाच दिवसांपासून आठ ते दहा दिवसांपर्यन्त नेहमीच साठा उपलब्ध असतो. परळी येथे आयात कोळशाचा वापर केलेला नाही. आपण एकूण साडे सात टक्के आयात कोळसा वापरतो.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय राज्यमंत्री महोदय ने बहुत ही विस्तृत जानकारी यहां पर दी है. उर्जा निर्मिती की स्थिति भी संतोषजनक है. मैं यहां पर दो-तीन छोटे छोटे प्रश्न पूछना चाहता हूं. मेरा पहला प्रश्न यह है कि महामहिम राष्ट्रपति महोदया ने कोल इंडस्ट्री को आदेश दिया है कि आप पॉवर कंपनी से एफएसए साइन करेंगे. इसलिए मेरा प्रश्न है कि महाजेनको ने कोल इंडिया की किसी ईकाई कंपनी से एफएसए साइन अभी तक साइन किया या नहीं किया. इसके अलावा महाजेनको जो भारतीय कोल यूज करती है और जो इम्पोर्टेड कोल है, उसके प्राइस में कितना डिफरेंस है. इसके अलावा मैं कहना चाहूंगा कि मानसून में हमारे देश में कोयले का उत्पादन कम हो जाता है, इस बात को ध्यान में रखते हुए महाजेनको ने कोई कॉन्टीजेंसी प्लान बनाया है या नहीं, ताकि मानसून में कोयले का एवरेज स्टॉक कम न होने पाए ?

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असूप्र. 29920....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी एफएसएसआय च्या संदर्भात माहिती घेऊन माननीय सदस्यांना सांगतो. कोळशाच्या साठयाबाबत आजची परिस्थिती मी आपणाला सांगितली. पावसाळयाच्या दिवसात अनेक वेळा आपल्याला माती मिश्रित आणि ओला कोळसा अनेक पॉवर स्टेशनला प्राप्त होतो. त्या संदर्भात आम्ही दक्षता घेण्याचे काम केले आहे. मागील काळात या संदर्भात ज्या काही अडचणी आल्या त्या दूर करुन पावसाळयामध्ये कोणत्याही प्रकारे आपल्याला त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. भुसावळ सोडून सर्व प्रकल्पाबाबत एफएसएसआय बरोबर ॲग्रिमेंट साईन केले आहे. त्याचप्रमाणे आयात कोळसा आणि स्थानिक देशातील कोळसा यामधील दराच्या संदर्भात माननीय सदस्यांना माहिती देण्यात येईल.

-------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बोगस सोयाबीन बियाण्याचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१) * *२५१६८ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.केशवराव मानकर , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.एम.एम.शेख , श्री.धनंजय मुंडे , श्री.संदिप बाजोरिया , श्री.किरण पावसकर , श्री.सतीश चव्हाण , श्री.हेमंत टकले , श्री.अनिल भोसले , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे*** : सन्माननीय ***कृषी मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसप मुरुड (जि.लातूर) येथील शेतकऱ्यांना एका खाजगी शेतकऱ्यांना खरिपाचे बियाणे रब्बीला देवून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याची घटना दिनांक १७ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच मराठवाड्यातील लातूर व विदर्भातील बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अमरावती जिल्ह्यासह अनेक जिल्ह्यांमधील खरीप हंगामासाठी महाबीज कंपनीसह अनेक खाजगी कंपन्यांकडून घेण्यात आलेले सोयाबीन बी न उगवल्याने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही अद्याप शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याची बाब दिनांक ४ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ११३ पैकी फक्त ६८ कंपन्यांनाच बियाणे विकण्याची परवानगी असल्याचे कृषी आयुक्तालयाने केलेल्या चौकशीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, या प्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडे तक्रार केल्यानंतर सदर विभागाने बियाणे व शेतीचा पंचनामा करुनही अद्याप नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या महाबीजसह सर्व संबंधित कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई त्वरित देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या करिता** : (१) पळसप ता.जि.उस्मानाबाद येथील २ शेतकऱ्यांनी, यशोदा हायब्रीड सीडस उत्पादित ज्वारीचे मोती या वाणाचे बियाणे रब्बी हंगामात पेरणी केल्याने पिकाची वाढ खुंटली व त्यास फुटवे फुटल्याबाबत तक्रार केलेली होती. त्यानुषंगाने तालुकास्तरीय समितीमार्फत तपासणी करण्यात आलेली असून कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे आढळून आलेले नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २५१६८...

(२) खरीप २०११ हंगामात सोयाबीन बियाण्याच्या उगवणी संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये मराठवाडयातील लातूर व विदर्भातील बुलढाणा, वाशिम, यवतमाळ व अमरावती जिल्ह्यासह राज्यातील एकूण २५ जिल्ह्याचा समावेश आहे. आतापर्यंत या जिल्ह्यातील ५७३० पात्र शेतकऱ्यांना संबंधित कंपन्यामार्फत रूपये २ कोटी ३८ हजार नुकसान भरपाई देण्यात आली असून, वाटपाची प्रक्रिया अद्याप सुरू आहे.

(३) हे खरे नाही. प्रत्यक्षात सोयाबीन बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्या ११३ नसून ७५ आहेत. त्यापैकी ७३ कंपन्या परवानाधारक असून २ कंपन्यांनी विनापरवाना विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्यावर पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

(४) हे खरे नाही. आतापर्यंत राज्यातील ५७३० पात्र शेतकऱ्यांना रूपये २ कोटी ३८ हजार नुकसान भरपाई देण्यात आली असून वाटपाची प्रक्रिया सुरू आहे.

(५) आतापर्यंत राज्यातील ५७३० शेतकऱ्यांना रू.२कोटी ३८ हजार नुकसान भरपाई महाबीज व खाजगी कंपन्यामार्फत बियाणे व रोख स्वरूपात देण्यात आली आहे. नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही अद्यापही सुरु आहे.

सोयाबीन बियाणे उगवणीबाबत तक्रारी असणाऱ्या सर्व संबंधीत कंपन्यांना नियंत्रण आदेश १९८३ अंतर्गत कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. त्यानुषंगाने पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे आणि शेतकऱ्यांचा पहिला प्रश्न आहे. त्यामुळे त्यांना न्याय मिळण्यासाठी आपण मला अधिक संधी द्यावी अशी विनंती करुन मी पहिला प्रश्न विचारतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25168

श्री.सय्यद पाशा पटेल....

सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात कंपनीनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे आढळून आलेले नाही असे नमूद केले आहे. दैनिक सकाळचे कात्रण माझ्याकडे आहे. यात असे नमूद करण्यात आले आहे की, निकृष्ट दर्जाच्या संकरित ज्वारीच्या बियाणाचे 4 ते 5 फुटवे फुटले आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. मला पाच प्रश्न विचारावयाचे आहेत.

**सभापती** : आपण प्रथम दोन प्रश्न विचारावेत. वेळ उपलब्ध असेल तर नंतर मी आपल्याला आणखी प्रश्न विचारण्याची संधी देईन.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, एक धाट यावे म्हणून आम्ही ज्वारीचे बियाणे घेतो. पण एका बियाला पाच फुटवे फुटले. याचा अर्थ या बियाणामध्ये दोष होता. तो आपण कबूल केले पाहिजे. शेतीशी संबंधित असलेले अधिकारी आहेत त्यांना आपण विचारावे की एक धाट येण्याऐवजी पाच धाट आले तर ते बियाणे सदोष मानावयाचे काय ? हे चूक आहे की नाही हे आपल्या अधिकाऱ्यांना विचारावे. हे चुकीचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, 25 जिल्ह्यांमध्ये 5730 शेतकऱ्यांना सोयाबीनचे बोगस बियाणे मिळाले आहे. लातूर जिल्हा कृषी अधिकाऱ्याचा माझ्याकडे जिल्ह्याचा रिपोर्ट आहे. त्यावर त्यांची सही आहे. एकट्या लातूर जिल्ह्यामध्ये 1127 शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. 1162 हेक्टरवर बोगस बियाणे पेरण्यात आले आहे. एका जिल्ह्यामध्ये 1100 शेतकरी बोगस बियाणे दिल्या संबंधीची तक्रार करतात. मग 25 जिल्ह्यांमध्ये काय परिस्थिती असेल. आपण किती बियाणे उत्पादकांची बाजू घेणार आहात ? तेव्हा ही जी आकडेवारी आहे ती खोटी आहे काय ? ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाल आहे, त्यांना कशा प्रकारची नुकसान भरपाई देणार आहात ? तसेच, यावर्षी आपले बियाण्यांचे उद्दिष्ट काय आहे ? 21000 बियाणे तपासण्याचे उद्दिष्ट आपण जाहीर केले आहे. यासाठी आपल्याकडे किती प्रयोगशाळा आहेत ? आपल्याकडे तीनच प्रयोगशाळा आहेत. 620 बियाणे उत्पादक कंपन्या आहेत. 1लाख 5 हजार 132 विक्रेते आहेत. त्यामुळे आपण कशी काय तपासणी करणार आहात आणि शेतकऱ्यांना न्याय देणार आहात ? त्यामुळे आपले उद्दिष्ट साध्य होणार आहे काय ? झाले तर शेतकऱ्यांना न्याय मिळणार आहे काय ?

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्वारीच्या बियाण्यासंबंधी पहिला प्रश्न विचारला आहे. ज्वारीच्या बियाण्यासंबंधी दोन शेतकऱ्यांनी दिनांक 29.12.2011 रोजी तक्रारी केल्या होत्या. त्यात असे म्हटले होते की, आम्ही जी ज्वारी पेरली त्याची वाढ एक ते दीड फुट एवढी झाली आणि त्याला 4-5 प्रकारचे उगवे फुटले. हे यशोदा हायब्रीड सिड चे बियाणे होते. हे वाण मोती संकरित ज्वारीचे होते. ते त्यांनी पेरले होते. या वाणाची खरीप हंगामामध्ये आणि उन्हाळ्यामध्ये पेरणी करायची होती. या वाणाच्या पिशवीवर स्पष्ट लिहिले होते की, हे बियाणे खरीप आणि उन्हाळ्यामध्ये वापरावे. पण या शेतकऱ्यांनी हिवाळ्यामध्ये म्हणजे रब्बी हंगामामध्ये या बियाणांची पेरणी केली. ऑक्टोबरमध्ये या बियाण्याची पेरणी केली. त्यामुळे जी उगवण झाली त्याला 4-5 प्रकारचे फुटवे आले आणि त्याची वाढ कमी झाली. यात बियाण्याचा कुठलाही दोष नाही. पेरणी चुकीच्या हंगामामध्ये केल्यामुळे आपल्याला दोष बघायला मिळाला आहे.

दुसरा प्रश्न सोयाबीन संबंधी उपस्थित केला आहे. महाबीजच्या सोयाबीन संबंधी राज्यात एकूण 20574 इतक्या तक्रारी आल्या आहेत. तक्रारीचे एकूण क्षेत्र 36430 हेक्टर एवढे दाखविण्यात आले आहे. महाबीजच्या माध्यमातून 3554 शेतकऱ्यांना रूपये 117 लाखाची नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

यानंतर सौ.रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर . . ..

आतापर्यंत राज्यामध्ये एकूण नुकसान भरपाई ही रु. 2 कोटी 2 लाख 80 हजार इतकी महाबीज आणि एकूणच बियाण्यांच्या बाबतीत देण्यात आली आहे.तसेच यामध्ये बियाण्यांचे नमुने तपासण्याच्या बाबतीत माहिती विचारली आहे. याबाबत सांगावयाचे तर आता यापुढे राज्यात अशा प्रकारच्या बियाण्यांच्या बाबतीत तक्रारी येऊ नयेत याबाबत दखल घेण्याच्या दृष्टीने कंपन्या ज्या पध्दतीचे बियाणे उत्पादन करतील त्यातील जास्तीतजास्त नमुने घेऊन प्लॉट पेरण्यांच्या बाबतीत ट्रायल घेतली जाणार आहे आणि त्याची उगवण क्षमता 60 किंवा 70 टक्क्याच्यावर असेल तरच त्याला मान्यता देऊ अशा प्रकारे जास्तीतजास्त प्लॉटींग घेण्याचे काम केले जाणार आहे. या माध्यमातून जर कोणी बोगस बियाण्यांचे उत्पादन केले असेल तर त्याची मध्येच तपासणी केल्यानंतर आपल्याला त्याला पायबंद बसविता येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,हा राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे आणि माननीय मंत्री महोदय याला गोलगोल उत्तरे देत आहेत. याठिकाणी दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "खरीप 2011 हंगामात सोयाबीन बियाण्याच्या उगवणी संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये मराठवाड्यातील लातूर व विदर्भातील बुलढाणा, वाशिम, यवतमाळ व अमरावती जिल्ह्यासह राज्यातील एकूण 25 जिल्ह्याचा समावेश आहे. आतापर्यंत या जिल्ह्यातील 5730 पात्र शेतकऱ्यांना संबंधित कंपन्यांमार्फत रुपये 2 कोटी 38 हजार नुकसान भरपाई देण्यात आली असून, वाटपाची प्रक्रिया अद्याप सुरु आहे" मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, राज्यामध्ये एकूण नुकसान भरपाई ही 2 कोटी 2 लाख 80 हजार इतकी महाबीज आणि एकूणच बियाण्यांच्या बाबतीत देण्यात आली आहे. तसेच आजच या विषयाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना देण्यात आलेली आहे. त्यामध्ये माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते तपासून पहावे. महाराष्ट्र राज्यात बियाण्यांच्या बाबतीत एकूण 20 हजार तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. पण लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे 32,273 तक्रारी प्राप्त झालेल्या असून याचे एकूण क्षेत्र 36,521 हेक्टर इतके आहे.याठिकाणी उत्तरामध्ये जी आकडेवारी दिलेली आहे ती विसंगत आहे.

सभापती महोदय, सदरहू प्रश्न मागील हिवाळी अधिवेशनामध्ये देखील उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, अशा संबंधित कंपन्यांवर कारवाई केली जाईल आणि ताबडतोब या कंपन्यांची लायसन्स रद्द केली जातील. याबाबतीत माझा

20-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-2
APR/ D/ ST/ 11:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

स्पेसिफीक प्रश्न आहे. याठिकाणी असे सांगण्यात आले की,राज्यात बियाणे उत्पादन करणाऱ्या 113 कंपन्या नाहीत. मग बियाणे उत्पादित करणाऱ्या राज्यात एकूण किती कंपन्या आहेत? एकंदर 32 हजार तक्रारी आलेल्या आहेत. या तक्रारी कोणकोणत्या कंपन्यांबाबत आहेत आणि त्यांच्यापैकी किती कंपन्यांवर कारवाई करण्यात आली आहे? महाराष्ट्रामध्ये जवळपास 45 कंपन्या या बोगस बियाणे पुरविणाऱ्या आहेत आणि हे रेकॉर्डवर आलेले आहे. असे असताना देखील अधिकारी या सर्व कंपन्यांना आणि बियाणे महामंडळाला पाठीशी घालत आहे. बियाणे महामंडळ सुध्दा बोगस बियाणे खरेदी करते. मी मागच्यावेळी सांगितले होते की, मध्य प्रदेशातील कॉटन मार्केटमधून सोयाबीनची खरेदी केली जाते आणि त्याचा प्लॉट बनवून राज्य बियाणे महामंडळाला विकली जाते याची चौकशी झालेली नाही. म्हणून या सर्व प्रकरणामुळे हजारो शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असून ते डुबलेले आहेत आणि राज्य शासन व अधिकारी थंडपणे बसलेले आहेत. पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळ होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.याबाबतीत 32 हजार तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्याची चौकशी करुन ताबडतोब त्या शेतकऱ्यांना मदत देणार आहात काय? तसेच ज्या 45 बोगस कंपन्या आहेत, त्यांची नावे काय आहेत? या कंपन्यांवर कारवाई करुन शासन ताबडतोब त्यांची लायसन्स रद्द करणार आहे काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आकडेवारीतील तफावत सांगितली. त्यामध्ये महाबीजच्या बियाण्यांच्या संदर्भातील तक्रारींची संख्या 20,574 इतकी होती आणि सन्माननीय सदस्य सांगत आहेत,त्याप्रमाणे एकंदर 32 हजार 273 इतकी आहे.या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित केला की, बियाण्यांच्या एकूण 75 कंपन्या आहेत. त्यांच्या माध्यमातून बियाण्यांचा पुरवठा केलेला आहे. 68 कंपन्या आयुक्तालय स्तरावर, 5 कंपन्यांना क्षेत्रीय स्तरावर आणि 2 कंपन्यांनी विना परवानगी व्यवहार केलेला आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्ुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25168 .... श्री. गुलाबराव देवकर....

यामध्ये एकूण 68 कंपन्यांना कारणे दाखवा नोटिसेस बजावलेल्या आहेत. ज्या 68 कंपन्यांना कारणे दाखवा नोटिसेस बजावल्या त्यापैकी 19 कंपन्यांनी खुलासा सादर केलेला नाही. त्यांच्यापैकी एका कंपनीचा विक्री परवाना रद्द केलेला आहे. 18 कंपन्यांचा विक्री परवाना ताबडतोबीने रद्द करीत आहोत. ज्या दोन कंपन्यांनी विनापरवाना विक्री केलेली आहे त्यांच्यावर पोलीस केसेस दाखल केलेल्या आहेत. दोन ठिकाणी जप्तीच्या कारवाया केलेल्या आहेत. त्यामध्ये जवळपास 6.58 लाख रुपयांचा 154.55 क्विंटल साठा जप्त केलेला आहे. 50 कंपन्यांनी नुकसान भरपाई दिलेली आहे. त्यामध्ये 2 कोटी 2 लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळालेली आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी प्रयोग शाळेच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. आपल्या ज्या 3 प्रयोगशाळा आहेत त्यांची क्षमता किती आहे आणि खरोखरच तपासणी करुनच हे बियाणे शेतकऱ्यांना मिळणार आहे का ? एकूण संख्येचा विचार करता आपली जी उपाययोजना आहे त्यामध्ये हे शक्य होणार आहे का आणि ते कसे करणार ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, वेगळ्या पध्दतीने तपासणीच्या संदर्भात खुलासा केलेला आहे. काही तपासण्या लॅबमधून केल्या जातात आणि दुसरे म्हणजे एखाद्या बियाणाचे उत्पादन झाल्यानंतर आणि मार्केटमध्ये एकत्रित बियाणे आल्यानंतर त्यामधून लॉट घ्यावयाचा, एखादे सॅम्पल घ्यावयाचे आणि त्या सॅम्पलची उगवण क्षमता तपासण्याची पध्दती या वर्षापासून सुरु करीत आहोत. त्यामध्ये जर 60-70 टक्केपेक्षा जास्त उगवण क्षमता आली तरच त्याला मान्यता देणार आहोत. संपूर्ण राज्यामध्ये सर्व बियाणे कंपन्याच्या संदर्भामध्ये अशी पध्दत करण्याचे धोरण घेत आहोत. त्यामुळे लॅब कमी असण्याचा संबंध यामध्ये येणार नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, उत्तरामध्ये शासनाने मान्य केलेले आहे की, या कंपन्यांची बोगस बियाणे दिलेली आहेत. म्हणूनच तुम्हाला नुकसान भरपाई देण्याची वेळ आलेली आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, हे बियाणे खरीप आणि उन्हाळी पिकासाठी वापरावयाचे असताना शेतकऱ्यांनीच ते बियाणे रब्बी पिकासाठी वापरले. म्हणजे शेतकरी

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/ KTG/

ता. प्र. क्र. 25168 .... श्रीमती शोभा फडणवीस ....

वाचू शकत नाही का, त्याला काही कळत नाही का ? अशा पध्दतीने हे सर्व शेतकऱ्यांवरच सोपवून तुम्हीच तुमचे नुकसान केले असे सांगावयाचे आणि त्यांना नुकसान भरपाई द्यावयाची नाही हे बरोबर नाही. यशोदा कंपनीची ही एकच तक्रार नाही. या आधी सुध्दा तक्रारी आलेल्या आहेत. म्हणून या कंपनीला काळ्या यादी घालणार का आणि ज्या लोकांचे नुकसान झाले त्यांना नुकसान भरपाई देणार का ? ज्या 68 कंपन्यांनी बोगस बियाणे दिलेले आहे त्यांना काळ्या यादीत घालून त्यांच्यावर कारवाई करणार का ? शासन बोगस बियाणाच्या संदर्भात कायदा करण्यासाठी विधेयक आणणार होते. दोन वर्षापूर्वी ते मान्य केले होते. तो कायदा केव्हा आणणार ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, ज्वारी बियाणाच्या संदर्भामध्ये मी अगोदरच सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, त्या कंपनीवर कारवाई करणार का ? यामध्ये कंपनीचा दोष कोठे दिसत नाही. यामध्ये दोन निष्कर्ष आहेत...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, हायब्रीड सीड कंपनीचे मोती संकरीत ज्वारीचे वाण जे पेरण्यात आले होते त्या बाबतीत आम्ही कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर येथील विशेष तज्ज्ञांना बोलाविले होते तसेच यामध्ये तालुकास्तरीय समितीने सुध्दा चौकशी केली. या दोन माध्यमातून चौकशी केल्यानंतर स्पष्ट निष्कर्ष निघालेला आहे की, या शेतकऱ्यांनी या बियाण्याची रब्बीच्या हंगामाध्ये पेरणी केली होती.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25168.... श्री.गुलाबराव देवकर..

त्यामुळे बियाणे उगवण्याचा, अंकुर फुटण्याचा प्रश्न निर्माण झाला असा स्पष्ट निष्कर्ष आलेला आहे. त्यामुळे या कंपनीला पाठीशी घालण्याचा सरकारचा उद्देश नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. या बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे बियाणे बोगस होते या दोन्ही बाबी मंत्री महोदय कबूल करीत आहेत. बियाण्यांच्या पिशवीवर बियाणे प्रमाणित असल्याचा संदेश लिहिलेला असतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी जेवढे बियाणे पेरले असेल तेवढे ते उगवले पाहिजे असे मी समजतो. शासनाकडून नुकसान भरपाई देण्यासाठी वेगवगळे निकष लावले जातात. प्रमाणित बियाणे वापरल्यानंतर अपेक्षित उत्पादन आले नाही तर त्या उत्पादनापोटी नुकसान भरपाई देण्यासंबंधी शासन कायदा करणार आहे काय ? कारण सध्या तसा कायदा अस्तित्वात नाही. म्हणून विद्यमान कायद्यात बदल करुन शेतकऱ्यांना शासन दिलासा देणार आहे काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, बियाण्यांच्या संदर्भात शेतकऱ्यांची सातत्याने फसवणूक केली जाते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे या मताशी मी देखील सहमत आहे. परंतु नॅशनल सिड ॲक्ट केंद्र सरकारचा असल्यामुळे राज्य सरकारवर मर्यादा येतात. त्यामुळे राज्य सरकारला त्यामध्ये हस्तक्षेप करता येत नाही. महाराष्ट्रातील बियाणे विधेयकात आवश्यक त्या सुधारणा करण्याचे विधेयक माननीय राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर केले होते. राज्यसभेतही केंद्र सरकारने सेंट्रल सिडस् बिल सादर केले होते. ते विधेयक पुन्हा विचारार्थ सादर करावे अशी चर्चा झाली आहे. शेतकऱ्यांची बियाण्यांमध्ये फसवणूक होत असल्यामुळे या बियाणे कायद्यात तत्काळ दुरुस्ती करण्याबाबत राज्य सरकारकडून सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जात आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर मागील नागपूर अधिवेशनामध्ये सोयाबीनबाबत चर्चा झाली होती. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी याबाबत आग्रहाने कार्यवाही करण्याची मागणी सरकारकडे केली होती. पेरणीच्या काळातील परिस्थिती, नैसर्गिक स्थिती अशी अनेक कारणे कंपन्यांकडून दिली जातात. तथापि, इंदौरमधील राष्ट्रीय सोयाबीन संशोधन संस्थेकडून तज्ज्ञांना बोलावून सर्व

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ ST/

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

परिस्थितीचा आढावा घेतला होता. परंतु बियाणे महामंडळाकडून विशेषत: सोयाबीनच्या बियाण्याच्या बाबतीत जो प्रकार घडला होता त्यासंबंधी शेतकऱ्यांना रक्कम दिली आहे. काही रक्कम खाजगी कंपन्यांकडून दिली आहे. राज्यात 113 कंपन्या कार्यरत आहेत. आपली अडचण अशी आहे की, या कंपन्यांकडून ट्रूथफूल सिडस् एकदम बाजारामध्ये आणतात. प्रमाणित सिडस्बाबत शासनाने अनेक निकष लावलेले आहेत. पण या वर्षी तशी फसवणूक होऊ नये असा शासनाचा प्रयत्न आहे. या वर्षी ज्या शेतकऱ्यांनी फसवणुकीबाबत तक्रारी केलेल्या आहेत त्या कंपन्यांचे या हंगामाकरिता त्यांचा बियाणे विक्रीचा परवाने रद्द करण्यात येतील. याबाबतीत योग्य ती कारवाई करील. राज्यामध्ये कंपन्यांना कोणतेही नवीन बियाणे आणावयाचे असेल तर त्यांनी दोन वर्षे अगोदर सरकारला सूचित करावे, त्या दोन वर्षात कृषी विद्यापीठाच्या परिक्षेत्रामध्ये ट्रायल पूर्ण करावेत....

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:05

ता.प्र.क्र. 25168.... श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

आणि कृषी विद्यापीठाच्या संमतीने बाजारात आणावे असे नवीन धोरण कंपनीच्या संदर्भात घेतलेले आहे. ही भविष्यातील योजना आहे. खरे म्हणजे ज्यांच्या तक्रारी आहेत त्यांनी ग्राहक मंचाकडे जायला पाहिजे. ग्राहक मंचातर्फे न्याय मिळण्याची व्यवस्था प्रचलित धोरणामध्ये आहे. कंपन्यांनी राज्यामध्ये बियाणे विक्री करण्याच्या संदर्भात आपण कारवाई करु शकतो. पण कायद्याच्या काही मर्यादा आहेत. भविष्यामध्ये शेतक-यांची फसवणूक होणार नाही याची निश्चितपणे काळजी घेण्यात येईल.

श्री. सय्यद पाशा पटेल : दोन कंपन्या विनापरवाना बियाण्याची विक्री करताना सापडल्या असे मंत्री महोदयांनी सांगितले. दिनांक 18 जानेवारी 2013च्या "ॲग्रोवन"च्या अंकामध्ये विनापरवाना बियाण्याची विक्री करणा-या 45 कंपन्यांची नावे दिलेली आहेत. सिद्दी सीडस्, हिरामोती सीडस्, तीरुपती सीडस्, मोदी सीडस् अशी त्यांची नावे आहेत. मी सर्वच नावे वाचून दाखवत नाही. माननीय मंत्री महोदयांनी दोनच कंपन्यांची नावे सांगितली. मग विश्वास कोणावर ठेवावा ? महाराष्ट्रातील जनतेला असत्य माहिती का देण्यात येत आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती थोडी विसंगत दिसते. माझ्याकडे असलेली सर्व सीड कंपन्यांची नावे मी पटलावर ठेवायला तयार आहे. बियाणे उत्पादक क्षेत्रामध्ये काम करणा-या 113 कंपन्या आहेत. विविध कंपन्या विविध प्रकारचे वाण तयार करीत असतात. ज्या कंपन्यांच्या नावाचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्या कंपन्यांची नावे देखील माझ्याकडे आहेत. ज्या कंपन्याविरोधात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्या कंपन्यांची नावे मी सांगितली. महिको सारख्या मोठ्या कंपनीविरोधात देखील आपण फौजदारी गुन्हे दाखल केले होते. 16 ठिकाणी दावे चालू होते. शेतक-याच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकार कारवाई करीत आहे. गेल्या हंगामामध्ये 75 कंपन्यांच्या परवान्याच्या संदर्भात कारवाई केलेली आहे. सोयाबीनचा प्रश्न हा मर्यादित कंपन्यापुरता होता. 113 कंपन्यांवर कारवाई करता येणार नाही. ज्या कंपन्या बोगस बियाण्याच्या उत्पादनामध्ये गुंतलेल्या आहेत त्या सर्व कंपन्याविरुध्द कारवाई करु. जानेवारी महिन्यामध्ये 68 कंपन्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. 49 कंपन्याकडून खुलासा प्राप्त झालेला आहे. 19 कंपन्यांचे परवाने रद्द केलेले आहेत. या सर्व कंपन्यांवर बारकाईने नियंत्रण ठेवण्यासाठी सीड सर्टिफिकेशन ॲथॉरिटीला सूचना दिलेल्या आहेत. असे प्रकार पुन्हा





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:05

ता.प्र.क्र. 25168.... श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

घडु नयेत म्हणून शासनाकडून काळजी घेतलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदयांनी सांगितले की, 50 कंपन्यांनी नुकसान भरपाईपोटी 2 कोटी 2 लाख रुपये दिलेले आहे. किती शेतक-यांना नुकसान भरपाई दिलेली आहे ?

....नंतर श्री. गिते...

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.... ता.प्र.क्र.25168.....

याचा अर्थ या कंपन्यांनी गुन्हा केला नसता तर नुकसान भरपाई दिली नसती. त्या कंपन्यांनी नुकसान भरपाई दिली याचा अर्थ त्या कंपन्यांनी गुन्हा केलेला आहे. आपण या 50 कंपन्यांवर कारवाई करणार आहात काय ? हा फक्त 19 कंपन्यांचा विषय नाही. या कंपन्या 2 कोटी रुपये नुकसान भरपाई देऊ शकतात, त्या अर्थी या कंपन्या बोगस बियाणे शेतकऱ्यांना देतात आणि शेतकऱ्याला फसवितात. म्हणून या 50 कंपन्यांवर ताबडतोबीने कारवाई करण्यात येईल काय ? तसेच या कंपन्यांची नावे काय आहेत ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सदर कंपन्याची नावाची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन. राज्यातील 22 जिल्हयातील 136 तालुक्यातून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. यात 3369 शेतकरी आहेत. या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला गेला, त्या मुद्याशी मी सहमत आहे. यासंबंधी सर्व्हे पूर्ण केल्यानंतर 5500 शेतकऱ्यांना 2 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. मी मघाशी सांगितले की, 49 कंपन्यांचे खुलासे प्राप्त झालेले आहे. 19 कंपन्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. या कंपन्यांचे खुलासे आले असले तरी त्याबाबतीत शासनाचे समाधान झालेले नाही. या बाबतीत विशेष मोहीम हाती घेऊन या कंपन्यांवर कारवाई करता येईल काय याची माहिती जाणुन घेऊन संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याबाबतीत शासन निश्चितपणे सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारण्यास तयार आहे.

श्री. दिवाकर रावते : बोगस बियाणे तयार करणाऱ्या कंपन्यावर कारवाई, त्यांच्याकडून नुकसान भरपाईची वसुली हा विषय अनेक वेळा चर्चिला गेलेला आहे. मूलभूत प्रश्नाचे आपण मघाशी उत्तर दिले आहे. या प्रश्नाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय आपणाला सांगावा लागेल. मघाशी उत्तर देताना या ठिकाणी सांगितले गेले की, खरिपाचे बियाणे रब्बी हंगामात पेरल्याने ते फुकट गेले. याचा अर्थ कंपनी बरोबर आहे आणि शेतकरी मूर्ख आहेत. बी.टी.कॉटनच्या बॅगवर लिहिलेले असते की, कोरवाहू जमिनीकरिता नाही. तरी देखील विदर्भामध्ये तेच बियाणे विकले जाते. 382 कंपन्या बी.टी.कॉटनच्या बियाण्यांची विक्री करीत आहेत. ते बियाणे विक्री करण्यास आपण मान्यता देता. आपले अधिकारी फक्त बघ्याची भूमिका घेतात. शेवटी शेतकरी मरतो. त्यानंतर आम्ही सभागृह डोक्यावर घेऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून मागणी

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25168....

श्री. दिवाकर रावते...

करतो. शेतकऱ्यांचे नुकसान होते, त्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. कोरडवाहू जमिनीकरिता नसलेले जेवढे बी.टी.कॉटन बियाणे आहे, ते बियाणे पुढच्या वर्षी न येता पुढील वर्षी कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दुसरे वाण उपलब्ध करुन देण्यात येईल काय व सध्या मार्केटमध्ये जे बी.टी.कॉटन बियाणे आहे, ते परत घेण्यात येईल काय?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : बी.टी.कॉटनच्या संदर्भात जी काही क्रांती झाली ज्यामुळे शेतकरी ते बियाणे स्वीकारु लागला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ग्रामीण भागात फिरत असल्यामुळे यासंबंधी त्यांना चांगली माहिती आहे. तसेच याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर साहेबांना देखील माहिती आहे. बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या संपूर्ण पिकांचे नुकसान झालेले आहे अशा या पूर्वी घटना घडलेल्या आहेत. टर्मिनेटन जीन आला, त्यानंतर आपण नवीन तंत्रज्ञान स्वीकारले. शेतकऱ्यांना काही काळ चांगला निकाल मिळाला होता. अपवादात्मक परिस्थितीमध्ये जिराईत भागाकरिता हे वाण प्रचलित नाही. कारण पाण्याचा थोडा ताण पडला तर त्या पिकावर लाल्या रोग येण्यास सुरुवात होते. या गोष्टीचा आपण अनुभव घेतलेला आहे. नांदेड 44 सारखी कापसाची व्हरायटी देखील होती. परंतु याबाबतीत शेतकऱ्यांचा जो कल आहे तो बी.टी.कडे अधिक वाढत चालला आहे. या बियाण्याचा प्रचार आणि प्रसार शासनाने केलेला नाही. शेतकऱ्याला त्याचे महत्व होते, मधल्या काळात पाऊस चांगला झाला. शेतकऱ्यांना उत्पन्न चांगले मिळाले. त्यामुळे ते बियाणे शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात स्वीकारले. बी.टी.बियाण्याचा वापर करावा असे कोणत्याही कृषी बाजार समित्यांनी प्रचार केला नाही. याबाबतीत शेतकऱ्यांनी आपली मानसिकता बदलली पाहिजे. शासन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करु शकते. खरिपात पेरण्याऐवजी रब्बी हंगामात बियाणे पेरले म्हणून असे घडले असे आमचे अधिकारी सांगत असले तरी ते कारण मला देखील संयुक्तिक वाटत नाही. बोगस बियाणे कंपन्यांना संरक्षण देण्याची शासनाची भूमिका मुळीच नाही. त्या कंपन्यांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. भविष्यामध्ये शेतकऱ्यांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन करण्यासाठी आवश्यक ती पाऊले उचलली जातील.

-----------

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KTG/ प्रथम श्री.शिगम 12:10

## सिंचनाचा अनुशेष असलेल्या जिल्ह्यांना ९० टक्के अनुदानावर ठिबक व तुषार संच पुरविण्याबाबत

**(२) *   २५८१६**   ***श्री.विनोद तावडे , श्री.पांडुरंग फुंडकर , डॉ.रणजित पाटील , श्री.चंद्रकांत पाटील*** :
सन्माननीय ***कृषी मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचनाच्या तुषार सिंचन, ठिबक सिंचन या पध्दतीमुळे सिंचनाच्या क्षेत्रात तिप्पट वाढ होऊन उत्पादनातसुध्दा चांगली वाढ होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुषार व ठिबक सिंचन वापरण्यास प्रोत्साहन देण्यासाठी शासनातर्फे ५० टक्के सबसिडी देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणातील सिंधुदुर्ग व विदर्भातील बुलढाणा, अकोला व इतर जिल्ह्यांमध्ये सिंचनाचा अनुशेष मोठया प्रमाणात वाढलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सिंचनाचा अनुशेष लगेच दूर होण्याची शक्यता नसल्याने सिंचनाचा अनुशेष असलेल्या जिल्ह्यांमध्ये ९० टक्के अनुदानावर तुषार व ठिबक सिंचनाचे संच पुरविल्यास अनुशेषग्रस्त भागात सिंचनाचे क्षेत्र वाढेल, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे.
कारण ठिबक सिंचनामुळे सिंचनाच्या क्षेत्रात साधारणत: दुप्पट वाढ होते.

(२) अंशत: खरे आहे.

केंद्रपुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ६०% व बहुभूधारक शेतकऱ्यांना ५०% दराने अनुदान देय आहे.

(३) संबंधित नाही.

(४) सिंचन अनुशेष ही बाब सूक्ष्म सिंचनाशी संबंधित नाही. तथापि ९० टक्के अनुदानावर तुषार व ठिबक संच पुरविल्यास सिंचनाच्या क्षेत्रात वाढ होऊ शकेल.

(५) तथापि, केंद्र शासनाकडून या योजनेसाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित राहू नयेत म्हणून ही योजना राज्य योजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सूक्ष्म सिंचनास प्रोत्साहन देण्याची गरज आहे. मेजर सिंचनामध्ये पाण्याचे सिंचन होते की पैशांचे सिंचन होते यासंदर्भात अंतिम आठवडा प्रस्तावाच्या अनुषंगाने बोलणार असल्याने यासंदर्भात आता काही विचारु इच्छित नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/पूर्वी श्री.गिते 12:15

ता.प्र.क्र.25816.......... श्री.विनोद तावडे.....

सूक्ष्म सिंचनाबाबत मी बजेटच्या भाषणामध्ये देखील मत मांडले होते. शेजारच्या कर्नाटक राज्याने सूक्ष्म सिंचनासाठी 100 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. राज्य शासनाच्या ही बाब विचाराधीन आहे असे म्हटले आहे. केंद्र सरकारकडून निधी कमी उपलब्ध होतो की मॅचिंग ग्रँट न दिल्यामुळे निधी परत जातो? राज्य सरकारची योजना ठराविक कालमर्यादेत पूर्ण होईल काय? केंद्र सरकारकडून येणारा निधी वापरला जात नसेल तर त्याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर निश्चित करणार आहात काय? शासनाची योजना केव्हा सुरु होईल?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सूक्ष्म सिंचनाचे राज्याचे धोरण फार जूने आहे. फक्त अनुदानात वाढ करावी अशी सातत्याने मागणी केली जात आहे. केंद्र सरकारकडून 50 ते 60 टक्के अनुदानासाठी रक्कम येत असते. राज्य सरकारची मॅचिंग ग्रँट आपण देत असतो. गतवर्षी 700 कोटी रुपयांपर्यंत सूक्ष्म सिंचनावर खर्च झालेला असून दरवर्षी खर्च वाढत आहे. या वर्षी सुध्दा सूक्ष्म सिंचनावरील खर्च वाढणार आहे. केंद्र सरकारचा निधी परत जाण्याचा प्रश्न नाही. शेतकऱ्यांकडून एकच मागणी केली जाते की, अनुदानात वाढ करण्यात यावी. राज्य सरकारची भूमिका ही आहे की, सबसिडी वाढली की किंमती वाढतात. त्यामुळे या वर्षी सर्व कंपन्यांशी चर्चा केल्यानंतर राज्य सरकारने निर्णय घेतला की, राज्य सरकारच्या स्तरावर दर निश्चित करण्यात यावेत. आता जवळजवळ 15 ते 20 टक्के दर कमी झाले आहेत. दर कमी करण्याची भूमिका घेतल्यानंतर ग्लोबल टेंडर या महिन्यात प्रसिध्द होईल. कमीत कमी 30 ते 35 टक्के दर कमी होतील. क्षेत्र वाढत चालले आहे. लोकांची मागणी वाढत आहे. सबसिडी वाढविण्यापेक्षा विकसित तंत्रज्ञानाद्वारे अधिकाधिक चांगले तंत्रज्ञान देताना किंमत कमी व्हावी यासाठी राज्य सरकारने प्रयत्न सुरु केले आहेत. निश्चितपणे आम्हाला यामध्ये यश मिळत आहे व अधिक क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली यावे यासाठी राज्य सरकारने कार्यवाही सुरु केली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शासन दर कमी करण्यास प्रयत्नशील असल्याबद्दल मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. सूक्ष्म सिंचन आणि तुषार सिंचन याकडे शेतकऱ्यांचा ओढा आहे. वरचेवर पाऊस कमी होत आहे. किंमती कमी केल्या जातील. परंतु सबसिडी सुध्दा वाढविणे गरजेचे आहे. ती सबसिडी जूनपूर्वी वाढविण्याचा निर्णय घेतला जाईल काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/पूर्वी श्री.गिते 12:15

ता.प्र.क्र.25816..........

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सबसिडी वाढवून देता येणार नाही. यापूर्वीचा अनुभव फार चांगला नाही. मुख्यत: आहे तीच किंमत आपण 20 टक्के कमी केली आहे. राज्य सरकारच्या स्तरावर जी किंमत जाहीर होईल त्याच किंमतीवर आधारित कंपन्यांना बिलिंग करावे लागेल. या वर्षापासून सुधारणा करुन कंपन्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे जमा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे जमा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. यातून सर्व प्रश्न मिटणार आहेत. ग्लोबल टेंडर जाहीर करताना या किंमती कमी करण्याबाबत पावले उचलली आहेत. सबसिडी वाढविण्यापेक्षा संच कमी करुन अल्पभूधारक शेतकऱ्यांपासून मोठ्या भूधारकांपर्यंत सूक्ष्म सिंचन कसे पुरविता येईल, व्याप्ती कशी वाढेल या दृष्टीने राज्य सरकार प्रयत्न करीत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, किंमत कमी करणे आणि अनुदान देणे या दोन्ही भिन्न गोष्टी आहेत. अल्पभूधारकांसाठी 1985 पासून सबसिडी दिली जात आहे. त्यामध्ये वेळोवेळी बदल केले आहेत.

नंतर श्री.खर्चे...

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25816....... डॉ. रणजित पाटील......

त्यावेळेस आपण विशिष्ट भागासाठी 90 टक्के अनुदान सुध्दा दिलेले आहे. प्रश्न असा आहे की, जे 60 टक्के अनुदान मागील वर्षी होते ते देखील जी.आर. उशीरा आल्यामुळे शेतकऱ्यांचा त्याचा फायदा मिळाला नाही. माझी अशी विनंती आहे की, विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी शासनाने कर्तव्य म्हणून यात केंद्र शासनाचा वाटा सोडून राज्याचा वाटा उचलला तर निश्चितच हे अनुदान 75 टक्क्यापर्यंत शासन नेऊ शकते. तसेच उत्तरात आपण मान्य केलेच आहे की, याद्वारे कमी पाणी वापरुन आपण सिंचन दुप्पट करु शकतो, या अनुषंगाने शासन प्रयत्न करणार काय, तसेच दुसरा प्रश्न म्हणजे अनुदान उशीरा मिळते तसेच ही रक्कम कंपन्यांना एक एक वर्षभर मिळत नाही, त्यामुळे कंपन्या किंमती वाढवितात, कारण एका वर्षाचे व्याज त्यात गृहित धरलेले असते. म्हणून शासन अशी पेंडन्सी थांबवून वेळेवर पेमेंट करुन शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा देण्याचा प्रयत्न करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, कोरडवाहू आणि आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाची नेहमी मदतीचीच भूमिका राहिलेली आहे. या योजनेत केंद्र शासनाचा 80 टक्के आणि राज्याचा 20 टक्के वाटा आहे. तसेच याबाबतची आकडेवारी विचारात घेतली तर मागील वर्षी या योजनेसाठी 700 कोटी रुपये खर्च झाला तर यावर्षी हा आकडा 800 कोटीपर्यंत जाणार आहे, कारण ठिबक सिंचन योजनेतील लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तसेच सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी आत्महत्याग्रस्त जिल्ह्याबाबत जी सूचना केली त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, शासनाने विदर्भातील या ठराविक जिल्ह्यांसाठी एक विशेष योजना केंद्राकडे सादर केली होती. गेल्याच महिन्यात या योजनेसाठी 3200 कोटी रुपयांची मंजुरी आली. त्यात प्रामुख्याने सूक्ष्म सिंचन तसेच अन्य सिंचनाच्या सुविधा निर्माण करण्याचा, ज्याला आपण कॅपेसिटी बिल्डिंग म्हणतो त्यासाठी हे अनुदान आहे. तसेच अनुदान वाढविणे आणि किमती कमी करणे हे दोन वेगवेगळे भाग असू शकत नाही असेही मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. पण तरी देखील विकसित तंत्रज्ञानाचा फायदा शेतकऱ्यांना कसा देता येईल यादृष्टीने शासनाने पावले उचलली आहेत. त्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिकाधिक ठिंबक सिंचन व सुक्ष्म सिंचनाचा लाभ कसा देता येईल हा प्रयत्न आहे.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25816....... श्री. राधाकृष्ण विखे-पाटील......

पूर्वी ही बाब फक्त फळबागांपुरतीच मर्यादित होती पण आता शेतकरी ठिबक सिंचनाच्या माध्यमातून कापूस व इतर पिके सुध्दा घ्यायला लागला व त्यामुळेच ही मागणी वाढत चालली आहे. तसेच शासनाकडून कधी तरतूद करण्यास विलंब होतो आणि हा विलंब कसा टाळता येईल आणि त्या त्या वर्षाचे अनुदान त्याच वर्षी कसे उपलब्ध करुन देता येईल याबाबत देखील शासनाने पावले उचलली आहेत आणि यापुढे अनुदानाची तरतूद करण्यात विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : सिंचन योजना ही केंद्रपुरस्कृत असून त्यापोटी अल्पभूधारकांना 60 टक्के आणि अन्य शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदान मिळते पण यापूर्वी शासनाने हेच अनुदान 90 टक्के दिले होते व तसा शासन निर्णय सुध्दा काढला होता. त्याचा लाभ काही शेतकऱ्यांनाच मिळाला आणि तात्काळ तो जी.आर. बदलून 60 आणि 50 टक्क्याचा जी.आर. शासनाने काढला. या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, शेतकरी आता बी.टी. सारख्या बियाण्याची लागवड करुन कापूस व इतर नगदी पिके ठिबकच्याच सहाय्याने घेत आहे म्हणून ही सबसिडी पुन्हा 90 टक्के करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, मुळात या योजनेची व्याप्ती वाढल्यामुळे क्षेत्रात वाढ झ ाली तरी अनुदानाची रक्कम वाढविणे शक्य नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अनुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.पर.कर. :25816** ......

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

पण शेतकऱ्यांचा खर्च कमी करावा, संच स्वस्त किंमतीत मिळावे, संच शेतकऱ्यांना परवडणारे असावेत यासंदर्भात शासनाने पाऊले उचलली असून यासंदर्भातील निर्णय एक महिन्यात लागला तर या ठिकाणी अनुदानाचा जो प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे तो भविष्यात उद्भवणार नाही अशी मला खात्री असून शेतकऱ्यांना परवडतील असे संच उपलब्ध करून देण्याची शासनाची तयारी आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी एक प्रश्न सोयाबीन तसेच हायब्रीड बियाण्यांच्या संदर्भात प्रश्न विचारला असून हे प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांनी ठिबक सिंचन, तुषार सिंचनाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे संच शेतकऱ्यांना अल्प किंमतीत मिळणे आवश्यक आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात आपण आता कितीही चर्चा केली तरी ती अपूर्णच राहील. सन्माननीय कृषी मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, पुढील अधिवेशनाच्या संदर्भात या प्रश्नाची तयारी करीत असतांना मधल्या काळात सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनात बोलावून....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना मी सांगू इच्छितो की, या प्रश्नाची मला कल्पना आहे. आपल्याला शिक्षकांच्या प्रश्ना संबंधी जेवढा जिव्हाळा आहे तेवढाच जिव्हाळा या प्रश्नाबाबत देखील आहे असे मी समजतो. या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय मंत्रीमहोदयांनी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांबरोबर आपल्या दालनात एक बैठक घ्यावी व त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा. जुलै महिन्यात होणाऱ्या अधिवेशनात या प्रश्नाला न्याय देण्यासाठी अडीच तीन तासाची चर्चा आयोजित केली जाईल एवढे मी सांगू इच्छितो.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात बेकायदा नशिल्या औषधांची होत असलेली विक्री**

**(३) *** ***२६४३९ श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , श्री.एम.एम.शेख , श्री.उल्हास पवार , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अमरनाथ राजूरकर , प्रा.सुरेश नवले*** **:** सन्माननीय ***अन्न व औषधे प्रशासन मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेकायदा नशिल्या औषधांची विक्री होत असल्याने अनेक तरुण तरुणी नशिल्या औषधांच्या आहारी गेल्याचे माहे डिसेंबर,२०११ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तरुण-तरुणीना नशिल्या औषधाच्या विळख्यातून सोडविण्याबाबत तसेच नशिल्या औषधांची विक्री करणा-या विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.मनोहर नाईक यांच्या करिता** : (१) नाही. तथापि, काही औषध विक्रेत्यांनी कोडीन फॉस्फेटयुक्त कफ सिरप जसे रेसकॉफ, कोरेक्स इ.औषधांची विक्री औषधे व सौंदर्य प्रसाधने नियमामधील तरतुदींचा भंग करून विक्री केल्याचे आढळून आले आहे.

(२) औषध विक्री नियमांचे पालन न करता ज्या पेढयांनी औषधाची विक्री केली आहे. अशा पेढयाविरूद्ध कारवाई करून काही पेढयांचे परवाने रद्द अथवा निलंबित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. एस.क्यू.ज़मा : सभापती महोदय, मा. मंत्री महोदयांच्या छापील उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "रेसकॉफ, कोरेक्स इ. औषधांची विक्री औषधे व सौंदर्य प्रसाधने नियमामधील तरतुदींचा भंग करुन विक्री केल्याचे आढळून आले आहे."

सभापती महोदय, महाराष्ट्रात सर्रासपणे रेसकॉफ आणि कोरेक्सची विक्री मेडिकल दुकानातून केली जात आहे. डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन असल्याशिवाय सदर औषधे मेडिकल दुकानांना विकता येत नाही परंतु प्रिस्क्रीप्शनशिवाय ही औषधे मेडिकल दुकानदार विकत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व मेडिकल स्टोअर्सना रेसकॉफ आणि कोरेक्स औषधांची प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री केली तर मेडिकल दुकानाचे लायसन्स रद्द केले जाईल यासंदर्भात परिपत्रक काढले जाणार आहे काय ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २६४३१** ......

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, नियमाप्रमाणे प्रिस्क्रीप्शनशिवाय रेसकॉफ आणि कोरेक्स औषधांची विक्री मेडिकल दुकानदारांना विकता येत नाही. शेडयूल एक्समध्ये यासंदर्भात प्रिस्क्रिप्शन देणे गरजेचे आहे. ही सर्व औषधे शेडयूअल एक्स मध्ये टाकण्यात यावी अशी आम्ही केंद्रशासनाला विनंती करीत आहोत. त्यामुळे एक प्रिस्क्रिप्शन रुग्णाकडे व एक प्रिस्क्रिप्शन दुकानदाराजवळ ठेवावे लागणार आहे. राज्यातील 341 मेडिकल दुकानांचे परवाने रद्द केले असून या वर्षभराच्या काळात पहिल्यांदाच 50 मेडिकल दुकानांचे परवाने कायम स्वरुपी बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासंदर्भात अनेक लोक हायकोर्टात गेले होते परंतु हायकोर्टाने सुध्दा राज्य शासनाने दिलेला निर्णय कायम केलेला असून यासंदर्भात विभागाची कारवाई सातत्याने सुरु आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26439....

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पहिल्या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिले आहे. म्हणजे अनेक तरुण-तरुणी नशिल्या औषधांच्या आहारी गेलेल्या नाहीत असे शासनाला वाटते. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. आपण या ठिकाणी कारवाई करीत असतांना सांगितलेली संख्या अत्यंत कमी आहे. यापुढील काळात चांगल्या प्रकारे कारवाई करण्यासंदर्भात शासन गंभीरपणे विचार करील काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, स्पेसिफिक नशेमध्ये आढळून आलेले नाहीत. त्या करिता आपण वेळोवेळी कारवाई केली आहे. त्याप्रमाणे दुकानांचा परवाना सक्तीने रद्द करण्याची कारवाई बऱ्याच वर्षानंतर पहिल्यांदा करीत आहोत. या बाबतीत शासन गंभीर असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत अशा दुकानांमधून होणाऱ्या विक्रीच्या संदर्भात कडक धोरण स्वीकारीत आहोत

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, ज्या औषध कंपन्या औषध बनवितात त्या व्यवस्थेमध्ये लोन लायसन्सचा भाग असल्यामुळे छोटे छोटे लायसन्सदार औषधे बनवितात. त्यामध्ये केवळ प्रिस्क्रिप्शन आहे म्हणून त्याची विक्री केली एवढया पुरता विचार न करता याच्या पलीकडे जाऊन अशाप्रकारच्या औषधांच्या साठयाची निर्मिती करण्यासाठी औषध कंपन्यांना त्याचा क्वॉटम आपण ठरवून दिलेला आहे काय, त्याचप्रमाणे त्यांच्या औषधांची होत असलेल्या विक्रीची तपासणी केली आहे काय? औषधांची निर्मिती आणि त्यांची होत असलेली विक्री यांच्या आकडेवारीवरुन किती मोठया प्रमाणात बाजारात ही औषधे विकली जात आहेत हे आपल्या लक्षात येईल. अशाप्रकारची बंधने औषध कंपन्यांवर घालण्यासाठी आपण उपाय योजना करणार आहात काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, ड्रग्ज अँड कॉस्मेटिक ॲक्ट 1940 हा केंद्र सरकारचा कायदा आहे. त्या ॲक्टमध्ये बदल करण्यासाठी सर्व राज्यांकडून सूचना मागविण्यात आल्या आहेत. आपल्या राज्याच्या वतीने देखील आपण सूचना करीत आहोत. या कंपन्यांमधून औषध निर्मिती करण्याबाबत पूर्वीचा नियम असा आहे की, "The sale of drug by way of wholesale should be done in the presence of approved competent person approved by the License Authority." त्या ऐवजी त्या ठिकाणी फार्मासिस्ट असला पाहिजे अशाप्रकारची सूचना करीत आहोत. जेणेकरुन या कंपनीमधून बाहेर

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26439....

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ...

पडणारा माल कुठेतरी मॉनिटर झाला पाहिजे अशाप्रकारची भूमिका राज्य सरकार केंद्र सरकारला कळविणार आहे.

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, कोरेक्स, रेसफॉक वगैरे अशाप्रकारच्या औषधांचा उल्लेख आहे. खऱ्या अर्थाने ॲनेस्थेशियासाठी जी औषधे वापरली जातात. त्यामध्ये केटामीन, मॉर्फीन, डेफीडीन ही औषधे आहत. या औषधांचा नशेसाठी वापर तरुण वर्ग जास्त प्रमाणात करतात. त्या बाबत आपण अधिक कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी शासन पावले उचलणार आहात काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी मघाशी दिले आहे. ही औषधे एक्स शेडयूलमध्ये टाकण्यासाठी आम्ही केंद्र शासनाला लिहिले आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, नशिल्या औषधांची विक्री बाजारात होते हे शासनाने मान्य केले आहे. त्यामध्ये कफ सिरप, कोरेस, बेनाड्रील या औषधांमध्ये प्रॉक्झीवन नावाची कॅप्सूल, ॲक्टिफाईडसारखे टॅब्लेट अशाप्रकारची औषधे आहेत. एकीकडे या औषधांच्या निर्मितीवर शासनाचे बंधन असले पाहिजे. आज प्रत्येक दुकानामध्ये एका फार्मासिस्टची गरज आहे. कित्येक लोकांनी मुंबईसारख्या शहरामध्ये एका दुकानाच्या ठिकाणी दहा-वीस मोठमोठी दुकाने उघडली आहेत. त्या ठिकाणी एका दुकानासाठी एक फार्मासिस्ट असा नियम न लावता ज्यांची दुकाने आकाराने मोठी असतील तर स्क्वेअर फूटाप्रमाणे आपण फार्मासिस्ट ठेवणार काय, दोन किंवा तीन हजार स्क्वेअर फूटाचे दुकान असेल तर त्या ठिकाणी फक्त एकच फार्मासिस्ट काम करीत असतो. अशा दुकानांमध्ये एकापेक्षा अधिक फॉर्मासिस्ट ठेवण्याचे बंधन त्यांच्यावर घालणार काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे ड्रग्ज ॲंड कॉस्मेटिक्स ॲक्टमध्ये बदल करण्याबाबत आपण सूचना करीत आहोत. माननीय सदस्यांनी केली सूचना योग्य आहे.आज मोठमोठया हॉस्पिटलच्या शेजारी मोठमोठी दुकाने असतात व त्या ठिकाणी एकच फार्मासिस्ट असतो त्याच्याकडे एकच लायसन्स असते. त्या ठिकाणी स्क्वेअर फूटाची मर्यादा आहे. त्यामुळे माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार त्या दुकानाच्या स्क्वेअर फूटाप्रमाणे त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

ता.प्र.क्र. 26439....

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ...

ठिकाणी फार्मासिस्ट ठेवले पाहिजेत असे शासनाचे देखील म्हणणे आहे. किंबहुना, प्रत्येक दुकानांमध्ये तीन फार्मासिस्ट असले पाहिजेत, त्या पैकी दोन डयुटीवर व एक त्यांना रिलिव्हर असला पाहिजेत, त्यांना आयडी बॅच असला पाहिजे, त्यांनी व्हाईट ॲफ्रन घालून उभे राहिले पाहिजे अशाप्रकारचे नवीन नियम आम्ही केंद्र शासनाला सुचविले आहेत.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, बेकायदेशीर नशिल्या औषधांच्या, पदार्थांच्या आहारी जाऊन या राज्यातील तरुण पिढी गारद व्हावयास लागली आहे.एकवेळ आपण हातभट्टीची दारु, डान्स बार बंद करु शकतो.

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26439...

श्री.रमेश शेंडगे...

एक आव्हान म्हणून ती जबाबदारी शासन आपल्या शिरावर घेऊन पार पाडू शकते. जेथे बेकायदेशीर नशिल्या औषधांची विक्री होते किंवा पदार्थांची विक्री होते त्यावर कायमची बंदी आणण्याचे आव्हान स्वीकारावे. देवीचा रोगी दाखवा आणि एक रूपये मिळवा तसा नशिला औषधांची विक्री करणारा विक्रेता कळवा आणि पाच हजार रूपये मिळवा अशा प्रकारची ठोस योजना शासन राबवेल काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंडी डी.पाटील : सभापती महोदय, मी याचा मघाशीच उल्लेख केला आहे. 50 परवाने आपण कायमस्वरूपी रद्द केले आहेत. अशा प्रकारची कडक कारवाई आपण राज्यामध्ये पहिल्यांदाच करीत आहोत. अजूनही काही करता येईल काय हे पहावे लागेल. या औषधांचा वापर शाळेतील मुलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून आला आहे. याचा परिणाम शाळेतील मुलांवर होऊ नये म्हणून शिक्षण विभागाशी चर्चा करून एक व्यापक मोहीम राज्यामध्ये राबविली जाईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, औषध विक्रेत्या पेढ्यांची तपासणी किती दिवसांनी करतो आणि तेवढे मनुष्यबळ आपल्याकडे आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंडी डी.पाटील : सभापती महोदय, वर्षातून एकदा औषधपेढ्यांची तपासणी व्हावी असा नियम आहे. पूर्वी आपल्याकडे पदे कमी होती. आता 132 ड्रग्ज इन्स्पेक्टर आपल्याकडे उपलब्ध आहेत. मी परवा देखील येथे सांगितले की, अजून एक नवा प्लॅन आपण माननीय वित्त मंत्री आणि माननीय मुख्यमंत्री यांना देत आहोत. ड्रग्जमध्ये होणारे नवनवीन बदल लक्षात घेता नवीन फूड सेफ्टी ॲक्ट आणण्याचा विचार सुरू आहे. तसेच जास्त प्रयोगशाळा निर्माण करण्यासाठी, जास्त स्टाफ शासनाने द्यावा यासाठी देखील प्रयत्न करण्यात येत आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

....

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुण्यातील दहावीत शिकणारा विद्यार्थी कु.शुभम शिर्के याचे पन्नास हजार रूपयांसाठी अपहरण करून त्याच्या तीन मित्रांनी हत्या केली होती. त्यावेळी त्याचे पालक पोलीस नियंत्रण कक्ष, भोसरी पोलीस ठाणे येथे तक्रार करण्यासाठी गेले असता त्यांची तक्रार घेण्यात आली नाही. या संबंधीचा औचित्याचा मुद्दा मी सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी राज्याचे लोकप्रिय गृह मंत्री यांनी सी.आय.डी.चौकशीचे आदेश दिले होते. विधान मंडळाचे अधिवेशन संपण्यापूर्वी कोणती कारवाई केली त्याचा अहवाल सभागृहापुढे ठेवला जाईल असे त्यांनी आश्वासन दिले होते. आता माननीय गृह मंत्री सभागृहात आहेत. आज अधिवेशनाच्या शेवटचा दिवस आहे.

परवा पुणे शहरामध्ये 18 किलो सोन्याची चोरी झाली. मी गृह मंत्र्यांच्या मार्फत पुणे पोलिसांचे अभिनंदन करतो की, 24 तासाच्या आत 18 किलो सोने मुद्देमालासह आरोपींसकट पकडले आहे. अतिशय चांगले काम पुणे पोलिसांनी केले आहे. त्याबद्दल मी माननीय गृह मंत्र्यांचे देखील अभिनंदन करतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या चर्चेच्या वेळी स्पष्ट केले आहे की, कु.शुभम शिर्के प्रकरणात त्यांच्या कुटुंबीयांनी पहिल्यांदा ज्याच्याशी संपर्क साधला की, अशा प्रकारे मुलगा मिसिंग आहे, खंडणी मागत आहेत, त्यावेळी ही केस आमच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत नाही, दुसऱ्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा हे उत्तर ज्याने दिले आहे त्याचा शोध घेऊन निलंबित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, येथे दुसऱ्या एका घटनेचा उल्लेख केला आहे. परवा पुणे पोलिसांनी चांगले काम केले आहे. 18 किलो सोने पकडले आहे. त्याच्या अगोदरच्या बातम्या पहाव्या. ज्यांनी चोरी केली आहे त्यांच्या प्रतिक्रिया बघितल्या तर तेच पुण्यामध्ये कायदा व सुव्यवस्था सुरक्षित नाही म्हणून ओरड करत होते. शेवटी तेच चोर निघाले. पोलिसांना अलीकडच्या काळात काम करणे अवघड जात आहे.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि मी काल चर्चा केली व औचित्याचे मुद्दे अन्य काही कामकाज असेल ते अंतिम आठवडा कामकाज पूर्ण झाल्यानंतर घेण्याचे ठरविले आहे. अनावधानाने मी सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांचे नाव पुकारले होते. मी त्यांना माझ्या विशेष अधिकारामध्ये बोलण्यास अनुमती दिलेली नव्हती. अनवधानाने मी त्यांना बोलण्यास अनुमती दिली. आता मी दोन निर्णय वाचतो.

यानंतर सौ.रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांच्या बनावट सह्या असलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना देण्यात आल्याबद्दल सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंबंधी माननीय सभापतींचा निर्णय

**सभापती** : सन्माननीय विधान परिषद सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी गुरुवार, दिनांक 29 मार्च 2012 रोजी औचित्याच्या मुद्याव्दारे एक अतिशय गंभीर बाब सभागृहामध्ये उपस्थित केली. सन्माननीय सदस्यांच्या खोट्या सह्या असलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना या सचिवालयाकडे सादर करण्यात येत असल्याबाबतचा हा मुद्दा असून त्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामदास कदम, किरण पावसकर यांनी देखील त्यांचे विचार व्यक्त केले. त्यावेळी मी सदर प्रकरणामध्ये पुढील प्रमाणे निदेश दिले होते :-

"विधानमंडळ सचिवालयाने जागरुकतेने ह्या काही बाबी माझ्या निदर्शनास आणल्या.गेल्या अधिवेशनामध्ये अशा जवळजवळ 24 ते 25 बाबी होत्या आणि त्या लक्षवेधी सूचनेच्या संबंधातील होत्या. त्या सगळ्या बाबी आम्ही बाजूला काढल्या. सभागृहाचे सन्माननीय नेते, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांच्या नजरेस त्यावेळी देखील ही बाब आणली होती आणि आज देखील आणली असून त्या संबंधात आज चर्चा देखील झाली. याबाबतीत कठोर निर्णय घेण्याचे मी ठरविले आहे. या प्रकरणाची 100 टक्के चौकशी सी.आय.डी.मार्फत केली जाईल. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, काहीही झाले तरी लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, अर्धा तास चर्चेच्या सूचना जोपर्यंत आपण स्वत:बघत नाही, तोपर्यंत कोणत्याही कागदावर आपण सही करु नये. आपली सही नाही, आपला काही रेकॉर्ड नाही, त्यामुळे याची चौकशी मी सी.आय.डी.कडे देत आहे. अशा प्रकारे मी कठोर कारवाई करण्याचे ठरविले आहे."

त्यानंतर बुधवार दिनांक 4 एप्रिल 2012 रोजी देखील सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी अर्धा तास सूचनेच्या बाबतीत हीच बाब निदर्शनास आणताना अशा खोट्या सूचनेमुळे भिवंडी येथील एका डाईंग कंपनीला प्रदूषण नियंत्रण मंडळाची नोटीस जाऊन ती कंपनी सध्या बंद पडल्याचे व त्यातील सुमारे 200 कामगार देशोधडीला लागल्याचे नमूद केले. वास्तविक पाहता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नमूद केलेल्या सूचनेस अनुमती नाकारण्यात आली होती असे असूनही या सूचनेवर कारवाई होते, ब्लॅकमेलींग केले जाते याचा अर्थ यात काही बाह्य



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

व्यक्तींचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच ही अतिशय गंभीर बाब असून याबाबत सर्वच सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र असणे स्वाभाविक आहे. मूळामध्ये गत सत्रात (डिसेंबर, 2011) 27 लक्षवेधी सूचना ह्या अशाच प्रकारे खोट्या सह्यांनिशी या सचिवालयात प्राप्त झाल्या असल्याची बाब या सचिवालयाने माझ्या निदर्शनास आणली होती. त्याची गांभीर्याने दखल घेऊन, असे प्रकार भविष्यात घडू नयेत यादृष्टीने पुरेपूर काळजी घेण्याचा प्रयत्न म्हणून मी दिनांक 24 फेब्रुवारी 2012 रोजी म.वि.प. नियम 56 मधील तरतुदीनुसार म.वि.प.नियम 101 अन्वये द्यावयाच्या लक्षवेधी सूचनांच्या बाबतीत "पुनरीक्षित निदेश क्रमांक 5" जारी केले.त्यानुसार लक्षवेधी सूचना देण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी आपल्या लेटर हेडचा वापर करणे, तसेच या सचिवालयात सूचना देण्यासाठी सदस्य स्वत: अथवा त्यांचे अधिकृत स्वीय सहाय्यक अथवा त्यांच्या विधीमंडळ पक्ष कार्यालयातील अधिकृत ओळखपत्र धारक कर्मचारी उपस्थित असणे बंधनकारक केले आहे.त्यानुसार या अधिवेशनात लक्षवेधी सूचना देण्याचा पहिला दिवस वगळता उर्वरित दिवशी प्राप्त झालेल्या सर्व सूचना सदस्यांच्या लेटर हेडवर प्राप्त झाल्या असून अद्यापपर्यंत त्यात खोट्या सह्या असल्याचे आढळलेले नाही अथवा अशा आशयाची कोणती तक्रारही प्राप्त झालेली नाही.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

या अधिवेशनात असे गंभीर प्रकार हे तारांकित प्रश्न सूचना व अर्धा तास चर्चेच्या सूचनांबाबत घडले असल्याचे दिसून येते. अशा प्रकारांबाबत गांभीर्याने चौकशी होऊन संबंधितांवर कठोर कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. याचसाठी गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी होण्याबाबतच्या माझ्या निर्णयाशी मी आजही ठाम आहे. याबाबत कशा प्रकारे कारवाई करता येईल या दृष्टीने मी भारताचे संविधान, विधान परिषद नियम तसेच काही संदर्भ ग्रंथ आणि या विधिमंडळासह, लोकसभा/राज्यसभा व अन्य काही विधानमंडळांमध्ये या बाबतची काही पूर्वोदाहरणे आहेत का याचा अभ्यास केला.

संसद तथा विधिमंडळाच्या सार्वभौमत्वाबाबत मे. कौल आणि शकधर यांच्या पार्लमेंटरी प्रॅक्टीस आणि प्रोसीजर या ग्रंथाच्या सहाव्या आवृत्तीमधील काही मजकूर मी येथे नमूद करतो.

पृष्ठ 239 वर पुढीलप्रमाणे म्हटले आहे-

Parliament is sovereign within the limits assigned to it by the Constitution. There is an inherent right in the House to conduct its affairs without any interference from an outside body.

सदस्यांच्या सभागृहाप्रती कर्तव्य पार पाडण्याच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करणे ही बाब विशेषाधिकार भंगाची असून त्यात संबंधिताना सभागृह शिक्षा करु शकते. या संदर्भात पृष्ठ 220 वर पुढीलप्रमाणे म्हटले आहे-

When any individual or authority disregards or attacks any of the privileges, rights and immunities, either of the members individually or of the House in its collective capacity or of its committees, the offence is termed a breach of privilege, and is punishable by the House...

सभागृहाच्या विशेषाधिकारांबाबत सभागृह हे सर्वोच्च असून अशा प्रकरणांमध्ये विधिमंडळ, न्यायिक व कार्यकारी हे तिन्ही अधिकार सभागृहास एकत्रित प्राप्त आहेत. या संदर्भात पृष्ठ 279 वर पुढीलप्रमाणे म्हटले आहे :-

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

In the matter of its own privileges, the House is supreme. It combines in itself all the powers of legislature, judiciary and Executive, while dealing with a question of its privilege. The House has the power to declare what its privileges are, subject to its own precedents, name the accused who is alleged to have committed a breach of privilege or contempt of the House, act as a court either itself or through its Committee, to try the accused, to send for persons and records, to lay down its own procedure, commit a person held guilty, award the punishment and execute the punishment under its own orders.

विधानमंडळाच्या इमारती व प्रसीमांमधील सर्वाधिकार हे माननीय पीठासीन अधिकारी यांचेच असून याचसंदर्भात पृष्ठ 281 वर पुढीलप्रमाणे म्हटले आहे-

The Speaker is the authority under whose directions order is maintained in the Parliament House Estate. It is contempt of the House if any executive authority issues any notifications or orders which are applicable to the Parliament House Estate or causes any inquiry to be made in any matter inside the Parliament House Estate or brings a charge against any one for any crime inside the Estate.

सभागृहाचे आवार याबाबत म.वि.प. नियम 2(प) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :-

"सभागृहाचे आवार" म्हणजे कक्ष (चेंबर), सभाकक्ष (लॉबी), गॅलरी व त्यात सभापती व विधानसभेचे अध्यक्ष वेळोवेळी निर्दिष्ट करतील अशा इतर ठिकाणांचा समावेश होतो.

सन्माननीय सदस्यांच्या खोट्या सह्यानिशी संसदीय आयुधांबाबतच्या सूचना विधानमंडळास सादर करणे ही बाब अतिशय गंभीर व सरळ-सरळ या सार्वभौम सभागृहाच्या कामकाजात हस्तक्षेप करणारी आहे. सदर बाब विधानमंडळाच्या प्रसीमेत (Precincts of the House) घडून आली असून विधानमंडळाची प्रसीमा माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रात येते.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

सभागृहाचे कामकाज तसेच सभागृहाशी संबंधित असलेल्या सर्व समित्यांच्या कामकाजात काही गैरप्रकार घडला असल्यास, उदाहरणार्थ, खोटे दस्तऐवज तयार करणे, खोटी साक्ष देणे, विविध आयुधांच्या सूचनांवर बोगस सह्या करणे, तारांकित प्रश्न सभागृहात विचारल्यानंतर सदस्यांनी अनुपस्थित राहणे किंवा फौजदारी स्वरुपासारख्या गुन्ह्यातील कृत्ये करणे, प्रश्न मागे घेणे, अशा प्रकारच्या काही घटना घडल्यास, त्याबाबत पुढे चौकशीची कोणती पध्दत अवलंबावी, यासंदर्भात काही उदाहरणे मी तपासली असता त्यात अशी प्रकरणे तपासून, आवश्यक चौकशी करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी सभागृहातील सदस्यांची एक समिती नेमण्याची प्रथा असल्याचे आढळले

उदाहरणादाखल मी खालील संदर्भ या ठिकाणी नमूद करतो :-

(1) सन 1994-95 मध्ये बोरीवली, कोळीपाडा आदिवासी वस्तीचा बिल्डरने जबरदस्तीने ताबा घेतल्याबाबत तारांकित प्रश्न क्रमांक 99677 सदस्यांनी मागे घेतल्यामुळे सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी माननीय उपाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. सदरहू समितीने या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करुन दिनांक 21 नोव्हेंबर, 1994 रोजी सभागृहाला अहवाल सादर केला होता.

(2) दिनांक 28 नोव्हेंबर, 2007 रोजी विधानसभेत सदस्यांनी प्रश्नाची सूचना मागे घेणे तसेच प्रश्नाच्या वेळेस सभागृहात अनुपस्थित राहणे या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला असता त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये प्रश्नाची सूचना मागे घेण्यासंबंधी माननीय अध्यक्षांना सादर करण्यात आलेल्या पत्रावर संबंधित सदस्यांच्या खोट्या सह्या असल्याचे निदर्शनास आले. त्यावर सदर प्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशीसाठी आग्रही मागणी सभागृहात धरण्यात आली होती. तथापि, त्यावर देखील माननीय अध्यक्षांनी सभागृहातील ज्येष्ठ सदस्यांची समिती नेमण्याचे निर्देश दिले होते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

(3) बारावी विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर नवनिर्वाचित सदस्यांच्या शपथविधी कार्यक्रमादरम्यान दिनांक 9 नोव्हेंबर, 2009 रोजी घडलेले कथित गैरवर्तन तसेच विधान भवन परिसरात काढलेले अनुचित उद्‌गार याबाबत चौकशी करण्यासाठी माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक 23 डिसेंबर, 2009 रोजी माननीय उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नेमली होती.

इतर राज्य विधानसभेमध्ये अशा स्वरुपाच्या घडलेल्या प्रकरणांबाबत चौकशीची कोणती पध्दत अवलंबिण्यात येते, या संदर्भामध्ये माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता शेजारच्या कर्नाटक राज्यामध्ये घडलेल्या एका घटने संदर्भात पुढील प्रकारे कार्यवाही करण्यात आल्याचे मला आढळले :-

कर्नाटक विधानसभेमध्ये दिनांक 7 फेब्रुवारी, 2012 रोजी सभागृहात मोबाईलवर आक्षेपार्ह चित्रफिती पाहणाऱ्या तीन सदस्यांबाबत चौकशी करण्यासाठी अध्यक्ष, कर्नाटक विधानसभा यांनी सभागृहातील त्रिसदस्यीय समिती नेमली.

त्याचप्रमाणे देशाच्या संसदेमध्ये अशा प्रकारे प्रकरण घडल्यानंतर त्या ठिकाणी चौकशीची कोणती पध्दत अवलंबिण्यात येते, याबाबत मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता मला पुढील प्रमाणे चौकशीची पध्दत अवलंबिण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे :-

(1) सन 1957 मध्ये तत्कालीन केंद्रीय वित्त मंत्री व सचिव वित्त विभाग यांच्यामधील गोपनीय पत्रव्यवहाराच्या आधारे भारतीय जीवन विमा निगम यास खोटे शेअर्स (समभाग) विक्री केल्याचा मुद्दा लोकसभेमध्ये उपस्थित केला असता त्यावर न्यायमूर्ती एम.सी.छगला यांचा एक सदस्यीय चौकशी आयोग नेमण्यात आला होता.

(2) सन 1987 मध्ये स्वीडीश बनावटीच्या बोफोर्स तोफांच्या खरेदी प्रकरणी दलाली घेतल्याचा मुद्दा संसदेमध्ये उपस्थित केला असता दिनांक 6 ऑगस्ट, 1987 रोजी बी. शंकरानंद यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहाच्या सदस्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती नेमण्यात आली होती.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

(3) सन 1992 मध्ये शेअर्स दलाल हर्षद मेहता यांनी शेअर्स मार्केटमध्ये केलेल्या घोटाळ्यांबाबतचा मुद्दा संसदेमध्ये उपस्थित केला असता त्याबाबत माजी केंद्रीय मंत्री श्री. रामनिवास मिर्धा यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहाच्या सदस्यांचा समावेश असलेली संयुक्त समिती नेमण्यात आली होती.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:55

सभापती....

(4) 14व्या लोकसभेमध्ये सभागृहात प्रश्न मांडण्यासाठी लोकसभा सदस्य पैसे घेत असल्याची बाब प्रसारमाध्यमांद्वारे प्रस्तुत झाल्यानंतर काही सदस्यांवरील गैरवर्तणुकीच्या आरोपांबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी लोकसभेतील सदस्यांची तदर्थ समिती दिनांक 12 डिसेंबर 2005 रोजी नियुक्त करण्यात आली.

उपरोक्त सर्व माहिती, उदाहरणे, संबंधित ग्रंथातील उतारे त्याच प्रमाणे लोकशाही पध्दतीतील प्रथा, परंपरा व सार्वभौम सभागृहाची प्रतिष्ठा विचारात घेता मी यापूर्वी घेतलेल्या निर्णयाशी ठाम आहे. तथापि, विधानमंडळाच्या परिसीमेमध्ये या घटना घडलेल्या असल्याने माझ्या अखत्यारितील संबंधित ज्या सर्व बाबी आहेत त्या बाबींची सुध्दा चौकशी करण्याकरिता मी माननीय उप सभापती, विधान परिषद यांच्या अध्यक्षतेखाली या सभागृहातील एकूण 5 सदस्यांची एक समिती गठीत करीत आहे. या समितीचे अध्यक्ष माननीय उप सभापती यांच्या खेरीज भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रक्ष, भारतीय जनता पक्ष व शिवसेना पक्ष या पक्षांच्या या सभागृहातील प्रत्येकी एक सदस्याचा समावेश मी या समितीमध्ये करीत आहे. ही समिती विधानमंडळ परिसीमेतील विधान परिषदेच्या विविध आयुधांच्या संदर्भामध्ये सर्व कागदपत्रे विचारात घेऊन सखोल चौकशी करील आणि याबाबतीतील निष्कर्ष व भविष्यात असे प्रकार घडू नयेत यादृष्टीने कार्यपध्दतीत सुधारणा, नियमात बदल, संसदीय आयुधांच्या प्रपत्रात संरचनात्मक बदल, उदा. प्रचलित Manual कार्यपध्दतीचा वापर कमीत कमी करुन संगणकीय माध्यमातून वेगळे Mechanised Devices सुचविणे इत्यादी उपाययोजनांच्या शिफारशींचा अहवाल सभागृहास सादर करील.

ज्या ज्या अर्धा-तास चर्चा, तारांकित प्रश्न सूचना व इतर आयुधांबाबत माननीय सदस्यांनी, त्यावरील बोगस सह्या असल्याचे निदर्शनास आणले आहे, त्या प्रकरणांशी संबंधित सर्व विषयांच्या बाबतीत ही समिती राज्य शासनाच्या गुन्हे अन्वेषण विभागाची व इतर संबंधित यंत्रणांची चौकशी करण्यासाठी मदत घेईल.

वर नमूद केलेल्या 4 पक्षाच्या गट नेत्यांनी आपापल्या पक्षाच्या प्रत्येकी एका सदस्यांच्या नावाची शिफारस या समितीवर नियुक्ती करण्यासाठी सत्वर पाठवावी, अशी मी विनंती करतो.

--

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**:तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पनवेल (जि. रायगड) तालुक्यात व्यावसायिकांकडून कार्यालय व दुकान नोंदणीकरिता कर्मचारी लाच घेत असल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री अरुण गुजराथी, हेमंत टकले, रमेश शेंडगे, विक्रम काळे, ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 25875 ला दिनांक 16 एप्रिल 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार सुधारित उत्तराच्या प्रती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी.)

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:55

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे विशेष अहवाल आणि उक्त अधिनियमाच्या कलम 12च्या पोट-कलम (5) अन्वये दिनांक 18 मार्च 2010, दिनांक 29 सप्टेंबर 2010, दिनांक 31 डिसेंबर 2010, दिनांक 18 जुलै 2011, दिनांक 30 जुलै 2011, दिनांक 9 ऑगस्ट 2011, दिनांक 5 सप्टेंबर 2011, दिनांक 13 सप्टेंबर 2011, दिनांक 20 सप्टेंबर 2011,दिनांक 5 नोव्हेंबर 2011, दिनांक 14 नोव्हेंबर 2011, दिनांक 8 डिसेंबर 2011 व दिनांक 16 डिसेंबर 2011 रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह उपरोक्त अधिनियमाच्या कलम 12च्या पोट-कलम (7) अन्वये सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : विशेष अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

...नंतर श्री. गिते...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : मी आपल्या अनुमतीने राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन 2005-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (जलसंपदा) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन 2010-2011 या वर्षाचा तेरावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन 2008-2009 या वर्षाचा तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------------

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचा अनुक्रमे चौतिसावा व पस्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे**त**.

श्रीमती शोभा फडणवीस : महिला आयोगाचे अध्यक्षपद गेल्या अनेक दिवसापासून भरण्यात आलेले नाही. ते पद केव्हापर्यंत भरण्यात येईल.

श्रीमती वर्षा गायकवाड : महिला आयोगाचे अध्यक्षपद येत्या 15 दिवसात भरण्यात येईल.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : विधानपरिषदेने संमत केलेल्या विधेयकाला विधानसभेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकाला राष्ट्रपतींची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी सह सचिव वाचून दाखवतील.

(अ) खालील विधेयके विधानसभेने कोणत्याही सुधारणेशिवाय संमत केली.

1. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 11- मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक,2011

(ब) खालील विधेयकाला राष्ट्रपतीची अधिसंमती मिळाली.

सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 7- महाराष्ट्र महानगरपालिका, नगरपरिषदा आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, 2010.

-----------------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.**: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

**श्री. मोहन जोशी ( समिती सदस्य )** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा तेविसावा, चोविसावा व पंचविसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अंदाज समितीचा तेविसावा, चोविसावा व पंचविसावा अहवाल सभागृहाला सादर झाले.

-------------

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.**: अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**श्री.सुभाष साळुंखे (समिती सदस्य )** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----------

7...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.**: पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे.

**ॲड.उषा दराडे (समिती सदस्य )** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा नववा व दहावा अहवाल सभागृहाला सादर करते.

सभापती महोदय, पंचायती राज समितीचा नववा अहवाल रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, नाशिक व नंदुरबार जिल्हा परिषदांच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भातील असून त्यातील प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

1. रत्नागिरी जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी केवळ विद्युत पुरवठयाअभवी शाळेतील जलशुध्दीकरण उपकरणे शाळांमध्ये विनावापर पडून असणे अयोग्य आहे असे समितीचे मत बनले, त्यामुळे विद्युत पुरवठयाची रक्कम भरुनही शाळांना विद्युत पुरवठा न झाल्यामुळे व त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनीही दुर्लक्ष केल्यामुळे विद्युत पुरवठा न करण्यात आलेल्या शाळांना विद्युत पुरवठा करावा, त्या ठिकाणी पाणी शुध्दीकरण यंत्रेही बसविण्यात यावीत. त्यासाठी स्वनिधीतून आवश्यक तेवढी रक्कम उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याचप्रमाणे नादुरुस्त पाणी शुध्दीकरण यंत्रेही तातडीने दुरुस्त करुन घेण्यात यावीत, जेणेकरुन शालेय विद्यार्थ्यांना पाण्यामुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध घातला जाईल यासंदर्भात सर्व जिल्हा परिषदांचा आढावा या निमित्ताने घ्यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

2. नाशिक जिल्हा परिषदेच्या आवारातील उपहारगृहाच्या भाडयाची थकीत रक्कम रुपये 22 लाख 47 हजार एवढी असल्यामुळे उपहारगृह चालकाकडून उक्त रक्कम वसूल करण्यात यावी अन्यथा उपहारगृह सुरु करण्यास नियमबाहय परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतनातून/निवृत्ती वेतनातून वसूल करण्यात यावी तसेच यापुढे जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारतीच्या आवारातील जागा किंवा भूखंड भाडे तत्वावर देण्यात येतील, त्यावेळेस अस्तित्वात असलेल्या अधिनियमांचे
काटेकोरपणे पालन करुन करारनामा करण्यात यावा असे सर्व जिल्हा परिषदांना सविस्तर परिपत्रकाव्दारे या निमित्ताने कळविण्यात यावे अशी समितीने शिफारस केली आहे.

8...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : अहवालामध्ये सर्व शिफारशींचा उल्लेख करण्यात आलेला असल्यामुळे शिफारशी वाचण्याची आवश्यकता नाही.

पंचायती राज समितीचा नववा व दहावा अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा पंधरावा व सोळावा अहवाल सादर करणे

श्री.सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा पंधरावा व सोळावा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

**सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा पंधरावा व सोळावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: उप विधान समितीचा दुसरा
अहवाल सादर करणे

श्री.उल्हास पवार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उपविधान समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

**सभापती** : उपविधान समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे अडुसष्टावा अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे अडुसष्टावा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

**सभापती** : विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशे अडुसष्टावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा
पहिला अहवाल (2011-2012) सादर करणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा पहिला अहवाल (2011-2012) सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा पहिला अहवाल (2011-2012) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबईतील विशेष शाळामधील शिक्षकांना सेवेत सामावून घेणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2...........

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मुंबईतील विशेष शाळांमध्ये काम करणारे शिक्षक आहेत त्यांच्या सेवा सातत्याबाबत आणि वेतनाबाबतचा प्रश्न होता. मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, त्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा झाली आहे. त्यांनी आपले आंदोलन मागे घेतले आहे. 2004 ते 2009 या काळात सेवेत नियुक्त झालेले हे सर्व शिक्षक आहेत. 24 शिक्षकांचा प्रश्न मिटला आहे. अद्याप काही शिक्षकांचा प्रश्न प्रलंबित आहे. ज्या शिक्षकांचा प्रश्न प्रलंबित आहे त्याबाबत शासनाचे म्हणणे आहे की, हे शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. अतिरिक्त शिक्षकांना सामावून घेण्यासाठी जागा नसताना नेमणुका देण्यात आल्या. ज्यावेळी नेमणुका देण्यात आल्या त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या नेमणुकांना मान्यता दिलेली आहे. अतिरिक्त शिक्षक हे अन्य जिल्हयातील होते तर या अतिरिक्त शिक्षकांची यादी संबंधित शाळांपर्यंत सर्क्युलेट केली होती का? या शिक्षकांच्या नेमणुका झाल्या, त्यांच्या पदांना मान्यता मिळाली. या प्रक्रियेबाबत शिक्षकांचा कोणताही दोष नसताना त्यांची सेवा समाप्त करणे, त्यांना नोकरीपासून वंचित ठेवणे योग्य होणार नाही. त्यामुळे विशेष बाब म्हणून विशेष शाळांमधील शिक्षकांच्या सेवा सातत्याबाबत शासनाकडून निर्णय घेतला जाईल काय?

श्री.सचिन अहिर : मान्यता घेतली नव्हती, म्हणून अतिरिक्त शिक्षकांची यादी पाठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही. 44 शिक्षकांपैकी 26 शिक्षकांना सेवेमध्ये घेण्याचे काम केले.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्र. 3....... श्री. सचिन अहिर .....

त्यांचे वेतन देखील सुरु करण्यात आले. पण त्यात 7 लोक असे आहेत की त्यांना अद्याप कामावर घेता आले नाही. त्यांच्या बाबतीत काही निकष पूर्ण करुन घेण्याचा प्रयत्न केला जाईल. पण 2 शिक्षकांच्या बाबतीत सांगायचे तर विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे हे 2 शिक्षक सरप्लस ठरतात परंतु त्या त्या संस्थांनी जर विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचे काम केले तर त्यांनाही घेता येईल. मात्र उर्वरित 5 शिक्षक जे अतिरिक्त ठरले आहेत त्यासंदर्भात औरंगाबाद खंडपीठाने प्रतिक्षा यादी दिली असून त्यात स्पष्ट करण्यात आले आहे की, अतिरिक्त ठरलेल्या लोकांचा समावेश जसजशी यादी संपेल तसतसा समावेश करुन घ्यावा. अशा प्रकारे यादी जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत या 5 लोकांना घेणे कठीण आहे. तरी देखील सहानुभूतीने विचार करुन ही बाब तपासून घेण्यात येईल.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ. शी./मु.शी.**: :मानसिक विकलांग मुलांच्या संस्थांमध्ये असलेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी मानसिक विकलांग मुलांच्या संस्थांमध्ये असलेला गैरव्यवहार या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : महोदय, राज्यातील मानसिक विकलांग बालकांची संख्या 80 टक्के असून त्यांचे वय 18 वर्षाच्या वर आहे. त्यांच्या पुनर्वसनासाठी स्वतंत्र संस्था निर्माण करण्यात आली आहे. जेणेकरुन त्यांचे योग्य पुनर्वसन होईल आणि 18 वर्षाच्या खालील मुलांची योग्य काळजी घेता येईल, त्यांचे शिक्षण व प्रशिक्षणाकडे पुरेसे लक्ष देता येईल. याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आणि ती कधी पूर्ण करणार आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : महोदय, या समितीला 7 लाख 20 हजार एवढी रक्कम शासनाने उपलब्ध करुन दिली असून यावर्षी त्यांनी 14.60 लाख रुपयांची मागणी केली आहे, त्यादृष्टीने शासनाने जी.आर. काढलेला आहे. तसेच या समितीला दोन वर्षांची मुदतवाढ दिली असून त्यांच्या मागण्या आपण मान्य केल्या आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, आशा वाजपेयी यांच्या समितीस जिल्हावार जे.जे. ॲक्टनुसार नेमलेल्या समितीवर अवलंबून रहावे लागते. या समितीला खूप मर्यादा आहेत व त्यात त्रुटीही आहेत म्हणून उच्च न्यायालयाने प्रा. आशा वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचे अधिकार वाढवून देण्याचा विचार सरकार करणार काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : होय, मी ऑलरेडी त्यांच्याशी चर्चा केली असून आवश्यक वाटल्यास पुन्हा एकत्र बसून चर्चा करण्यात येईल.

------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : नितीश ठाकूर या व्यक्तीकडे सापडलेली बेहिशेबी मालमत्ता याबाबत श्री जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री जयंत पाटील, वि. प. स. यांनी, श्री. नितीश ठाकूर या व्यक्तीकडे सापडलेली बेहिशेबी मालमत्ता या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, या नितीश ठाकूरच्या घराची झडती पोलिसांनी घेतली असता जी रक्कम सापडली ती ऐकून मी थक्क झालो, कारण एवढी रक्कम सापडली की ती लिहिता सुध्दा येत नाही, एवढी मालमत्ता त्याने जमा केली आहे. परदेशात या व्यक्तिची मालमत्ता किती आहे, रायगड जिल्ह्यात किती आहे आणि मुंबईतील एसआरए मध्ये त्याने किती गुंतवणूक केली आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, हा विषय अत्यंत मोठा असून यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी केली आहे. आतापर्यंतशापुरजी पालनजी सारख्या मोठ्या कंपन्यांना या व्यक्तिने जवळपास 258 कोटी रुपये चेकने दिलेले आहेत, त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी असून त्याचा तपास सुरु आहे.

---------

....6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.**: बोरिवली (पूर्व) येथील एस.टी. महामंडळाची धोकादायक इमारत याबाबत श्री रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गुलाबराव देवकर ( परिवहन राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री. रामदास कदम यांनी "बोरिवली (पूर्व) येथील एस.टी. महामंडळाच्या धोकादायक इमारतीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम :सभापती महोदय, निवेदनाचे जे उत्तर मिळाले आहे त्यामध्ये सदर जमीन म्हाडाच्या मालकीची आहे असे दिसते. गेल्या अनेक वर्षापासून ही जमीन एस.टी. महामंडळाने भाडे तत्वावर घेतलेली आहे असे म्हाडाचे म्हणणे आहे. या ठिकाणच्या तिन्ही इमारती कधीही पडतील अशा अवस्थेत आज आहेत. जागा कोणाची आहे हा विषय महत्वाचा नसून त्या इमारतींची दुरुस्ती होणे किंवा त्यांची पुनर्बांधणी होणे हा विषय महत्वाचा आहे. तुमच्याकडे पैसे नसतील तर निविदा काढा, खाजगी विकासाला विकास करण्यासाठी काम द्या. त्यामुळे यासंदर्भात तत्काळ कोणता निर्णय घेतला जाणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सदर प्रकरणात म्हाडाने परिवहन विभागाला सर्व्हीस क्वार्टरसाठी ही जागा दिलेली आहे. जोपर्यंत तेथील कर्मचारी सर्व्हीसमध्ये आहेत तो पर्यंत ते तेथे राहतील व त्यानंतर क्वार्टर खाली करणे असे अभिप्रेत आहे. परिवहन विभागाने या इमारतींचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला व म्हाडाकडे जॉईंट व्हेंचर करण्याची भूमिका घेतली तर या इमारतींच्या बाबतीत सकारात्मकपणे पुनर्बांधणीचा विचार केला जाईल. मात्र त्या इमारतीमध्ये कोणते रहिवासी ठेवावेत, कसे ठेवावेत हा विषय परिवहन विभागाच्या अखत्यारीतील आहेत. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे परिवहन विभाग व म्हाडाची संयुक्त बैठक घेऊन मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: एस.टी. महामंडळातील कनिष्ठ कामगारांना नियमित कामगारांचे वेतन देणे याबाबत सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते,डॉ.रणजीत पाटील भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गुलाबराव देवकर ( परिवहन राज्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभापगृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, निवेदनामध्ये नमूद केले आहे की, एस.टी. महामंडळाने दिनांक 13.7.2000 च्या ठरावान्वये सर्व पदामध्ये निम्नस्तर वेतनश्रेणी तयार करुन प्रथम पाच वर्षाकरिता नियुक्त्या करण्यात येत आहेत. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने दि. 15 मार्च, 2010 रोजी समान काम, समान वेतन असा निवाडा दिलेला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने महामंडळाच्या दि. 13.7.2000 च्या ठरावात काही सुधारणा करण्यात आली आहे काय ? बदल केला नसल्यास त्याची कारणे कोणती ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, एस.टी. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसोबत जो करार होणार आहे त्यावेळी याबाबत सुधारणा केली जाणार आहे. कनिष्ठ वेतनश्रेणीमध्ये जे कर्मचारी काम करीत आहेत ते पाच वर्षापासून काम करीत आहेत. त्यांना मिनिमम वेतन मिळावे यासाठी 5 वर्षाचा करार 3 वर्षाचा करण्यासाठी नवीन करारामध्ये याबाबत तरतूद करीत आहोत.

-----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सुचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सह सचिव : मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक "तेरा" वर दाखविण्यात आलेल्या 1 ते 21 या नियम 93 अन्वयेच्या सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** :निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 21 ही निवेदने छापावीत )

-----------

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनाबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निमय 93 च्या सूचनांवरील निवेदने या ठिकाणी झ ााली आहेत. विधान परिषदेच्या नियमावलीमध्ये 93 च्या सूचनेसंबंधी काही नियम दिलेले आहेत. सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्याकडून 93 च्या सूचना दिल्या जातात. निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करु इच्छिणाऱ्या सदस्यांकडून ही सूचना दिली जात असते. 93 च्या प्रस्तावाच्या सूचनेतील विषय हा निकडीचा असतो. सभागृहात 93 च्या सूचनांबाबत नियम 95 मध्ये असे म्हटले आहे की, "सभापतींचे समाधान झाले असेल तर ते चर्चेस परवानगी देतील."

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, एक किंवा दोन दिवसात त्या बाबतचे निवेदन या सभागृहामध्ये करावे या दृष्टीने त्या विषयाचे महत्व असते. सभापती महोदय, हे अधिवेशन 15 मार्चला सुरु झाले आणि आज अधिवेशन संपायला आले आहे, तरीसुध्दा नियम 93 च्या सूचनांवरील अनेक निवेदने आलेली नाहीत. तेव्हा यासंबंधी काही तरी नियम केला गेला पाहिजे. आपण या संबंधी ठराविक मुदत घालून दिली पाहिजे. नाही तर सभागृहामध्ये नियम 93 च्या सूचना यापुढे द्यावयाच्या नाहीत असे आम्हाला सांगा. विधान परिषदेच्या सभागृहाचे नियम ठरविण्यात आले आहेत त्या प्रमाणे या सभागृहामध्ये कामकाज होऊ द्यावयाचे नसेल आणि आमच्या प्रश्नांना उत्तरे मिळणार नसतील तर आम्ही या सभागृहामध्ये कशासाठी बसायचे? आम्ही दिलेल्या लक्षवेधी सूचना लागत नाहीत, नियम 93 च्या सूचनांवर माननीय सभापतींनी निवेदन करण्याचे आदेश दिल्यानंतर दोन ते तीन आठवडयानंतर देखील निवेदने येणार नसतील तर यामध्ये कुठेतरी पाणी मुरत आहे. सभापती महोदय, आपण या संबंधी प्रत्येक अधिवेशनामध्ये वारंवार निदेश दिले आहेत तरी सुध्दा आपण दिलेले निदेश हे शासन पाळत नाही, आमच्या नियम 93 च्या सूचनांवर निवेदने देण्यास शासन तयार नाही. या शासनाला विधान परिषदेच्या कामकाजाचे महत्व वाटत नाही यासंबंधी गांभीर्याने विचार झाला पाहिजे. अन्यथा, या विधान परिषद नियमाच्या पुस्तकाला काही अर्थ राहणार नाही या संबंधी आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. आपण किती जरी प्रोसिजर पाळले तरी सरकारला वाटेल त्या पध्दतीने हे सरकार वागणार असेल, विरोधी पक्षाची मुस्कटदाबी करणार असेल तर या सभागृहाच्या नियमामधून नियम 93 अन्वये सूचनेचा नियम काढून टाकला पाहिजे. हा नियम रद्द करुन टाका आणि यापुढे नियम 93 अन्वये सूचना देऊ नका असे आम्हाला सांगून टाका. हे शासन जर अशा पध्दतीने निवेदने देण्याबाबत टाळाटाळ करीत असेल तर पुढील अधिवेशनामध्ये विरोधी पक्षातर्फे कुणीही नियम 93 अन्वये सूचना देणार नाही, तेव्हा या बाबत आपण गांभीर्याने विचार करावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : आज नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील एकूण 22 निवेदने आली होती त्यापैकी 7 निवेदनांवर चर्चा घेण्यात आली. बाकीच्या निवेदनांच्या बाबतीत मला मिळालेल्या माहितीनुसार माननीय सभापती आणि माननीय विरोधी पक्षनेते यांच्या झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये.....

(गोंधळ)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी द्यावी. आपल्या माध्यमातून प्रत्येक वेळी सरकारला तीन दिवसात निवेदन झाले पाहिजे असे सांगण्यात येते. परंतु हे मंत्री महोदय जाणुनबुजून आपले आदेश धुडकावून अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निवेदनांचे गठ्ठे आणून टाकतात. तर मग आपण या ठिकाणी 22 निवेदने आली हे कशासाठी सांगत आहात? ही सरकारची चूक असल्यामुळे आपण सरकारला तंबी देणार नाही, आपण काहीही बोलणार नाही आणि आम्ही फक्त पटलावर ठेवलेली निवेदने ऐकत रहावयाची काय? नाही तर आपण ही पध्दत बंद करुन टाका. आपण वारंवार सरकारला सांगितल्यानंतर सुध्दा हे सरकार आपल्याला जुमानत नाही. आमच्या तोंडातून एक शब्द जरी निघाला तरी माननीय सभापतींचा अवमान केला म्हणून समोरच्या बाकावरुन सर्व माननीय सदस्य ताडकन उभे रहातात. आम्हाला हे सरकार जुमानत नाही, गेली पाच ते सहा अधिवेशने हे प्रकार आम्ही सतत पहात आहोत. मी आतापर्यन्त गप्प बसलो होतो, परंतु आपण 22 निवेदनांचे कौतुक सांगावयास लागला म्हणून मला उभे रहावे लागले....

**उप सभापती** : माझे बोलणे पूर्ण होण्यापूर्वीच आपण बोलू लागल्यामुळे माझे बोलणे अर्धवट राहिले. माझे बोलणे पूर्ण करण्याची आपण मला संधी दिली नाही. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने तातडीने आली पाहिजेत ही गोष्ट मी सुध्दा मान्य करतो. नियम 93 अन्वये सूचनेवर शासनाने निवेदन करावे असे सुस्पष्ट निदेश दिल्यानंतर देखील शासनाकडून वेळेवर निवेदने येत नाहीत असे अनेक वेळा घडलेले आहे. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निवेदने आल्यानंतर त्यापैकी कोणती निवेदने घ्यावी आणि कोणती चर्चेला घेऊ नये हा प्रश्न निर्माण होतो. अशाप्रकारची पाळी पीठासीन अधिकाऱ्यांवर व या सभागृहावर कृपया येऊ देऊ नये असे निवेदन मी या आसनावरुन शासनाला नम्रपणे करतो. या पुढे या सभागृहामध्ये नियम 93 च्या सूचनेवर निवेदन करण्यासंबंधी निदेश दिल्यानंतर शासनाने विहित कालावधीमध्ये सभागृहामध्ये निवेदन करावे एवढेच मी या ठिकाणी नमूद करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या करिता कालमर्यादा निश्चित केली पाहिजे.

**उप सभापती** : त्या बाबत आपण कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये ठरवू.

-----

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: डॉ.(श्रीमती) प्रमिलाताई विष्णू टोपले, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. (श्रीमती) प्रमिलाताई विष्णू टोपले, माजी मंत्री यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"डॉ. (श्रीमती) प्रमिलाताई विष्णू टोपले, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते".

सभापती महोदय, श्रीमती प्रमिलाताई विष्णू टोपले यांचा जन्म 3 ऑगस्ट 1929 रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.बी.बी.एस., डी.ओ.आर.सी.पी., एल.एम. पर्यंत झाले होते.

श्रीमती टोपले यांनी सुरुवातीस काहीकाळ अकोला येथील लेडी हार्डींग रुग्णालय व आयुर्वेद महाविद्यालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्य केले होते. तसेच त्यांनी अकोला शिक्षण प्रसारक मंडळ, शासकीय वैद्यकीय प्रसारक मंडळ व अकोला अर्बन बँकेच्या अध्यक्षा म्हणूनही कार्य केले होते.

श्रीमती टोपले यांनी 1967 ते 1972 पर्यंत अकोला नगरपालिकेच्या सदस्या तसेच राष्ट्रसेविका समितीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या व भा.ज.प.च्या केंद्रीय कार्यकारीणीच्या सदस्या म्हणूनही कार्य केले होते.

श्रीमती टोपले 1978 मध्ये विदर्भ पदवीधर मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाल्या होत्या. त्यांनी जुलै 1978 ते फेब्रुवारी 1980 या काळात राज्यमंत्रीमंडळात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण खात्याच्या मंत्री म्हणूनही कार्य केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे गुरुवार, दिनांक 19 एप्रिल 2012 रोजी दु:खद निधन झालेले आहे.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, डॉ.प्रमिलाताई टोपले यांचे काल रात्री निधन झाल्याचे कळले. गेले महिनाभर त्या बऱ्याच आजारी होत्या. विदर्भातील राजकीय कार्यकर्त्यांना डॉ.प्रमिलाताई यांचे नाव सुपरिचित होते. राष्ट्रीय सेविका समितीच्या कार्यकर्त्या म्हणून त्यांनी काम केले आहे. स्व.मोतीरामजी लहाने, श्री.शंकरराव खंडेलवाल, श्री.दादा देशपांडे अशा सर्व मंडळींच्या बरोबर त्यांनी अकोल्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे काम केले. त्यावेळी त्यांनी जनसंघाच्या महिला आघाडी प्रमुख म्हणून देखील काम केले होते. डॉ.प्रमिलाताई यांचे पक्षातील स्थान मोठे होते. संघ परिवारामध्ये त्यांचे स्थान मोठे होते. सुपरिचित होते. डॉ.प्रमिलाताई अकोल्यामध्ये परिवारातील पालक म्हणून काम पहात होत्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक माननीय गोळवळकर गुरूजी असो, आदरणीय श्री.अटलजी असो, जेव्हा अकोल्यामध्ये कुठल्याही नेत्याचे येणे असे त्यावेळी डॉ.प्रमिलाताई यांचे घर निवासासाठी हक्काचे असायचे. प्रमोदजींना त्यांनी आपले मानसपुत्रच मानले होते.

डॉ.प्रमिलाताई विधान परिषदेवर पदवीधर मतदार संघातून निवडून आल्या होत्या. माननीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार आले त्यावेळी त्यांनी आरोग्य मंत्री म्हणून काम पाहिले. त्या आरोग्य मंत्री असताना तीन वर्षाचा डॉक्टरांसाठी अभ्यासक्रम सुरू केला. ग्रामीण भागात एम.बी.बी.एस.डॉक्टर्स फारसे जात नाहीत. असे काही डॉक्टर्स निर्माण केले पाहिजेत की, ते ग्रामीण भागात, नक्षलवादी भागात जातील या विचाराने ग्रामीण भागातील जनतेला सुविधा उपलब्ध होण्यासाठी व डॉक्टर्स उपलब्ध व्हावेत यासाठी त्यांनी नवीन अभ्यासक्रम सुरू केला. समाजमनाचे सातत्याने चिंतन करणाऱ्या त्या कार्यकर्त्या होत्या. देशात ज्यावेळी आणीबाणी जाहीर झाली त्यावेळी त्या कारावासात होत्या. त्यावेळी देखील त्यांनी लोकशाहीसाठी लढा दिला होता. त्यानंतर निवडणूक लढवून सरकारमध्ये आल्या. त्यांनी विरोधी आणि सत्ताधारी या दोन्ही बाजूने काम केले आहे. सामान्य माणसाच्या हितासाठी कसे काम करता येईल याचे मूर्तिमंत उदहारण म्हणून डॉ.प्रमिलाताई यांच्याकडे बघता येईल. अशा डॉ.प्रमिलाताई टोपले यांचे काल निधन झाले. सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला मी पाठिंबा देतो आणि सर्व विरोधी पक्षाच्या वतीने त्यांना आदरांजली वाहतो.

यानंतर सौ.रणदिवे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : माननीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी श्रीमती प्रमिलाताई टोपले यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काल रात्री 11.30 वाजता श्रीमती प्रमिलाताई टोपले यांचा मृत्यू झाला आणि नंतर 11.45 वाजता मला ही बातमी समजली आणि त्यावेळी मी ट्रेनमध्ये होतो. चार-पाच दिवसापूर्वी म्हणजे मागच्या रविवारच्या सुटीमध्ये जेव्हा मी गावाला गेलो होतो, तेव्हा मी त्यांना भेटावयास गेलो आणि त्यांना त्याच दिवशी दवाखान्यातून सुटी मिळाली होती. डॉक्टरांनी त्याच दिवशी सांगितले होते की, आता त्यांना घरी घेऊन जावे. श्रीमती प्रमिलाताई टोपले यांचा आणि माझ ा संबंध 1975 पासून म्हणजे जेव्हा मी विद्यार्थी दशेमध्ये होतो तेव्हा पासून आला. त्यावेळी त्या विदर्भाच्या एकमेव ज्येष्ठ महिला नेत्या होत्या. त्यावेळी आणीबाणी जाहीर झाली होती आणि मी विद्यार्थी चळवळीमध्ये काम करीत होतो. तेव्हा त्यांनी विदर्भातील सर्व लोकांना आणीबाणीमध्ये कशा पध्दतीने काम केले पाहिजे याचे सतत मार्गदर्शन केले होते. त्यावेळी त्यांनाही तुरुंगामध्ये जावे लागले होते.

सभापती महोदय, 1978 मध्ये जेव्हा त्या पदवीधर मतदार संघातून निवडून आल्या, त्यावेळी योगायोगाने मी महाराष्ट्र विधानसभेमध्ये सदस्य म्हणून निवडून आलो. ज्यावेळेला कै.वसंतदादा पाटील यांचे सरकार जाऊन पुरोगामी लोकशाही आघाडीचे म्हणजे माननीय श्री.शरद पवार यांचे सरकार सत्तेवर आले. तेव्हा त्यांना आरोग्य मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी मी विधान सभेमध्ये होतो. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून तयार झालेल्या श्रीमती प्रमिलाताई टोपले यांचे डॉक्टरी पेशामध्ये अकोला येथे एक अग्रगण्य महिला डॉक्टर म्हणून जे काम होते, त्या सर्व कामाचा अनुभव राज्याला होईल हे माननीय श्री.शरद पवारसाहेबांनी ओळखले आणि त्यांना मंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली होती. त्यावेळी पुरोगामी आघाडी लोकशाहीचे सरकार दोन वर्षे कार्यरत होते. त्या काळामध्ये श्रीमती प्रमिलाताई टोपले यांनी आपल्या विभागाचा कारभार बदलला. तसेच अनेक चांगले निर्णय घेतले आणि त्यांना मिळालेल्या संधीचे सोने करुन दाखविले. माननीय श्री.शरद पवार साहेबांच्या ज्या-ज्या वेळी आमदारांबरोबर बैठका होत असत, तेव्हा ते श्रीमती प्रमिलाताई टोपले यांचा आदराने उल्लेख करीत असत. माननीय मंत्री म्हणून काम करीत असताना मी त्यांना जवळून पाहिले आहे असा ते उल्लेख करीत. तसे आम्ही त्यांना खूप ज्युनिअर होतो. आमच्यावर त्यांचे मुलासारखे प्रेम होते. पण विदर्भाचा जो मागासलेपणा आहे मग तो .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

शिक्षणाच्या माध्यमातून असेल, सिंचनाच्या माध्यमातून असेल, सार्वजनिक बांधकामाच्या माध्यमातून असेल. तो नाहीसा झाला पाहिजे यासाठी त्या काम करीत होत्या.

सभापती महोदय, मला आठवते ज्यावेळी माननीय श्री.शरद पवारसाहेबांनी त्यांना सांगितले की, तुमच्या भागामध्ये एखादे इंजिनिअरींग कॉलेज काढावे. तेव्हा श्रीमती प्रमिलाताई यांनी पुढाकार घेतला. मी तेव्हा आमदार होतो आणि माझ्या मतदार संघामध्ये कॉलेज सुरु केले होते. श्रीमती प्रमिलाताई टोपले यांनी माननीय श्री.शरद पवार साहेबांचा निरोप मला सांगितला की, तुझ्या मतदार संघामध्ये एक इंजिनिअरींग कॉलेज सुरु करावयाचे आहे. त्यावेळी शेगाव संस्थानचे जे विश्वस्त होते, त्यांना भेटण्यासाठी श्रीमती प्रमिलाताई टोपले मला घेऊन गेल्या आणि मग त्यांच्या प्रयत्नाने तेथे महाराष्ट्रातील अतिशय चांगले इंजिनिअरींग कॉलेज सुरु झाले. तसेच अकोल्याचे मेडिकल कॉलेज सुरु करण्याबद्दल श्रीमती प्रमिलाताई टोपले यांच्या काळात प्रयत्न झाले असून खरे म्हणजे त्यांनीच याला चालना दिली आहे. त्यांची इच्छा होती की, सरकारी मेडिकल कॉलेज काढण्याऐवजी अकोला येथील काही लोकांनी मिळून मेडिकल कॉलेज सुरु केले तर लोकांच्या दृष्टीने चांगले होईल. अशा प्रकारे एखाद्या पुरुषाला लाजवावे अशा प्रकारे सामाजिक सेवेमध्ये, अकोल्याच्या जनजीवनामध्ये श्रीमती प्रमिलाताई टोपले यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता.पण आता शेवटच्या तीन-चार महिन्यामध्ये त्यांची तब्येत बिघडली होती. या तीन-चार महिन्यामध्ये माझी आणि त्यांची दोन वेळा भेट झाली होती तेव्हा त्या चांगल्या स्थितीत होत्या. पण मी परवा त्यांना भेटावयास गेलो तेव्हा त्या कोमात होत्या. त्या बोलू शकत नव्हत्या, पाहू शकत नव्हत्या आणि त्यांची ती स्थिती पाहून मला दुःख वाटले की, अशा प्रकारे वर्षानुवर्षे समाज सेवेमध्ये कार्यरत असलेली आमची माता आज अशा स्थितीत आहे.

सभापती महोदय, त्यांनी अकोला शहरापासून ते केंद्रीय स्तरापर्यंत दिल्लीपर्यंत संघटनेमध्ये ज्या उत्कृष्ट पध्दतीने काम केले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अनुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आणि वरच्या स्तरावरील नेत्यांपासून तर खालच्या कार्यकर्त्यांपर्यंत त्यांचा मोठा संपर्क होता. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे यांनी सांगितले ते खरे आहे की, कोणताही नेता आला की, प्रतिलाताईंच्या घरी राहात असे. त्यांनी कोणत्याही नेत्याला कधी रेस्ट हाऊसवर उतरु दिले नाही. माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी ज्या ज्या वेळी अकोल्यामध्ये आले त्या त्या वेळी ते कधीही रेस्ट हाऊसला थांबले नाहीत. इतका त्यांचा स्वभाव निगर्वी आणि प्रेमळ होता. या माध्यमातून त्यांनी पक्ष संघटना वाढविण्याचा खूप प्रयत्न केला. आज त्या आपल्यामध्ये नाहीत. आमच्या विदर्भातील, अकोला जिल्ह्यातील, बुलढाणा जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांच्या डोक्यावरील छत्र आज हरपलेले आहे. आज सकाळी 10.00 वाजता त्यांचा अंत्यविधी होता. आम्हाला रात्री उशिरा समजल्यामुळे आम्ही त्या ठिकाणी पोहचू शकलो नाही. त्यांचा अंत्यविधी झाल्यानंतर सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी हा शोक प्रस्ताव या ठिकाणी आणला आणि त्यांच्यासंबंधी या ठिकाणी सहवेदना व्यक्त केल्या. त्यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे मी समर्थन करतो. माझ्या वतीने, माझ्या कुटुंबाच्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. खरे म्हणजे आता त्यांचे कुटुंबीय राहिलेले नाहीत. एक तर त्यांचे पती डॉ. टोपले 25 वर्षापूर्वी मयत झाले आणि प्रमिलाताईंचे काल निधन झाले. त्यांना मूलबाळं नव्हते. बहिणीची मुलगी त्यांनी दत्तक घेतली होती. तेवढाच त्यांचा कुटुंबाचा एक अंश त्या ठिकाणी आहे. डॉ. प्रमिलाताई टोपले यांना सद्‌गती मिळो तसेच त्यांच्या सर्व कुटुंबीयांना, त्यांचे आप्त, नातेवाईक यांना हे दु:ख सहन करण्याची ताकद मिळो अशी मी ईश्वराकडे प्रार्थना करतो. माझ्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

---

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या बाबतीत माझ्या पक्षाच्या वतीने आणि माझ्या वतीने सहवेदना प्रकट करण्यासाठी उभा आहे. विदर्भ पदवीधर मतदारसंघातून निवडून आलेल्या डॉ. प्रमिलाताई टोपले यांचे दु:खद निधन झालेले आहे. सुरुवातीच्या काळामध्ये माझा संबंध ज्या दोन आरोग्य मंत्र्यांशी आला त्या म्हणजे डॉ. ललिता राव आणि दुसऱ्या डॉ. प्रमिलाताई टोपले.

सभापती महोदय, त्यांचे काही निर्णय जरी वादग्रस्त होते तरी देखील त्यांनी खरोखरच ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी खूप प्रयत्न केले. ज्यावेळी त्यांनी बेअरफूटेड डॉक्टर हा कन्सेप्ट मांडला त्यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनने त्यांना खूप मोठ्या प्रमाणावर विरोध केला. पण अशा प्रकारचे डॉक्टर तयार करणे म्हणजे ते समाजाला घातक ठरतील अशा प्रकारचे मत प्रकट केले गेले. त्यामुळे त्यांना खूप मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. पण त्यांनी या विरोधाला जुमानले नाही. नंतर त्यांना एमसीआयचा विरोध झाला. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने या बेअरफूटेड डॉक्टर्सवर बंदी आणण्याचा प्रयत्न केला. हा तीन वर्षाचा कोर्स होता. तरी देखील त्यांनी तो कोर्स नेटाने पुढे रेटला आणि त्यांनी सांगितले की, आरोग्य हा कंकरंट विषय आहे आणि हा विषय राज्याच्या अधीन आहे. त्यामुळे राज्यामध्ये कोणते कोर्सेस सुरु करावेत, कोणते कोर्सेस सुरु करु नयेत हा राज्याचा अधिकार आहे असे केंद्र सरकारला ठणकावून सांगणाऱ्या आरोग्य मंत्री डॉ. प्रमिलाताई टोपले होत्या. त्यांच्याकडे कुटुंब कल्याण खाते सुध्दा होते. त्यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण हे एकच खाते होते. त्यावेळी फॅमिली प्लॅनिंग फार जोरात होते. जनरल प्रॅक्टीशनर्सना फॅमिली प्लॅनिंगचे ज्ञान मिळण्यासाठी सर्टिफिकेट इन फॅमिली प्लॅनिंग नावाचा एक कोर्स त्यांनी सुरु केला. खरोखरच त्या बाबतीत देखील मी त्यांचे अभिनंदन करीन.

माझा त्यांच्याशी खूप जवळचा संबंध होता. कोणत्याही पक्षाचा माणूस असो, ज्या ज्या वेळी कोणी त्यांच्याकडे सजेशन घेऊन गेला तर ती सजेशन त्या स्वीकारीत, त्यावर विचार करीत आणि साधकबाधक चर्चा करीत. मार्डचा प्रश्न असेल किंवा जनरल प्रॅक्टीशनर्सचा प्रश्न असेल, त्यांनी नेहमी त्याकडे आपल्या फ्रॅटर्निटीचा माणूस म्हणून पाहिले आणि आरोग्य मंत्री म्हणून त्यांनी

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST

डॉ. दीपक सावंत ....

खूप चांगले काम केले. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे यांनी सांगितले की, आणीबाणीच्या काळामध्ये त्यांनी तुरुंगवास देखील भोगलेला आहे. त्या पूर्वाश्रमीच्या जनसंघाच्या होत्या. मी माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे एक व्यक्तीगत रिलेशन म्हणून तीव्र शोक प्रकट करुन माझे दोन शब्द संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी डॉ.श्रीमती प्रमिलाताई विष्णू टोपले, माजी वि.प.स. व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी या शोक प्रस्तावाला पाठिंबा देताना आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

कै.श्रीमती टोपले यांनी सुरुवातीस काही काळ अकोला येथील लेडी हार्डींग रुग्णालय व आयुर्वेद महाविद्यालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्य केले होते. तसेच त्यांनी अकोला शिक्षण प्रसारक मंडळ, शासकीय वैद्यकीय प्रसारक मंडळ व अकोला अर्बन बँकेच्या अध्यक्षा म्हणूनही कार्य केले होते.

कै.श्रीमती टोपले यांनी 1967 ते 1972 पर्यंत अकोला नगरपालिकेच्या सदस्या तसेच राष्ट्रसेविका समितीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या व भा.ज.प.च्या केंद्रीय कार्यकारिणीच्या सदस्या म्हणूनही कार्य केले होते.

कै.श्रीमती टोपले 1978 मध्ये विदर्भ पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाल्या होत्या. त्यांनी जुलै, 1978 ते फेब्रुवारी, 1980 या काळात राज्य मंत्रिमंडळात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण खात्याच्या मंत्री म्हणूनही कार्य केले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे गुरुवार, दिनांक 19 एप्रिल, 2012 रोजी दु:खद निधन झ
ाले.

सन्माननीय सभासदांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियाकडे पाठविण्यात येईल.

-----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 15 मिनिटांनी पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.43 ते 2.15 पर्यंत स्थगित झाली. )

------

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी.**: उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार

**मु.शी.**: उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार

या विषयावर सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, भगवानराव साळुंखे, सय्यद पाशा पटेल आणि नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

राज्यात जास्तीत जास्त उद्योगधंदे यावेत याकरिता त्यांना एम.आय.डी.सी.मार्फत भूखंडाचे वाटप करण्यात येणे, परंतु या भूखंड वाटपामध्ये गत दीड वर्षात झालेल्या अनियमिततांमुळे हजारो कोटींची गुंतवणूक असणारे उद्योग राज्याबाहेर जाणे, भूखंडाचे सुधारित दरास मान्यता देण्यास चालढकल केल्याने एम.आय.डी.सी.चे शेकडो कोटींचे नुकसान होणे, सेझ, जिल्हा उद्योग कर्ज योजना इत्यादींच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष झाल्याने लक्षावधी तरुण रोजगारापासून वंचित रहाणे, सन 2008-09 मध्ये प्रति शत लक्ष मीटर / घनमीटर पाणी साठा करण्याकरिता 1 कोटी 56 लक्ष एवढा खर्च येत असताना 2010-11 मध्ये हा खर्च 7 कोटी 11 लक्ष एवढा होणे, पाटबंधारे खात्याच्या विविध प्रकल्पामध्ये भ्रष्टाचार झाल्याने सिंचनाखाली आलेल्या जमिनीच्या प्रमाणात 1 टक्क्यापेक्षा कमी वाढ होणे, शैक्षणिक सामाजिक इत्यादीकरिता शासकीय भूखंड वाटपाचे धोरण असणे, परंतु या भूखंडाचा वापर इतर व्यावसायिक कारणांसाठी केल्याचे उघडकीस येणे, शासकीय जमिनी वाटपाच्या धोरणातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे अनेक भूखंड वाटपात उघडकीस येणे, संपूर्ण राज्यामध्ये विविध भूखंड घोटाळे उघडकीस येणे, उद्योग, पाटबंधारे व महसूल या महत्वाच्या खात्यात असणा-या भ्रष्टाचारामुळे महाराष्ट्रातील कोटयवधी जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कारवाई विचारात घेण्यात यावी."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या वतीने "राज्यातील विविध खात्यामधील भ्रष्टाचारामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष व अस्वस्थता" असा एका ओळीचा प्रस्ताव दिला होता. परंतु नियमाप्रमाणे अंतिम आठवडा प्रस्तावाला मंत्र्यांची संमती आवश्यक असते. सर्व खात्यातील भ्रष्टाचाराबाबत चर्चा न करता ती दोन-चार खात्याबाबत करा असे आम्हाला सांगण्यात आले. त्यामुळे उद्योग, सिंचन आणि महसूल या तीन खात्याच्या संदर्भातच चर्चा मयादित केलेली आहे. काल या सभागृहात माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे उपस्थित होते. आज ते या ठिकाणी उपस्थित असते तर उद्योग विषयाच्या संदर्भातील अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या असत्या.

....नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महोदय,सभापती महोदय, उद्योग खात्यामध्ये पाहिले तर 1991 या वर्षी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारले गेले. त्यानुसार 1993 मध्ये राज्य शासनाने एक औद्योगिक धोरण घोषित केले. युती सरकारच्या काळात 1998 मध्ये माहिती व तंत्रज्ञान धोरण जाहीर झाले आणि 2001 मध्ये माहिती व तंत्रज्ञानाचे दुसऱ्या टप्प्यातील धोरण जाहीर करण्यात आले. 2001 नंतर जगात, देशात, राज्यात नवीन औद्योगिक धोरण जाहीर झाले असे माझ्या ऐकिवात नाही. महाराष्ट्राने औद्योगिक क्षेत्रामध्ये आघाडीचे स्थान कायम राखले आहे. 2001 या वर्षी राष्ट्रीय दरडोई उत्पन्नाच्या 7 टक्के अधिक असणारे आपले महाराष्ट्र राज्य हे 50 टक्क्यांनी खाली आलेले आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणीचे अहवाल आम्हाला प्राप्त झालेले आहेत. त्यात महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 55108 एवढे आहे. महाराष्ट्राच्या आसपासची राज्ये, केंद्र शासित प्रदेश राज्ये यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 55108 पर्यंतच थांबले आहे. नागरी बेरोजगारीचा दर 3.02 पर्यंत गेला आणि आसपासच्या राज्यात तो दर 1.08 पर्यंत आहे. दर लाख लोकसंख्ये मागे आस्थापने मधील आपली रोजगाराची संख्या 18853 एवढी आहे. केरळ 17654, आंध्र प्रदेशात 14002 आणि गुजरातमध्ये 11000 एवढी आहे. दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येची टक्केवारी महाराष्ट्रात 32.40 आहे. मध्यप्रदेशात 11, गुजरात मध्ये 12, दिल्ली 8 आणि झारखंड 4 इतकी आहे. औद्योगिक धोरण, उद्योगांची प्रगती या अनुषंगाने महत्वाच्या गोष्टी आहेत म्हणून मी आकडेवारी सांगतो आहे.

महोदय,मी बजेटवर भाषण करताना एक मुद्दा प्रामुख्याने मांडला होता. माननीय वित्त मंत्री माझ्या मुद्याच्या उत्तराच्या भाषणात उल्लेख करतील व त्यामुळे आम्हाला काही तरी दिशा मिळेल असे वाटले होते. खाजगीत त्यांनी मला बऱ्याच गोष्टी सांगितल्या त्या वेगळया आहेत. 12 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये मॅन्युफॅक्चरींग सेक्टरच्या जी.डी.पी.चे प्रमाण 25 टक्के वाढविण्याचे धोरण अखिल भारतीय स्तरावर ठरले. ते ठरल्यानंतर केंद्र सरकारने नॅशनल मॅन्युफॅक्चरींग इन्व्हेस्टमेंट झोन स्थापन करण्याचा निर्णय घेतला. मी त्यावेळी माननीय पंतप्रधान यांचे भाषण ऐकले होते. त्यांनी त्या भाषणात सांगितले की, टाटाने जसे औद्योगिक शहर उभे केले तसे एकही शहर या देशात उभे राहिलेले नाही. इंडस्ट्रीयल टाऊनशीप निर्माण झाल्या पाहिजेत. देशातील इतर राज्यांमध्ये एक टाऊनशीप दिली गेली, परंतु महाराष्ट्राला दोन टाऊनशीप मान्य केल्या, त्यातील

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

एक टाऊनशीप दिघी येथे आहे. दिल्ली ते महाराष्ट्र-मुंबईचा जो कॉरिडॉर आहे त्यातील दिघी ही एक टाऊनशीप आहे. त्यासाठी कामकाज झाले पाहिजे. इतर राज्यात जमीन अधिग्रहण करुन त्यासंबंधी कार्यवाही सुरु झालेली आहे.

महोदय,मला एका अतिशय ज्येष्ठ मंत्र्यांनी विचारले की, विनोद ही टाऊनशीप होईल काय ? एवढया मोठया प्रमाणात जमीन अधिग्रहण करुन तेथे टाऊनशीप उभी राहणे शक्य आहे काय ? अशीही विचारणा त्यांनी माझ्याकडे केली. मंत्रिमंडळातील सिनियर मंत्र्यांना प्रश्न पडला आहे की, ही टाऊनशीप उभी राहील काय? कारण ही टाऊनशीप उभी करण्यासाठी पुढील प्रोसेस करण्यास देखील आपण सुरुवात केलेली नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

केंद्राने 25 टक्क्यापर्यंत जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यादृष्टीने आपल्याला काही देऊ केले आहे. परंतु राज्याची झोळी फाटकी असेल तर आपण काय करु शकतो? प्रस्तावित वस्तू निर्मितीच्या क्षेत्रावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे. त्यामुळे रोजगार वाढणार आहे, निर्यात वाढणार आहे. दिल्ली ते मुंबई कॉरिडॉरबाबत कल्पना अशी आहे की, आताचे जे उत्पादन आहे त्याच्या दुप्पट मॅन्युफॅक्चरिंग झाले पाहिजे, तिप्पट निर्यात झाली पाहिजे. त्याच्या तुलनेत रोजगार निर्माण झाला पाहिजे.

सभापती महोदय, दिल्ली मुंबई कॉरिडॉरचे दोन टप्पे केंद्र सरकारने निश्चित केले आहेत. कारण आपल्याकडून काही प्रगती होत नाही म्हणून दिल्ली ते गुजरात असा पहिला टप्पा निश्चित केला आहे. त्यासाठी लागणारी जमीन अधिग्रहण करण्याचे काम सुरु आहे. बऱ्याच प्रमाणात कामाला सुरुवात झालेली आहे. माझा एक मित्र जपानला गेला होता. कारण या कामासाठी जपानकडून फायनान्स देण्यात येणार आहे. त्या निमित्ताने त्याला जपानमध्ये जाण्याची संधी मिळाली. त्यांच्याकडून शिष्टमंडळ आले होते. त्यांना इंडस्ट्रियल गाईडने सांगितले की, कोणत्याही बँकेला आम्ही मुंबई वा महाराष्ट्रातील कॉरिडॉरच्या आसपासच्या भागातील आहोत असे सांगू नका. अन्यथा तुमच्या कार्यक्षमतेविषयी प्रश्न निर्माण होईल. कॉरिडॉरच्या कामासाठी जपान पैसे द्यायला तयार आहे. परंतु महाराष्ट्राकडून काही हालचाल होत नाही. महाराष्ट्राचे नाव जगात मोठे झाले पाहिजे ते होताना दिसत नाही. या कॉरिडॉरबाबत केंद्राने मदतीचा हात देऊनही आपल्याला काही करता येत नाही, काही होत नाही किंवा आपली क्षमता नाही. तो विषय मी बाजूला ठेवतो.

सभापती महोदय, राज्यात एमआयडीसी या महामंडळाच्या माध्यमातून उद्योग वाढविण्याचे प्रयत्न करीत आहोत का? उद्योगविषयीचे धोरण राबवित असताना उद्योग विकास महामंडळाच्या कारभाराविषयी जे ऐकावयास मिळते त्यावरुन माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांची बदनामी करण्याचा डाव कोणीतरी रचला आहे असे वाटते. कोकणातील माणूस पुढे जायला निघाला की त्याची बदनामी सुरु होते. या उद्योग विकास महामंडळाचे भूखंड वाटपाचे धोरण आहे.त्या धोरणांतर्गत लॅण्ड डिस्पोजल रुल्स ठरविण्यात आले आहेत.लॅण्ड डिस्पोजल रुल्समध्ये भू वाटप समितीचे कार्यक्षेत्र ठरवून दिले आहे.त्यामध्ये भू संपादन आणि भू वाटप असे दोन भाग केलेले

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

आहेत. नियम 1962 पासून अंमलात आलेले आहेत. भू वाटपाचा अर्ज नाकारणे किंवा मान्य करण्याचे अधिकार भू वाटप समितीला आहेत. माननीय मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना अधिकार दिलेला नाही. या भू वाटपावर नियंत्रण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आहे. 1962 पासून हे धोरण प्रत्यक्षात अंमलात आलेले आहे. या सगळ्या प्रोसेसमधून उद्योग विभाग पुढे जात नाही. उद्योग विभाग गतीने पुढे जायला पाहिजे ते होत नाही. म्हणून माननीय उप मुख्यमंत्र्यांनी नवीन धोरण आणले आणि त्यातून प्रगती होईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. 18 डिसेंबरला पत्रक काढले. भू वाटप समितीला नियमबाह्य पध्दतीने भू वाटप झाल्याचे निदर्शनास आले असेल तर महामंडळाला भूखंडासंबंधी शिफारस करण्याचे अधिकार भू वाटप समितीला असतील. भू वाटप समितीने त्या अधिकारानुसार शिफारस करावी. भूखंड दिला व नंतर ते योग्य आहे की नाही, निकषानुसार झाले की नाही हे पाहिले जाईल. माननीय उद्योग राज्यमंत्री श्री.सचिन अहिर पाहतात की नाही हे मला माहिती नाही. परंतु राज्यमंत्र्यांना याबाबत अधिकार नाही असे कळते. नियमानुसार भूखंड दिले जावेत या उदात्त हेतूने माननीय उप मुख्यमंत्र्यांनी धोरण ठरविले होते. संचालक मंडळामध्ये त्यावर चर्चा झाली. तेथे चर्चा झाल्यानंतर हा प्रस्ताव नामंजूर झाला. कोकणाच्या माणसावर पुन्हा कसा अन्याय केला पहा?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

त्या विभागाचे प्रमुख उद्योग मंत्री श्री. नारायण राणे हे स्वत: असून आयएएस लॉबी त्यांच्याकडे आहे तरी देखील प्रस्ताव नामंजूर होतो. या प्रस्तावाबाबत दादांचे म्हणणे होते की, हे नियमबाह्य होते. तसेच यासंबंधी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र समिती तयार केली आणि त्या समितीची स्वतंत्र बैठक घेऊन एक नवीन धोरण ठरेपर्यंत भूखंड वाटपाच्या सर्व फाईल्स मंत्रालयात पाठवाव्यात, त्यानंतर निर्णय घेतला जाईल असे ठरविण्यात आले. अशा प्रकारे जॉईंट सीईओने घेतलेला निर्णय चुकीचा ठरवून एमपीएससी मार्फत सिलेक्टेड डेप्युटी सीईओना हे अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निमित्ताने मला इतकेच म्हणावयाचे आहे की, जर मंत्रालयात बसलेली आयएएस लॉबी अशा प्रकारे नियमबाह्य काम करीत असतील तर त्यांच्या अखत्यारित असलेले त्यांच्या हाताखालील डेप्युटी सीईओ दर्जाचे अधिकारी नियमात राहून काम करतील असे कसे म्हणता येईल, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच असे भूखंड वाटपासंबंधीचे कार्यवृत्त या डेप्युटी सीईओंनी लिहिलेले आहे काय ही माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे. भूखंड वाटपासंबंधीच्या प्रत्येक नस्तीवर समितीने स्वत:चा निर्णय घ्यावयाचा आणि ती सीईओना न पाठविता सरळ मंत्रालयात प्रस्ताव पाठवावयाचा आहे. पण त्यासोबत अशा स्वरुपाचे कार्यवृत्त कुठेही उपलब्ध नाही. मी माहितीच्या अधिकाराखाली पत्र लिहून या कार्यवृत्ताची मागणी केली पण मला ते उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे अजून किती जमीन वाटप झाली अशी कोणतीही खातरजमा करता येत नाही. मग पुन्हा लोकांमध्ये चर्चा होण्याची शक्यता आहे की, अशा भूखंडांचे वाटप करण्यासाठी आणि आयएएस अधिकाऱ्यांच्या हातात असे अधिकार दिल्यानंतर पुढे त्यातून मंत्र्यांना बदनाम करण्यासाठी देखील ते अधिकारी मागे पुढे पाहत नाहीत. तसेच मी मघाशी म्हटल्याप्रमाणे असे वाटप नियमबाह्य आहे व त्यात पारदर्शकता येत नाही असा त्या पत्रात उल्लेख होता हा सर्व कार्यभार सीईओ आणि जॉईंट सीईओ यांच्याकडून काढून घेतला त्यामुळे यातील पारदर्शकता कोणती राहिली हा प्रश्न उपस्थित होतो. हे दोन्ही आदेश काढले असतील तर दोघांचाही उद्देश मात्र एकच होतो की, त्यामध्ये असे वाटले की, मंत्रालयातच भूखंड वाटपाचा निर्णय झाला पाहिजे, कारण तेथून हे वाटप नियमबाह्य होण्याची शक्यता आहे म्हणून इकडे निर्णय घेणे आवश्यक आहे. माझी विनंती अशी आहे की, उद्योग विस्ताराची मागणी प्रचंड प्रमाणात असताना त्यांना भूखंडाचे वाटप तातडीने करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

दि. 9 मे, 2011 रोजी 341 वी सभा घेण्यात आली व 341 व्या सभेमध्ये 340 व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी ठेवण्यात आले. त्यावेळी उद्योग विस्तारासाठी भूखंड वाटप करण्याचा ठराव मंजूर करतांना उद्योग विकासासाठी भूखंड वाटपाचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या भूखंड वाटप समितीस देण्यात येत आहेत हे कलम वगळून इतिवृत्त मंजूर करावे असा आदेश त्या ठिकाणी देण्यात आला व त्यानुसार इतिवृत्त मंजूर करण्यात आले. हा आदेश एक तर तुम्ही काढला असेल किंवा तुमच्या सिनियरने काढला असावा. सीईओ यांना देण्यात आलेले अधिकार रद्द करण्यामागील नेमके कारण काय ? एमआयडीसी कडून दिनांक 6 सप्टेंबर, 2011 पर्यंत झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त माहितीच्या अधिकारात मिळालेले आहे. या पत्राला उत्तर देतांना पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, 6 डिसेंबर, 2011 नंतर दोन बैठका झाल्या आहेत. यातील 344 व्या बैठकीच्या इतिवृत्तास पृष्टी मिळण्यासाठी इतिवृत्त...

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांना नियम 46 अन्वये निवेदने करावयाची आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण,2012

**मु.शी.**: महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण,2012 संबंधी

मा.उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबतचे जोडलेले निवेदन छापावे.)

--

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण, 2012

**मु.शी.**: महाराष्ट्र राज्याचे युवा धोरण, 2012 संबंधी
मा.उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबतचे जोडलेले निवेदन छापावे.)

--

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्राच्या कला क्षेत्रातील मान्यवरांना देण्यात आलेले पुरस्कार

**मु.शी.**: महाराष्ट्राच्या कला क्षेत्रातील मान्यवरांना देण्यात आलेले पुरस्कार यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांची किंमत निश्चित करणे

**मु.शी.**: मुंबईतील गिरणी कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकांची किंमत निश्चित करणे यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात आलेली विशेष पटपडताळणी मोहिम

**मु.शी.**: राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात आलेली विशेष पटपडताळणी मोहिम यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला बँकींग
परवाना मिळणे

**मु.शी.**: महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला बँकींग
परवाना मिळणे या संबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनी याठिकाणी पटपडताळणी विषयी निवेदन केलेले आहे. शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यामध्ये . . ..

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे आपण जड अंत:करणाने बोलत आहात काय ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी चुकीचे समर्थन करण्यासाठी उभा नाही. ज्या ठिकाणी बोगस पटसंख्या असेल, कमी विद्यार्थी संख्या असेल . . ..

(सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील खाली बसून बोलतात.)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, मी तेच बोलत आहे. माझे ऐकावे.

**उप सभापती** : आता या विषयावर चर्चा होणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे बोलत असताना आम्ही उठून बोलतो काय ? आम्ही तुमचा मान राखतो याचा अर्थ असा नाही . . . .

**उप सभापती** : याठिकाणी निवेदनावर चर्चा होणार नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, फक्त एकच मुद्दा आहे.शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये फौजदारी सारखे गुन्हे दाखल करणे हे कितपत योग्य आहे? याबाबतीत कारवाई करा किंवा शाळा बंद करा. जर कोणी काही चुकीचे करीत असेल तर ते दुरुस्त झालेच पाहिजे.

**उप सभापती** : हे तुम्ही कशासाठी सांगावयास पाहिजे? त्यासाठी शासन आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घराच्या बाबतीत निवेदन झाले. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मुद्दा मांडला होता.

**उप सभापती** : मी निवेदनावर कोणाही माननीय सदस्यांना चर्चा करण्यास अनुमती देणार नाही. या सदनामध्ये असा मुद्दा उपस्थित झाला होता की, हुतात्म्यांमध्ये जे सात गिरणी कामगार आहेत त्यांच्या वारसांना सोडतीमध्ये न घेता प्राधान्याने मोफत घरे द्यावीत. अशी जी मागणी होती त्याप्रमाणे ही घरे त्यांना सोडतीमध्ये न देता आपण त्यांना मोफत देत आहात त्या बद्दल मी शासनाला धन्यवाद देतो आणि या निर्णयाचे स्वागत करतो. त्याच वेळेला त्यांच्या व्यतिरिक्त जे 105 हुतात्मे आहेत . . . .

श्री.अजित पवार : सभापती महोदय, एकूण 105 हुतात्मे झाले आहेत त्यातील 22 गिरणी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . ..

कामगार होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी 105 हुतात्मे झाले, त्यांनी आपले रक्त सांडले. यामध्ये जे गिरणी कामगार होते, त्यांच्या वारसांना घरे मिळाल्याचा आनंद आहेच, त्याचे स्वागतच आहे. त्याच बरोबर इतर जे हुतात्मे झाले आहेत, त्यांच्या वारसांचा देखील विचार करणे आवश्यक आहे. त्यांचे बलिदान वाया जाणार काय ? हा एक विषय आहे. तसेच येथील गिरणी कामगारांना मोफत घरे द्यावीत असा आग्रह होता. पण प्रत्यक्षात तुम्ही 80 हजाराची सूट देऊन त्यांची बोळवण करीत आहात. माननीय मंत्री श्री.सचिन अहिर यांच्या नेतृत्वाखाली त्या लोकांना 2 लाख, 3 लाख रुपये मिळाले आणि आता ते खर्च झाले आहेत.पण आपण त्यांना मोफत घरे देण्यासाठी असमर्थ ठरला आहात. बाकीच्यांना मात्र सोसायट्या करुन घरे बांधण्याच्या संदर्भातील तुमचा जो अहवाल आहे, तो आम्ही नंतर वाचू. पण शासनाने गिरणी कामगारांना घरे देण्याच्या बाबतीत जे मनोगत व्यक्त केले त्याचा आम्ही निषेध करुन सभात्याग करतो.

(यानंतर विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सभात्याग केला.)

**उप सभापती** : आता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी आपले प्रस्तावावरील भाषण पुढे सुरु करावे.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

**कोकणातील आंबा पिकास नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, कोकणातील आंब्याच्या संदर्भामध्ये हे सभागृह संपण्याच्या अगोदर निर्णय घेऊ असे सांगितले होते. आज या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आठ दिवसात सर्व्हे करुन निर्णय घेऊ असे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात दिले होते. या बाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ? आंब्याच्या बाबतीत मागच्या तीन वर्षापासून नुकसान भरपाई मिळालेली नाही. यावेळी जवळजवळ 99 टक्के आंबा गेलेला आहे. त्यामुळे या संदर्भातील निवेदन अधिवेशन संपण्याच्या आधी सभागृहात होणार आहे की नाही आणि कोकणाला न्याय मिळणार की नाही ? मी आज सकाळी आल्याबरोबर माननीय सभापती महोदयांना चिठ्ठी पाठविली. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार उपस्थित आहेत. माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे की, आंब्याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाची नेमकी काय भूमिका आहे, त्याबाबत धोरणात्मक निर्णय कधी घेणार, कॅबिनेटमध्ये निर्णय झाला की नाही, याची माहिती मिळाली तर अधिक चांगले होईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले होते की, आम्ही आठ दिवसात निर्णय घेऊ, कॅबिनेटसमोर जाऊ. काल विधानसभेत या संदर्भात चर्चा झ ाली आणि या बाबतीत घोषणा करण्यात येईल असे सांगितले गेले. या बाबतीत शासनाची निश्चित काय भूमिका आहे हे कळले पाहिजे. गेल्या वर्षीचे पैसे सुध्दा मिळालेले नाहीत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आपण कापसाच्या बाबतीत लगेच निर्णय घेतला तसेच बेदाण्याच्या बाबतीत निर्णय घेतला. माननीय मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी या सभागृहात आश्वासन दिले की, अधिवेशन संपण्यापूर्वी दोन दिवसात कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय घेऊ. आंब्याचे नुकसान झाले आहे असे त्यांनी रेकॉर्डवर मान्य केले आहे. असे असताना या बाबतीत शासनाने काय ठरविले आहे ? या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी या बाबतीत सांगावे अशी आमची विनंती आहे.

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. अजित पवार : सभापती महोदय, हा एकच मुद्दा मंत्रिमंडळापुढे नव्हता. हापूस, कांदा, तूर आणि चौथे म्हणजे ज्या भागामध्ये जनावरांना अक्षरशः पिण्यासाठी पाणी नाही किंवा चारा नाहीत, लोकांची सगळी पिके उद्ध्वस्त झालेली आहेत त्या दुष्काळामध्ये होरपळत असलेल्या आणि शेती पूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना काय नुकसान भरपाई द्यावयाची अशा चार विषयांबद्दल आम्ही चर्चा केली. परंतु त्या संदर्भात कोणतीही गोष्ट जाहीर करावयाची म्हटल्यानंतर त्याचा एकंदरीत किती खर्च येणार आहे याची माहिती आज आम्हाला मिळू शकली नाही. गेले तीन चार दिवस आम्ही ही माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहोत परंतु ती माहिती अद्यापपर्यंत न मिळाल्यामुळे या चारही बाबतीत आज आम्हाला निर्णय घेता आलेला नाही. परंतु हे सरकार शेतकऱ्याचे आहे. हे सरकार शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करीत आहे. मागच्या वेळी दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज आपण नागपूरला जाहीर केले आणि ते पैसे देण्याकरिता सगळे हिशेब करुन सगळे आकडे पुढे येण्यामध्ये वेळ लागला आणि त्यामुळे गेल्या महिन्यामध्ये ते पैसे तिकडे पाठविलेले आहेत. या सभागृहाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यातील वेगवेगळ्या भागातील जनतेला याबद्दल मदत करण्याची भूमिका, दिलासा देण्याची भूमिका ज्यावेळी घेतो त्यावेळी आपल्यापुढे सर्व आकडेवारी व्यवस्थितपणे असली पाहिजे. ती आकडेवारी आज न आल्यामुळे मला दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, या चारही बाबतीत निर्णय घेता आला नाही. परंतु या संदर्भातील सगळी माहिती आल्यानंतर शासन या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करील अशी मी खात्री देतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, शासन माहिती कधी घेणार ? या सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, आठ दिवसामध्ये सर्व्हे करु. आता आठ दिवसांऐवजी 20 दिवस झालेले आहेत. नेमकी माहिती कधी येणार हे कळले पाहिजे.

**तालिका सभापती** : माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने स्पष्ट केले आहे की, माहिती आल्यानंतर ताबडतोब त्या संदर्भातील निर्णय घेतला जाईल.

श्री. रामदास कदम : आठ दिवसात माहिती घेऊ असे सांगितले होते.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचा जो कामाचा सपाटा आहे त्याप्रमाणे त्यांनी कापूस, बेदाणा यांच्या बाबतीत लगेच निर्णय घेतला. मग आंबाच नेहमी मागे का राहतो ? ते पटकन निर्णय घेतात. मग शेवटी यामध्ये दादा दिसले पाहिजेत की नाही ? आपण बिनपैशाचे युवा धोरण जाहीर केले. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या बाबतीत आठ दहा दिवसात निर्णय घेतला पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. आंब्याचा सिझन गेल्यानंतर निर्णय घेऊ नका.

**तालिका सभापती** : आपण आता प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु करु.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ पूर्वी श्री.बरवड 15:00

**पृ.शी.** :पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणारे आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र

**मु.शी.**: पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणारे आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील मोशी येथील औद्योगिक प्रदर्शन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागेवर आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र उभारण्यासाठी कंपनी अधिनियम, 1956 अन्वये पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन आणि कन्व्हेन्शन सेंटर, मोशी या नावाने कंपनीची स्थापना करण्यात आली आहे.

सदर प्रदर्शन केंद्राची उभारणी पुणे इंटरनॅशनल एक्झिबिशन आणि कन्व्हेन्शन सेंटर मोशी या कंपनीमार्फत करण्याचे ठरविण्यात आले असले तरी यासाठी आरक्षित असलेल्या जागेच्या विकासासाठी सद्य:स्थितीत समुचित प्राधिकारी पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण असल्यामुळे या जागेच्या विकासासाठी समुचित प्राधिकारी म्हणून सदर कंपनीस घोषित करण्यासाठी नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम 37 खाली फेरबदलाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र सदर कार्यवाहीसाठी लागणारा कालावधी विचारात घेता तसेच सदर प्रदर्शन केंद्राची उभारणी लवकर करण्याची गरज लक्षात घेता, यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंपनीमार्फत या केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागेचा विकास न करता, सदर कंपनी रद्द करुन या प्रदर्शन केंद्राच्या उभारणीचे काम शासन नियुक्त सल्लागार समितीच्या देखरेखीखाली पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणामार्फत करण्याचा तसेच सदर आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राच्या प्रथम टप्प्यातील कामांची अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने स्वनिधीतून रुपये 100 कोटी खर्च करुन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.एस.क्यू.जमा : सभापति महोदय, पिंपरी-चिंचवड मे इंटरनॅशनल एक्झिबिशन और कन्व्हेन्शन सेंटर स्थापित करने के लिए मैं माननीय उप मुख्यमंत्री और शासन का अभिनन्दन करता हूं. साथ ही मैं निवेदन करना चाहता हू कि इसी तरह का एक सेंटर नागपूर मे स्थापित करने के करने के लिए एक प्रस्ताव नागपूर महानगरपालिका और एन.आय.टी.की ओर से शासन के पास भेजा गया है. जो कि काफी दिनो से प्रलंबित है. मैं उम्मीद करता हू कि सरकार उस प्रस्ताव के बारे मे भी जल्द से जल्द निर्णय लेगी.

-----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**कोकणातील आंबा पिकास नुकसान भरपाई मिळण्याबाबत**</u>

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आंब्याच्या पिकाचा सर्व्हे झालेला आहे असे सन्माननीय राज्यमंत्री श्री.राजेंद्र गावित यांनी सभागृहात सांगितलेले होते. माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी विनंती करतो की, कांद्याच्या पिकाचा सर्व्हे झाला नसेल तर तूर्त आपण कांद्याचा विषय बाजूला ठेवावा. पण आंब्याच्या पिकाचा सर्व्हे झालेला असल्यामुळे शासनाने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. आंबा हे कोकणामधील एकमेव महत्वाचे पीक आहे. अनेक बागायतदार आंब्याचे पीक घेतात. त्यामुळे या पिकाबाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी तातडीने सभागृहात निवेदन करावे.

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम आणि सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी आंब्याच्या पिकाच्या नुकसानीचा मुद्दा सभागृहात मांडलेला होता. सन्माननीय सदस्यांची या पिकाबाबतची भूमिका योग्यच आहे. त्याची दखल घेऊन माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मघाशी असे सांगितले आहे की, आंब्याच्या पिकाच्या नुकसानीबाबतची माहिती अद्याप शासनाला प्राप्त झालेली नाही. शासनाकडे माहिती प्राप्त होताच नुकसान भरपाई देण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे.

4....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार

**मु.शी.**: उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, भगवान साळुंखे, सय्यद पाशा पटेल आणि नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु... )

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी माझे भाषण अपूर्ण राहिले असल्यामुळे जसा एखाद्या मालिकेमध्ये रिकॅप दाखविला जातो तसा माननीय उप मुख्यमंत्र्यांना मला आता रिकॅप दाखवावा लागेल. पश्चिम महाराष्ट्रातील दादा कसे सुरक्षित आहेत आणि आमच्या कोकणातील दादांना एमआयडीसीच्या माध्यमातून बदनाम करण्याचा कसा डाव चालू आहे ते मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

एखाद्या बैठकीतील मिनिटस् फायनल करीत असताना ठराविक भाग वगळण्यात येतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

उद्योगक्षेत्रासाठी भूखंड वाटपाचे सर्व अधिकार मुख्याधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास देण्यात यावेत, हे कलम वगळून बाकी सर्व मंजूर करावे असे आदेश मंत्री महोदयांनी दिले. दिनांक 6 डिसेंबर 2011 रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त एप्रिल 2011 पर्यन्त मंजूर केले गेले नाही. ते का मंजूर केले नाही, त्याची कारणे काय आहेत ? 344व्या बैठकीचे कार्यवृत्त 345व्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात आले. 345व्या बैठकीचे कार्यवृत्त 1 एप्रिल 2012 पर्यन्त मान्य झाले नाही. या बैठकीत काय ठरले ते अद्यापपर्यंत आम्हाला कळले नाही. ते समजण्याची नितांत इच्छा आहे. खरे म्हणजे जलद निर्णय घेण्याचा देखावा केला गेला. मंत्रालयात फाईल्स आल्यानंतर फटाफट निर्णय करु, असा आभास निर्माण करण्यात आला. ते शेवटचे कन्फर्मेशन का झाले नाही ? एप्रिल 2012 पर्यन्त कार्यवृत्ताला मान्यता का दिली नाही हे आम्हाला समजून घ्यावयाचे आहे. मग शेवटी काही तरी गोष्टींचा समावेश केला त्यामुळे ते मान्य केले नाही अशी चर्चा दादांविषयी केली. जमिनीच्या किंमती वाढविण्याचा प्रस्ताव कधी आला ? 2010च्या अखेरीस महामंडळाचे भूखंड, शेड, गाळे यांचे दर वाढविण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता आणि तशा आशयाचा प्रस्ताव देखील दिनांक 27 डिसेंबर 2010च्या संचालक मंडळाच्या सभेत मांडण्यात आला. दरवाढ करण्याबाबत चालढकल चालू झाली. हा प्रस्ताव आला पण तो पारित झाला नाही. उद्योग कमी होत आहेत, उद्योजक येत नाहीत म्हणून भूखंड माफ केला.

माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे वीज देत नाही आणि माननीय मंत्री महोदय, श्री. छगन भुजबळ हे रस्ते देत नाही. म्हणून माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांनी दर वाढविण्याचा विचार केला. आता विचार सुरु झालेला आहे. वीज, रस्ते नसल्यामुळे उद्योग मागे जातात, भूखंडाचे दर वाढले तर उद्योग परत जातील, ते जाऊ नयेत म्हणून दरवाढीचा विषय येऊन देखील दरवाढ झाली नाही. 27 डिसेंबर 2010च्या संचालक मंडळाच्या सभेत ठराव मांडला, आणि सप्टेंबर 2011च्या बैठकीत निर्णय घेतला. सप्टेंबर 2011मध्ये दरवाढ करण्यात आली असली तरी प्रत्यक्षात ती डिसेंबर 2012नंतर लागू झाली. दरवाढ झाली तर स्वाभाविकपणे उद्योग कमी होतील. दरवाढीची चर्चा झाली. दरवाढीचा निर्णय झाला. 53 लक्ष हेक्टर एवढ्या क्षेत्राचे वाटप करण्यात आले. दरवाढ लागू झाली त्यानंतर 2 लक्ष 74 हेक्टर जागेचे वाटप झाले.

नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, यात महत्वाचा मुद्दा असा आहे की, ही दरवाढ केल्यानंतर स्वाभाविकपणे प्लॉट कमी जाणार असे जे आमच्या माननीय श्री. राणे साहेबांचे म्हणणे खरे होते. ते नंतर प्रत्यक्षात दिसावयास लागले. आता लोक असे म्हणतात की, दरवाढ होईल म्हणून लवकर प्लॉट घेऊन टाका असे सांगून मंत्रालयामध्ये माननीय श्री. राणे साहेब म्हणावयाचे की, हे बघा, प्रस्ताव तर आलेला आहे, दरवाढ तर करावी लागेल. असे करता करता त्या काळात 53 लाख चौरस मीटर एवढया जागेच्या संदर्भात त्यांच्यावर लोक आरोप करावयास लागले. कोकणातील माणसावर, माननीय श्री. राणे साहेबांवर अशा पध्दतीने आरोप होऊ लागले की, तुम्ही दरवाढ का होऊ दिली नाही ? म्हणजे दरवाढ होईल असे दाखवावयाचे आणि ते करुन घ्यावयाचे अशी परिस्थिती आहे. त्यांनी जे म्हटले ते सिध्द करा. नंतर केवळ एवढीच चौरस मीटरची जागा गेली असे सांगण्यात आले. मग त्यांनी असे केले आहे असे त्याच्यावर आरोप का करावयाचे ? विनाकारण आमच्या माननीय श्री. राणे साहेबांना बदनाम करण्याचे कारण काय ? याबाबतची माहिती आम्हाला या सभागृहात आवर्जून मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, खरे सांगावयाचे तर उद्योग क्षेत्रातील मासिके, दैनिके, सी.आय.आय., फिक्की, एचएसएम या सगळयांचे जे रिपोर्ट आहेत त्यानुसार या काळामध्ये प्रचंड लोक वेटींगमध्ये होते. वाढीव दरापेक्षा जास्त पैसे देऊन घेण्यास तयार सुध्दा होते. जर आपण विरोधकांचा आरोप मान्य केला तर आधीच्या दराप्रमाणे जो वाढीव दर होता तो जर आपण लागू केला असता आणि नवीन दराने प्लॉट दिले असते तर महापे असेल, तळोजा असेल, पाताळगंगा असेल, पनवेल, कुरकुम, रांजणगाव, जेजुरी हे सगळे पाहिले तर जवळ जवळ 150 कोटी रुपये एम.आय.डी.सी.ला जास्त मिळाले असते. परंतु तसे केले नाही म्हणून एम.आय.डी.सी.चे नुकसान झाले. मग माननीय श्री. राणे साहेबांवर आरोप झाला की, त्यांनी स्वत:चा फायदा करुन घेतला. हे काही बरोबर नाही. याबाबतीत खरी माहिती आम्हाला कळावी म्हणून हा मुद्दा मी या ठिकाणी आग्रहाने मांडला आहे.

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, भूखंड वाटपाच्या नस्ती मंत्रालयात बोलाविल्या जातात असा मी मघाशी आरोप केला. मंत्रालयात गेल्याशिवाय भूखंड मिळत नाहीत अशा पध्दतीची चर्चा सगळीकडे केली जाते. अनेक उद्योजकांना भूखंडाचे वाटप होऊन 10 ते 12 महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही त्या उद्योजकांना प्रत्यक्षात भूखंडाचे वाटप केले गेलेले नाही. असे अनेकांनी आमच्याकडे येऊन माहिती दिलेली आहे.. त्यासंबंधी जे वेगवेगळे रिपोर्ट आलेले आहेत ते मी पाहिलेले आहेत. वाहन निर्मिती करणारी जगातील सर्वात मोठी फोर्ड कंपनी पुणे जिल्हयातील चाकण येथे येणार होती. त्या कंपनीने 400 एकर जागा मागितली होती. 4 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक ती कंपनी करणार होती. एवढी फॉरेन इन्व्हेस्टमेंट डायरेक्ट येणार म्हटल्यानंतर आपण भराभर सर्व गोष्टी करतो. त्या कंपनीस जागा देण्यास आपण तयार होता. जागा देण्याबाबत एम.आय.डी.सी. मध्ये तसा प्रस्तावही तयार झाला.. परंतु त्या प्रस्तावावर तीन महिने निर्णयच घेण्यात आला नाही. ॲटोमोबाईल हब निर्माण होईल एवढी क्षमता असलेली कंपनी आपल्याकडे येणार म्हटल्यानंतर आपण पायघड्या घालावयास पाहिजे होत्या. रेड कार्पेट घालावयास पाहिजे होते. परंतु आपण तसे केले नाही. तसे केले असते तर नॅनो प्रकल्प सुध्दा आपल्या राज्यात आला असता. आपल्याकडील टाटा सारखे उद्योजक सुध्दा तिकडे जात आहेत. ही फोर्ड कंपनी आपल्याकडून गेली.

महोदय,पास्को नावाच्या स्टील निर्माण करणाऱ्या आघाडीच्या कंपनीने आपल्या राज्यात गुंतवणूक करण्यासाठी हायवेच्या लगत 60 मीटरवर जागा सोडावयास सांगितले होते पण आपण तसे केले नाही. पास्को कंपनीला जागा कमी पडली म्हणून त्या कंपनीने दुसरीकडे जागा मागितली. लवकर निर्णय न झाल्यामुळे त्या कंपनीचा येथून दुसरीकडे जाण्याचा मूड होता परंतु आता एवढी गुंतवणूक केल्यानंतर दुसरीकडे कोठे जावयाचे असा प्रश्न होता. परंतु त्या कंपनीचा जो मोठा प्लँट येणार होता, परंतु तो न आल्यामुळे जागा वितरण करुन सुध्दा त्या कंपनीच्या ताब्यात अद्याप जागा देण्यात आलेली नाही. अनेक छोटया, मोठया नियोजित कंपन्यांना सुध्दा त्या

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

ठिकाणी जागा मिळालेल्या नाहीत. ज्या कंपन्याना जागा हवी होती अशा मोठमोठ्या कंपन्यांची नावे सहजपणे घेता येतील. जनरल इलेक्ट्रीकल्सचा मी उल्लेख केला. त्यांनी एम.आय.डी.सी.कडे जागा मागितली, त्यांना जागा मिळाली. मिनिटस् अंतिम झाल्यानंतर सुध्दा त्यांना ऑफर लेटर देण्यास चार महिने लागले.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते 15:15

श्री.विनोद तावडे........

हे सगळे पाहता मला असे वाटते की, यामध्ये बहुधा पारदर्शकता नाही. खालच्या पातळीवरचे अधिकारी काहीतरी गडबड करतात. त्यामुळे फोर्ड, पास्को, जनरल इलेक्ट्रीक अशा फॉर्च्यून 500 मधील मोठ्या कंपन्या आहेत त्यांची अडचण झाली.

सभापती महोदय, श्री.योगेंद्र उमरणकर यांना पाताळगंगा येथे 6000 चौ.मीटर, श्रीमती ज्योती राऊत यांना उद्योगपती या नात्याने 6000 चौ.मीटर, श्री.अनिल ठाकरे यांना पातळगंगा येथे 8830 चौ.मीटर, श्री.सुरेश उमरणकर यांना 6000 चौ.मीटर जागा देण्यात आली. मी गुगल अर्थवर यांची नावे टाकून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु काहीच माहिती मिळाली नाही. यांची नावे सापडली कुठे? म्हाडाने माटुंगा येथील लेबर कॅम्पमधील गाळे विक्रीसाठी काढले होते. त्या ठिकाणी यांची नावे सापडली आहेत. गाळे घेणाऱ्यांना उद्योगपती बनवायचे म्हणजे किती मोठी क्षमता आपण माणसांमध्ये निर्माण करीत आहोत? धारावीच्या झोपडपट्टीमध्ये गाळा घेणाऱ्या माणसांना उद्योगपती बनवू पहात आहोत. त्यांना एमआयडीसीची जागा देण्याचा प्रयत्न जर उद्योगमंत्री श्री.नारायण राणे करीत असतील तर बाकीचे लोक कोकणातील माणसावर काय आरोप करतात? एमआयडीसी रियल इस्टेटचा धंदा करीत आहे. जागा यांच्या नावाने घ्यायच्या आणि नंतर विकायला काढायच्या. नियम आहे. अमुक दिवसात जागा विकसित केली नाही तर ती ताब्यात घेता येते. परंतु आरोप काय करतात? जागा घेऊन ठेवायच्या आणि जागा घेऊन ठेवल्यानंतर त्या विकायच्या. एका अर्थाने लेबर कॅम्पमधील गाळा घेणाऱ्या माणसांना उद्योगपती बनविण्याचा उद्योगमंत्री श्री.नारायण राणे प्रयत्न करीत असताना अशा पध्दतीने आरोप होत असतील तर खरे काय आहे? याची चौकशी करण्याची आम्ही आग्रही मागणी करीत आहोत.

सभापती महोदय, लक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रीज, धुळे तसेच श्री.अमिश साळुंके, कुरकुंभ यांना 1 ते 4 लाख चौ.फुट जागा उद्योगपती म्हणून वाटप करण्यात आली. या छोट्या उद्योगांना जागा दिल्या जात असतील तर फोर्ड आणि इतर कंपन्यांना का जागा दिली नाही? म्हणून मी इंटरनेटच्या माध्यमातून माहिती घेतली. ही मोजकी उदाहरणे पाहिल्यानंतर भूखंड वाटपाबाबत शंका निर्माण होते. मग स्वाभाविकपणे कोकणातील माणसावर अन्याय होतो. महाराष्ट्रातील जमिनीविषयीची माहिती ही दोघांकडेच असू शकते. कोकणातील नेत्याकडे असेल किंवा गुगल अर्थ या वेबसाईटवरच यासंबंधी अगदी तंतोतंत माहिती असू शकते. अशा पध्दतीने यासंबंधी

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते 15:15

श्री.विनोद तावडे........

आरोप होत असतो. रियल इस्टेटचा धंदा चालू आहे अशा पध्दतीचा आरोप होत असताना आमच्या कोकणातील माणसावर अन्याय होतो.

सभापती महोदय, अंबरनाथ येथील औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंड वाटप करताना मे.विदुशी वायर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला 5.5.2008 रोजी 7400 चौ.मी.भूखंड वाटप झाला. त्यावेळी कंपनीकडून मूळ बी.सी.सी.घेण्यात आली नव्हती. अशा अनेक प्रकरणात बी.सी.सी.घेण्यात आली नव्हती. 22.2.2010 रोजी डी 57 पार्ट वाटप करताना बी.सी.सी.घेण्यात आली नव्हती. 7.4.2010 ला 15 हजार चौ.मी.जागा वाटप करताना बी.सी.सी.घेण्यात आली नव्हती. परंतु भूखंड रिक्त होता.

नंतर श्री.खर्चे.....

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

अंबरनाथ पेपर मिलचे एक प्रकरण आहे. त्यात दि. 7.10.2010 रोजी जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला, त्या मिलचे अनधिकृत बांधकाम होते व कोणत्याही प्रकारे बीसीसी नव्हते तरी देखील भूखंड वाटप झाला. त्यानंतर त्याच बैठकीतील बाब क्र. 57 वर मे. न्यू टेक इंडस्ट्रीजसाठी अशाच प्रकारे भूखंडाचे वाटप करण्यात आले. यातून मला इतकेच सांगावयाचे आहे की, उद्योग विस्ताराच्या संदर्भात केंद्र शासनाचे जे धोरण आहे त्याचा अवलंब आपण करीत नाही आणि आमच्या राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे एमआयडीसीचाही विकास करीत नाहीत. जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळावा व त्या निमित्ताने छोटे छोटे उद्योजक देखील तयार व्हावेत यासाठी जिल्हा उद्योग केंद्रांची निर्मिती करण्यात आली, त्या माध्यमातून अशा छोट्या उद्योगांना अर्थसहाय्य दिले जाते. पण सन 2009-10 मध्ये 95 टक्क्यापेक्षा जास्त खर्च झालेला असताना सन 2010-11 मध्ये हा खर्च फक्त 17.06 टक्के इतकाच झाला अशी परिस्थिती आहे. मग सन 2009-10 मध्ये बाबूगिरीपर्यंत अशा उद्योगांसाठी तरतूद होत होती आणि आता मात्र केवळ 17 टक्क्यावर ही तरतूद आली आणि ऑक्टोबर, 2011 पर्यंत तर हे प्रमाण फक्त 3.32 टक्के इतके खाली आले आहे.

महोदय, अशा सर्व छोट्या उद्योगांच्या माध्यमातून रोजगार निर्माण तर होतोच पण नवीन तरुण उद्योजक सुध्दा निर्माण होतात. असे असताना एका बाजूला माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे यांची क्षमता आणि स्वाभिमान संघटनेच्या माध्यमातून एकाच दिवसात 10 हजार तरुणांना रोजगार, 25 हजार तरुणांना रोजगार एवढ्या तरुणांना रोजगार देण्याची क्षमता त्यांच्या पुढील पिढीत आहे. मंत्री महोदयांकडे प्रत्यक्ष उद्योग विभाग हातात असताना राज्यातील तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकतो, ते स्वाभिमानाने त्यांच्या पायावर उभे राहू शकतात पण तसे होत नाही. पुन्हा आपण म्हणतो माननीय श्री. राणे साहेबांच्या मुलांना हे जमले तर राणे साहेबांना का जमत नाही याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. कोकणातील माणूस किती साधा असतो याचे एक उदाहरण मी देणार आहे. त्यात सिंचनाचे एक दुसरे उदाहरण देऊन मी हे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. केरळ राज्यात नंबूद्री आणि नायर यांची एक गोष्ट मी ऐकली ती येथे सांगतो. एकदा हा नंबुद्री जंगलात बसलेल्या वाघाला हात लावतो, तो वाघ जागा होतो आणि





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .........

एकदम नंबुद्रीच्या अंगावर येतो. वाघ अंगावर आल्यामुळे नंबुद्री त्या वाघाची शेपटी धरतो. हातात शेपूट पकडल्यामुळे वाघ पुढे पळतो आणि त्याच्या मागून नंबुद्री पळत असतो. अशा प्रकारे ते गोल गोल फिरत असताना तेथे नंबुद्रीच्या धोतरातून सुटे पैसे पडायला लागतात. हे दृश्य तटकरे नावाच्या नायरने बघितले आणि त्याला वाटले की, वाघाचे शेपूट धरले की पैसे मिळतात म्हणून त्याने सिंचनरुपी वाघाला हातात धरले आणि त्या तटकरेना वाटले की सिंचनाचे शेपूट धरल्यानंतर पैसे मिळतील पण तसे झाले नाही, इतका कोकणातील माणूस साधा असतो.

**तालिका सभापती (श्री. विनायक मेटे)** : माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या निदर्शनास मला एक गोष्ट आणून द्यावयाची आहे की, या प्रस्तावावर एकूण 25 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आपले भाषण 45 मिनिटांपासून सुरु आहे. अशा परिस्थितीत आपण वेळेचे आणि शेवटच्या दिवसाचे बंधन लक्षात घेऊन आपले भाषण करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सिंचनाच्या विषयाच्या संदर्भात आमच्या मनात एक साधा प्रश्न निर्माण झाला आहे. सन 2008-2009 मध्ये प्र.द.घ.मी. पाणी निर्माण करण्यासाठी 156.62 लक्ष रुपये खर्च येत होता. सन 2009-2010 मध्ये प्र.द.घ.मी. पाणी साठ्यासाठी 356 लक्ष रुपये खर्च येत होता. परंतु सन 2010-2011 मध्ये प्र.द.घ.मी. पाणी साठ्यासाठी 711 लक्ष रुपये खर्च आला त्यामुळे दोन वर्षात ही रक्कम चार पटीने कशी काय वाढली हे गणित आम्हाला काही समजत नाही. परवा या विषयाच्या संदर्भात चॅनलवरुन माहिती दिली जात होती ती माहिती या ठिकाणी मी काही देत नाही कारण यातील सर्व माहिती सन्माननीय सदस्यांना माहिती आहेच.

बुलढाणा जिल्यातील नांदुरा तालुक्यातील जीगाव प्रकल्पामध्ये एक प्रकार झाला आहे. या प्रकल्पाची सुरुवातीची किमती कमी होती परंतु नंतर दोन वर्षाने या प्रकल्पाची किमती चार पटीने वाढवली गेली आहे. यामध्ये असे झाले होते की, प्रकल्पाचे एखादे काम कमी रकमेत घ्यावयाचे त्यानंतर 4-6 महिने जाऊ द्यायचे व नंतर कामाच्या डिझाईनमध्ये बदल करावयाचे व नंतर त्याच्या निविदा दुप्पट-तिप्पट-चारपट किंमतीने काढावयाचे. यासंदर्भातील आयडीया पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनी स्वत:च्या डोक्यातून किंवा राजकीय नेतृत्वाच्या कल्पनेतून सुरु केली असणार. बुलढाणा जिल्हयातील नांदुरा तालुक्यातील जीगाव प्रकल्प 1990 मध्ये मंजूर केला त्यावेळेस त्याची किमत 396 कोटी रुपये होती. सन 2006 मध्ये या प्रकल्पाची सुधारित किमत 1221 कोटी रुपये झाली व सन 2010 मध्ये या प्रकल्पाची किंमत 4444 कोटी रुपये झाली. 4 वर्षापूर्वी सुधारित केलेल्या प्रकल्पाची किंमत तिपटीपेक्षा जास्त झालेली आहे. या प्रकल्पांतर्गत 12 उपसा सिंचन योजनेतील स्टील पाईपचे दर तिप्पट लावलेले आहेत. साधारणत: हे पाईप 55 हजार रुपये मे.टन या दराने घेतले जातात परंतु जीगाव प्रकल्पात या स्टील पाईपचा दर 1.65 लक्ष रुपये मे.टन लावण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 15:30

श्री. विनोद तावडे....

त्यामध्ये जर आपल्याला विशेष पाणी आणावयाचे असेल तर त्याची कारणे सुध्दा तशीच असतील. त्या ठिकाणी असलेला स्टीलचा दर 70 ते 80 हजार मे.टन लावला असता तरी ते ग्राह्य धरता आले असते. तरीही तो दुप्पटीहून अधिक आहे.

मी आपल्या माहितीसाठी मूळ निविदेची किंमत वाचून दाखवितो. ग्रुप क्रमांक 1 चे काम हैद्राबादचे श्री. रेड्डी यांच्या मे. दिपीका इन्फ्राटेक या कंपनीला देण्यात आले. यामध्ये निविदेची मूळ किंमत 263.68 कोटी, अद्ययावत किंमत 296.48 कोटी, अद्ययावत किंमतीवर मंजूर करण्यात आलेले अधिक्य 17.54 कोटी होते. मूळ निविदेवरील अधिक्य 19.02 टक्के झाले आणि अद्ययावत किंमतीवरील अधिक्य 5.92 टक्के झाले. त्याचप्रमाणे ग्रुप 2 चे काम यवतमाळ येथील मे. बाजोरीया कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आले. यामध्ये माननीय सदस्य श्री. बाजोरीया साहेब तुमचा संबंध नाही ना? मे.बाजोरीया कंस्ट्रक्शन्सला काम देतांना निविदेची मूळ किंमत 68.04 कोटी, अद्ययावत किंमत 76.88 कोटी, अद्ययावत किंमतीवर मंजूर करण्यात आलेले अधिक्य 4.89 कोटी, मूळ निविदेवरील अधिक्य 20.17 टक्के आणि अद्ययावत किंमतीवरील अधिक्य 5.92 टक्के होते. त्यानंतर ग्रुप 3 मध्ये श्री. कोटेचा, मे. महावीर खरोटे जॉईंट व्हेंचर या जळगाव येथील कंपनीला हे काम देण्यात आले. त्यांची मूळ निविदा किंमत 31.17 कोटी होती, अद्ययावत किंमत 36.65 कोटी, अद्ययावत किंमतीवर मंजूर करण्यात आलेले अधिक्य 2.84 कोटी, मूळ निविदेवरील अधिक्य 24.34 टक्के आणि अद्ययावत किंमतीवरील अधिक्य 7.76 टक्के होते. त्यानंतर ग्रुप क्रमांक 4 चे काम कोल्हापूर येथील श्री. मनिष शहा यांच्या कंपनीला देण्यात आले. असे एकूण 6 ग्रुप यामध्ये होते. त्या प्रत्येकाची मूळ निविदा किंमत व नंतर अद्ययावत किंमत किती करण्यात आली ही सर्व माहिती आपल्याकडे आहे.

सभापती महोदय, जीगाव प्रकल्पाच्या निविदा 6 गटांमध्ये काढण्यात आल्या होत्या. या 6 गटांसाठी केवळ 9 कंत्राटदारांनी निविदा भरल्या. या 9 कंत्राटदारांपैकी 3 कंत्राटदार डमी होते तर उर्वरित 6 कंत्राटदारांनी चेन करुन वाढीव दराने कंत्राटे मिळविली. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील साहेब मी आपल्याला सांगतो की, लोक चेन केल्याचे नेहमीच म्हणत असतात, रिंग केली असे म्हणतात. राजकीयदृष्टया बदनाम करण्यासाठी लोक काहीही म्हणतात माझा त्यावर विश्वास नाही. असेल तर आपण सिध्द करुन दाखवा. परंतु यामध्ये ज्या तीन जणांच्या नावाने टेंडर भरण्यात आले आहेत त्यासाठी डिपॉझीट भरण्याकरिता एकाच माणसाने एकाच बँकेमधून



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

तीन डीमांड ड्राफ्ट काढले व ते जमा केले आहेत. हे डीमांड ड्राफ्ट बँक ऑफ इंडियाच्या अमरावती मेन ब्रँचमधील आहेत. यामध्ये कुणाचा वेस्टेड इंटरेस्ट काय आहे हे तपासून पहावे लागेल. यामध्ये जर तिघांनी रिंग केली आहे हे आपले म्हणणे खरे असेल तर आपल्यापैकी कुणी तरी एक त्यामध्ये आहे. मी आतापर्यन्त कोणतेच टेंडर भरले नसल्यामुळे मला त्यामधील काही कळत नाही. परंतु हे एकाच व्यक्तीने केले आहे असे म्हटल्यानंतर यामध्ये रिंग केल्याचे स्पष्ट होते. हे कंत्राट आपल्याला मिळवितांना सुरुवातीला मूळ किंमत कमी दाखवून व त्यानंतर अद्ययावत किंमत लावून पुन्हा त्यावर वाढीव किंमत देण्यात आली.

सभापती महोदय, हे जीगाव प्रकल्पाबाबत झाले त्याप्रमाणे गोसीखूर्द प्रकल्पाच्या बाबतीत देखील तक्रारी आलेल्या आहेत त्यासंबंधी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेबांनी काल सांगितले आहे. 350 कोटींची मूळ किंमत असलेला हा प्रकल्प आज 7,700 कोटीपर्यन्त गेला आहे. मध्यंतरी या प्रकल्पाच्या कालव्याची भिंत चालायला लागल्याची चर्चा होती. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये या प्रकल्पामध्ये झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी चर्चा झाली असता त्या संबंधी चौकशी करुन दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंबंधी आश्वासन देण्यात आले होते. त्यावेळी विधानसभेतील माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी देखील आपल्यावर झालेल्या आरोपाबाबत चौकशीची मागणी केली होती. या प्रकल्पासंबंधी त्यांनी आरोप केले आहेत किंवा काय याबाबत मला काहीही माहिती नाही.

परंतु मला या निमित्ताने एकच म्हणावयाचे आहे की, गोसीखूर्द प्रकल्प असो किंवा जीगाव प्रकल्प असो, या सर्व प्रकल्पांच्या कामासाठी ज्यावेळी टेंडर भरले जाते त्यावेळी विशिष्ट प्रकारचे कोड वर्ड वापरुन टक्केवारी निश्चित केली जाते. त्यामध्ये "एम" नावाच्या कोड वर्डला 5 टक्के म्हणतात, "एमडी" नावाच्या कोड वर्डला 1 टक्का म्हणतात, "इडी" नावाचा कोड वर्डला 1 टक्का म्हणतात, "सीइ" नावाच्या कोड वर्डला 1 टक्का म्हणतात, "एसइ" नावाच्या कोड वर्डला 1 टक्का म्हणतात, "इइ" नावाचा कोड वर्डला 1 टक्का म्हणतात आणि बाकीचे ऑफिसर अर्धा टक्का. अशाप्रकारे टेंडर भरतांना दहा ते साडे दहा टक्के इतकी टक्केवारी निश्चित केलेली असते. त्यानंतर डेप्युटी इंजिनिअर, एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर असे सर्व वाटप

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

झाल्यानंतर "डीएफ" ला 10.15 टक्के, न्यूएल ॲडजेस्टमेंट डिपार्टमेंटसाठी 50 टक्के आणि कॉट्रक्टरसाठी 50 टक्के जातो....

(अपूर्ण यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

50 टक्के कंत्राटदारासाठी असे करून पुढे मग साडे पंधरा टक्क्यांपर्यंत गाडे सरकते. वर्क ऑर्डर येईपर्यंत हे प्रमाण सोड पंधरा टक्क्यांपर्यंत जाते. काम झाल्यानंतर मग पेमेंट येते. तेव्हा एलओसी, इ.डी.ला 0.5 टक्के, एलओसी, एस.ई.ला पॉईंट 5 टक्के, ऑफिस एक्सपेन्ससाठी 0.5 टक्के, बिल्स इ.इ.ला 2 टक्के, बिल्स डी.इ.ला 2 टक्के, बिल्स जे.इ.ला 2 टक्के, चेक लिहावा लागतो म्हणून त्याला देखील पैसे द्यावे लागतात. प्रति लाखाला 100 रूपये भाव आहे. पैसा कसा कसा जातो हे मी आपल्याला सांगतो. सिंचन पाण्याचे होते की, पैशाचे होते हा मूळ प्रश्न आहे. यात तांत्रिक चेकिंग इ.इ.चे असते. अडीचशे रूपये प्रति लाखाला भाव असतो. ॲरेथमॅटीक चेकिंग असेल तर प्रती लाखाला दोनशे रूपये भाव आहे. असे करून 23.5 टक्क्यांपर्यंत प्रमाण जाते. कधी कधी म्हणतात की, एमचे 5 ऐवजी 7 टक्के झाले. त्यामुळे कधी कधी 23.5 टक्क्यांचे प्रमाणे 25.5 टक्क्यांपर्यंत जाते. महाराष्ट्रात सिंचना बाबत आपण वारंवार आरडाओरड करतो. हा विषय आम्ही सातत्याने मांडत असतो. एवढी लाख कोटी रक्कम खर्च होऊन सुद्धा 0.5 टक्क्यांपेक्षा जास्त सिंचन का होत नाही? एका बाजूला पैसे पडत असतात. मी अशी येथे खूप उदाहरणे देऊ शकतो.

सभापती महोदय, ॲडवान्सेस द्यायचे नाही असा निर्णय घेतला. असा निर्णय घेतल्या नंतर देखील त्या त्या वेळी ते आदेश बदलले गेले. यातील कारण योग्यही असू शकते. हे सर्व गतीने पुढे गेले पाहिजे. सरकारी पद्धतीने करत बसलो तर होणार नाही. त्यामुळे किंमत काढताना बाजारभाव लक्षात घेणे जरूरीचे आहे. आपल्या पत्रकाप्रमाणे जे आदेश दिले आहेत त्या नुसार सर्व बाबींची किंमत अद्ययावत करावी लागते. बाजारातील सीमेंट, लोखंडे इत्यादी लक्षात घेता, हे सगळे प्रकल्प वेळेत पूर्ण होणार नाहीत. म्हणून सचिवाने दिलेले आदेश, राजकीय नेत्यांना फेटाळण्याचा अधिकार असतो. तो त्यांनी फेटाळला. दोन पत्रके रद्द केली पाहिजेत याबाबत खाजगी सचिव परिपत्रक काढतात. सचिवांनी काढलेले आदेश गृहीत धरू नका, अशा आशयाचे खाजगी सचिवांचे पत्रक निघते. दिनांक 14 मे 2008 रोजी माननीय मंत्री,पाटबंधारे यांचे खाजगी सचिव श्री.सुरेश जाधव यांच्या आदेशानुसार पत्र निघते की, हे आदेश मानण्याचे काम नाही. सचिवांची सही नसताना देखील त्या आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसत आहे. श्री.देवेंद्र शिर्के यांच्या सहीने इम्प्लीमेंट झाल्याचे दिसते.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

या सगळ्या विषयात माननीय राज्यपालांनी आक्षेप घेतले. सचिवांनी आक्षेप घेतले. आर्थिक वर्ष 2008-2009 मध्ये सचिव पाटबंधारे यांनी डी.एस.आर.मध्ये नमूद केल्यापेक्षा 15 टक्के अधिक दराने निविदा प्राप्त झाल्यास ती वित्त विभागाकडे पाठवावी अशा आशयाचे परिपत्रक काढले. ते पत्रक माननीय मंत्रिमहोदयांनी रद्द केले. त्यानंतर खाजगी सचिव म्हणतो की, हे काही ऐकण्याचे कारण नाही. 26 हजार कोटींच्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली ही बाब वित्त व नियोजन विभागाच्या लक्षात आली असता त्यांनी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यामध्ये अनियमितता झाल्यामुळे यास मान्यता देण्यात येऊ नये असे पत्र दिले. या पत्रावर अगोदरची तारीख टाकली आणि 22 हजार कोटीच्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली, असा माझा आरोप आहे. माननीय राज्यपालांनी देखील यात काय म्हटले की, प्रगतिपथावर असलेल्या काही प्रकल्पांच्या व्याप्तीतील बदल यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येते. महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाने असे निदर्शनास आणले आहे की, ही बाब नवीन प्रकल्पाला मंजुरी दिल्या सारखी होईल.

यानंतर सौ.रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR पूर्वी श्री.ओटवणेकर . . . . 3.40

श्री.विनोद तावडे . . . .

सभापती महोदय, याठिकाणी माननीय राज्यपालांनी सुध्दा असे म्हटले आहे की, "प्रगती पथावर असलेल्या काही प्रकल्पांमध्ये "व्याप्तीतील बदल" यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येते. महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाने असे निदर्शनास आले आहे की, ही बाब नवीन प्रकल्पाला मंजुरी दिल्यासारखी होईल, जी पूर्वीच्या राज्यपालांच्या निदेशांना अनुसरुन नाही. त्यामुळे जलसंपदा विभागाने चालू प्रकल्पांच्या "व्याप्तीतील" बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करावीत" तसेच ही मार्गदर्शक तत्वे वित्त विभाग, नियोजन विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या सल्ल्याने ठरविण्यात यावीत असेही माननीय राज्यपालांनी सांगितले. या संपूर्ण प्रकरणामध्ये प्रचंड अनियमितता झाली आहे. गत 5 वर्षात सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेल्या सर्व प्रकल्पांची निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मला सिंचन विषयाच्या बाबतीत ठामपणे असे म्हणावयाचे आहे की, आपण या राज्याचे लाखो, कोटी रुपये जर यामध्ये घातले असतील आणि जर सामान्य माणसाला दुष्काळाला आणि टंचाईग्रस्त स्थितीला सामोरे जावे लागत असेल तर या सिंचन विभागामध्ये गेल्या दहा-बारा वर्षामध्ये झालेल्या कामांची न्यायालयीन चौकशी केली पाहिजे. माझी अशी मागणी आहे कारण हे जे सगळे घोटाळे आहेत, त्याची जी कागदपत्रे आहेत त्यातून जनतेला समजले पाहिजे की, यामध्ये सरकारची चूक आहे की नाही. मग शासनाने याबाबतीत आदर्शच्या चौकशीसाठी जसा आयोग नेमला होता,तशा प्रकारचा आयोग यासाठी देखील नेमावा. तसेच याठिकाणी माननीय महसूल मंत्री आहेत.मी यापूर्वी सुध्दा असे म्हटले होते की,ज्या-ज्या राजकीय नेत्याला, ज्या-ज्या सनदी अधिकाऱ्याला एकपेक्षा अधिक फ्लॅट महाराष्ट्रामध्ये कुठेही दिला असेल तर तो सरकार जमा झाला पाहिजे.आज सर्वसामान्य माणसांमध्ये असे वातावरण आहे की,हे सगळेजण जे बसलेले आहेत, ते लूटतात आणि त्यामुळे लोकांचा राजकीय व्यवस्थेवरील विश्वास उडत आहे.त्यामुळे माननीय महसूल मंत्री महोदयांकडे माझी अशी आग्रही मागणी राहील की,या विषयाच्या बाबतीत जनतेसमोर क्लॅरिटी गेली पाहिजे.जरी सनदी अधिकाऱ्यांनी नियम बदलून ते काम नियमामध्ये बसविले असले तरी राजकीय व्यवस्थेतील मंडळींनी ते परत घेण्याचेही काम केले आहे अशा प्रकारचा एक संदेश आपण या निमित्ताने दिला पाहिजे.त्यामुळे उद्योग,सिंचन किंवा महसूल विभागा तील जमिनीच्या मुद्याबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी आणि जो भ्रष्टाचार समोर आला



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

आहे त्यामध्ये जे दोषी आहेत त्यांना कडक शासन करण्याची तयारी सरकारने दाखवावी आणि याची न्यायालयीन चौकशी करण्यासंबंधीची माझी मागणी पूर्ण करावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

3 एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : मी पुन्हा एकदा सर्व सन्माननीय सदस्यांना आठवण करुन देतो की, सदरहू चर्चेसाठी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह 2 तास 40 मिनिटांचा कालावधी देण्यात आलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेऊन थोडक्यात आपले मत व्यक्त करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आम्ही काल सकाळी सांगितले की, आपण उद्या अंतिम आठवडा प्रस्ताव ठेवावा आणि त्यावेळी आपणही उपस्थित होता. त्यामुळे आपण भाषण करण्यासाठी वेळेची मर्यादा ठेऊ नये अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, या चर्चेसाठी दोन तास चाळीस मिनिटांचा वेळ दिला आहे आणि त्यापैकी एक तास माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भाषणासाठी घेतलेला आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह वेळेमध्ये चर्चा संपविणे गरजेचे आहे.

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, आज अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा आहे.

**तालिका सभापती** : परंतु त्या चर्चेसाठी वेळेचे बंधन असले पाहिजे. आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .3 एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये विरोधी पक्षाच्या वतीने अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी प्रस्तावाच्या माध्यमातून उद्योग आणि पाटबंधारे विभागाच्या बाबतीत आपले विचार मांडले. मला सुरुवातीलाच एक गोष्ट सांगितली पाहिजे. एका बाजूला पाटबंधारे आणि सिंचन यावर चर्चा करीत असताना सिंचनाच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये कोकण कुठे आहे का असा माझ्यासमोर प्रश्न निर्माण होत आहे. स्वातंत्र्यानंतरच्या 60 वर्षामध्ये संपूर्ण देशात सिंचन 52 टक्के झाले. मात्र महाराष्ट्रामध्ये गेल्या 60 वर्षामध्ये फक्त 18 टक्के सिंचन झाले.

यानंतर श्री.बरवड . . .

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

महाराष्ट्रामध्ये होणाऱ्या 18 टक्के सिंचनापैकी 70 टक्के सिंचन पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊसाच्या मळ्यासाठी केले जाते आणि बाकीचे 30 टक्के सिंचन उर्वरित महाराष्ट्रामध्ये होते. एका बाजूला कोकणामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो आणि दुसऱ्या बाजूला कोकणामध्ये सगळ्यात जास्त दुष्काळ पहावयास मिळतो. या ठिकाणी मला एक गोष्ट कळली पाहिजे की, शिवशाहीच्या शासनकाळात कोकणामध्ये ज्या 35 पाटबंधारे योजना घेतल्या होत्या योजनांची शिवशाहीचे सरकार गेल्यानंतर आज काय अवस्था आहे, त्यासाठी किती निधी मिळाला, ती कामे का पूर्ण होत नाहीत ? 1997 मध्ये या पाटबंधारे योजनांचे जे अंदाजपत्रक होते ते आता नेमके किती झालेले आहे ? माननीय मुख्यमंत्री एका बाजूला सांगतात की, आम्हाला सिंचनासाठी 80 हजार कोटी रुपये पाहिजेत. एका बाजूला आपण महाराष्ट्राला कर्जबाजारी केले. महाराष्ट्रावर 2 लाख 56 हजार कोटी रुपयाचे कर्ज केले आणि दुसऱ्या बाजूला सबंध महाराष्ट्रामध्ये पाण्याचा दुष्काळ पडलेला आपण पाहतो. ही अवस्था का निर्माण झाली, त्याला कोण जबाबदार आहे ?

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये कशा पध्दतीने भ्रष्टाचार होतो या बाबतीत मी काही गोष्टी सांगणार आहे. मी काही प्रकरणे आणलेली आहेत. ती प्रकरणे आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांकडे पोहोचवावीत अशी मी आपल्याला विनंती करतो. मी आपला अधिक वेळ घेणार नाही. मी एक एक फाईल वाचून दाखवतो आणि आपल्याकडे पाठवितो. चांचवड वन क्षेत्र भ्रष्टाचार यामध्ये तेथील वनक्षेत्रपाल यांनी कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. त्याची फाईल मी आपल्याकडे पाठवितो. यूएलसी कायद्याच्या कलम 20 अनुसार सरकारी किमतीप्रमाणे विकासाचे 170 गाळे खुल्या बाजारात अन्य व्यक्तींना कशा पध्दतीने विकले आणि भ्रष्टाचार केला त्याची फाईल मी आपल्याकडे पाठवितो. आपण ती फाईल माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवावी. नागपूर येथील बनावट स्टॅम्प प्रकरण मी आपल्याकडे पाठवितो. नागपूरला देखील कशा पध्दतीने बनावट स्टॅम्प तयार केले आणि अधिकारी ते प्रकरण कसे दाबण्याचा प्रयत्न करीत आहेत त्याबाबतची ही फाईल मी आपल्याकडे पाठवितो. कुर्ला मुलूंड येथील खोत जमीन अधिकाऱ्यांनी परस्पर विकली त्या संदर्भातील फाईल मी आपल्याकडे पाठवितो. त्यामध्ये सगळी कागदपत्रे आहेत.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

मौजे केज येथील गायरान जमीन सर्व्हे नंबर 30/1 क्षेत्र 43 हेक्टर 46 आर पैकी 6 हेक्टर क्षेत्राची अनधिकृतरित्या विल्हेवाट लावण्याचे जे पाप केलेले आहे त्याची फाईल मी आपल्याकडे पाठवितो.

सभापती महोदय, अंधेरी येथे मे. आकृती बिल्डरला तेलगल्ली गुंदवली येथील कोट्यवधी रुपयांची जमीन दिलेली आहे ती फाईल मी आपल्याकडे पाठवितो. डी विभाग कार्यालय येथील मलबार हिल डिव्हीजन येथे श्री. अंबानी यांना अनधिकृत बांधकामाला आताचे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री. सुबोधकुमार यांनी जी परवानगी दिली त्याचे पत्र माझ्याकडे आहे. आयुक्त श्री. सुबोधकुमार किती कडक आहेत हे सांगण्यात येत होते. मलबार हिलमध्ये अंबानी यांच्यासाठी वेगळा कायदा आहे का ? ती फाईल मी आपल्याकडे पाठवितो. सभापती महोदय, मिरा भाईंदर ठाणे येथे सर्व्हे क्र. 151 येथे खेळाच्या मैदानासाठी राखीव असलेल्या जागेवर बिल्डींगचे काम झालेले आहे. त्याची फाईल मी आपल्याकडे पाठवितो. सभापती महोदय, आदिवासी वाडी जमीन (मीरा रोड) महाजन वाडी क्र. 77 ही आदिवासींची जमीन हडप केल्याची फाईल मी आपल्याकडे पाठवितो. सभापती महोदय, जलक्षेत्र सुधार प्रकल्पाची खोटी कागदपत्रे बनवून राज्य सरकारची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची कागदपत्रे मी आपल्याकडे पाठवितो. सभापती महोदय, खटाव, जिल्हा सातारा येथे विनापरवाना मुरुम गौणाचे उत्खनन यामध्ये झालेल्या साडेतीन कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराची फाईल मी आपल्याकउे पाठवितो.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. सचिन अहिर यांच्याकडे मी एक माहिती मुद्दाम पाठवितो. आपण विकास नियंत्रण नियमावली, 1991 अनुसार इमारतीची पुनर्बांधणी करताना म्हाडासाठी राखीव असलेल्या किती जागा गेल्या दहा वर्षामध्ये परस्पर विकल्या गेल्या याची यादी मी माहितीच्या अधिकाराखाली मागविलेली आहे. यामध्ये जवळजवळ 5 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आहे. हे सगळे फ्लॅट्स दादर, भायखळा, कुलाबा या भागातील आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

एवढ्या रकमेची शासनाने वसुली केली तरी गिरणी कामगारांना शासन मोफत घरे देऊ शकेल. माहितीच्या अधिकाराखाली मी ही माहिती मिळविली आहे. कोणत्या बिल्डरला म्हाडाची जागा विकण्यात आली आहे त्याची माहिती या फाईलमध्ये आहे. माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे ही फाईल गेल्यानंतर पहावी. या विक्रीतून जवळजवळ 5 हजार कोटींचा भ्रष्टाचार झालेला आहे. परंतु गिरणी कामगारांच्या घरांसाठी शासनाजवळ पैसे नाहीत असे सांगितले जाते.

सभापती महोदय, विक्रीकर उपायुक्त श्री.प्रमोद नलावडे यांनी 2 कोटी रुपयांचा टॅक्स माफ केल्याच्या प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, मौजे नवघर मीरा-भाईंदर येथे ओसवाल बिल्डरने 100 एकर जागेवरील तिवरांच्या झाडांच्या जागी भर टाकून महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या घरासमोर इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे. या प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, जुहू येथील सर्व्हे क्रमांक 320 हा भूखंड पोलिसांसाठी राखीव ठेवला होता. परंतु हा भूखंड अधिकाऱ्यांच्या सोसायटीला देण्याचे काम झालेले आहे. या प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, डॉली एन्टर प्राईजेस या खाजगी विकासकाला संरक्षण मंत्रालयाचे प्रतिबंधित क्षेत्राचे कायदे (एस.आर.ओ.कलम 12-ए ) या विरोधात परवानगी देऊन महाघोटाळ्याचे काम करण्यात आलेले आहे. या प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासी लोकांनी शासकीय कर्मचाऱ्यांशी हात मिळवणी करुन लाटल्या आहेत. या प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, डिफेन्सच्या जागेवर शिवालिक बिल्डरने सांताक्रुझ, गोळीबार येथे बांधकाम केलेले आहे. या फाईलमध्ये डिफेन्सच्या अधिकाऱ्यांचे पत्रही जोडलेले आहे. रेल्वे विभागाने या बिल्डरवर गुन्हा दाखल करण्यात यावा असे म्हटलेले आहे. परंतु एका मंत्री

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

महोदयांचे त्यांच्याशी लागेबांधे आहेत. त्यांचे चिरंजीव त्यामध्ये पार्टनर आहेत. त्यामुळे या विषयासंबंधी कोण बोलणार ? या प्रकरणाची फाईल जागेच्या नकाशासह मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, एका माजी मंत्र्यांनी आदिवासींचेच अनुदान लाटले आहे. मी नोटीस दिली नसल्यामुळे त्यांचे नाव घेत नाही. परंतु त्याबाबतची फाईल आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, हिरानंदानी बिल्डरला मौजे कावेसर व मौजे कोळशेत येथील 84 एकराचा शासकीय भूखंड देण्यात आलेला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी असे कळविले आहे की, हे बेकायदेशीर आहे. त्या बिल्डरच्या हातामध्ये 55 7/12 चे उतारे एकाच दिवशी हातामध्ये पडले आहेत. त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी हरकत घेतलेली आहे. या शासनाचे किती गतीने काम सुरु आहे ते यावरुन दिसून येते. या प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, याच हिरानंदानी बिल्डरच्या मौजे कोळशेत येथील 24 एकर जागेच्या 100 कोटी रुपयांच्या बनावट दस्त प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे. त्यावरील सह्या बोगस आहेत हे सिध्द झालेले आहे. परंतु त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जात नाही.

सभापती महोदय, आयपीएस, आयएएस अधिकाऱ्यांच्या मैत्री सोसायटीच्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, मौजे आणिक गावातील जागा एका बिल्डरला देण्यासाठी 3 वेळा आरक्षण बदलण्यात आले आहे. त्या जागेवरील तिवरांच्या जागेची कत्तल करुन इमारतीचे बांधकाम सुरु आहे. या प्रकरणाची फाईल मी आपल्याकडे पाठवित आहे.

सभापती महोदय, डोंगर गावातील जमीन घोटाळ्याचे प्रकरण आहे. कॉंग्रेस पक्षातील एका नेत्याच्या मुलाला 265 एकर जागा आणि एका आमदाराच्या मुलाला 105 एकर जागा कायदा धाब्यावर बसवून देण्यात आली आहे. एका मुलाचे नाव अतुल माणिकराव ठाकरे आणि दुसऱ्या मुलाचे नाव प्रवीण वामनराव कासावार आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय,...

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : ज्यांच्या नावावर ही जागा आहे त्यांची मी नावे घेतली आहेत. मी कोणत्याही पुढाऱ्यांची नावे घेतलेली नाहीत. ज्यांच्या नावावर 7/12 चा उतारा आहे त्यांची मी नावे घेतली आहेत. एखाद्या सन्माननीय सदस्याचे नाव घ्यावयाचे असल्यास संबंधित सदस्यांना नोटीस द्यावी लागते हे मला ठाऊक आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे नाव घेतले आहे. याबाबत त्यांना स्पष्टीकरण देण्याची संधी मिळणार नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कोणत्याही नेत्यांचे नाव घेतलेले नाही. आपण कृपया खाली बसावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

श्री. रामदास कदम : नवी मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन उपायुक्त श्री.सतोषसिंग परदेशी यांनी 15 कोटीचा घोटाळा केला. 5 वर्षे झाली. ते आता एका मंत्र्याकडे एसडीओ म्हणून आहेत. हे 15 कोटी रुपये कुणी द्यायचे ? सर्व चौकशी झाली. ते नव्या मुंबईला होते. आता पालकमंत्र्यांकडे आहेत. त्यांना कोण अटक करणार ?

सभापती महोदय, बोरीवली जमीन (वळणई आदिवासी जमीन) न.भू.क्र. 334, 360, 361 या भूखंडाच्या घोटाळयाची फाईल मी आपणाकडे पाठवतो.

मागाठाणे येथील आदिवासींच्या मालकीच्या जमिनीवर वाय.सी.मोदी यांनी इमारतीचे बांधकाम सुरु केलेले आहे. या प्रकरणाची फाईल मी आपणाकडे पाठवितो.

आदिवासी जमीन नं.भू.क्र. 175 मागाठाणे, बोरीवली येथील गरीब व असहाय्य आदिवासीची जमीन खोट्या दस्तऐवजाच्या आधारे हडप करुन केलेल्या घोटाळ्याची फाईल मी आपणाकडे पाठवितो.

त्यानंतर ओसवाल बिल्डर्स, पॅराडाईज टॉवर, आशादीप टॉवर आणि ऑब्रिट टॉवरचा एफएसआय पेक्षा जास्त बांधकाम करुन घोटाळा केलेला आहे.

विलेपार्ले (पूर्व) येथील महानगपालिकेच्या मालकीचा मनोरंजनाच्या मैदानासाठी राखीव असलेला भूखंड अनधिकृतरित्या उपजिल्हाधिकारी यांनी अधिकार नसताना एस.आर.ए.च्या बिल्डरला देऊन केलेला घोटाळा, या सर्व घोटाळयाच्या 31 फाईल्स मी आपणाकडे पाठवितो. ह्या फाईल्स आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवाव्यात.

सभापती महोदय, मला हे माहीत आहे की, श्री. कृपाशंकर सिंह यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्या विषयावर मला बोलता येणार नाही. मी दिलेली नोटीस नाकारण्यात आली. श्री.कृपाशंकर सिंह यांच्या संबंधीचे जे काही पेपर्स माझ्याकडे आहेत ते मी आपणाकडे पाठवितो, आपण ते माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवावेत जेणेकरुन श्री.कृपाशंकर सिंह यांच्या बाबतीत अधिक प्रकाश पडेल आणि योग्य ती कारवाई होईल. मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबाना देण्यात आलेल्या गायी एका मंत्री महोदयांनी स्वत:च्या कुटुंबासाठी घेतल्या. ते मंत्री आजही मंत्रिमंडळामध्ये आहेत. हे प्रकरण देखील मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे दिले होते. त्यांनी पुढील अधिवेशनापूर्वी चौकशी

..2..

-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

करुन अहवाल देण्यात येईल असा शब्द दिला होता. परंतु अद्यापही त्याबाबतीत चौकशी झालेली नाही.

सभापती महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे. भ्रष्टाचाराची, घोटाळ्याची प्रकरणे आणि त्यासंबंधीच्या फाईल्स मी आपणाकडे दिलेल्या आहेत. त्या आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवाव्यात, माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे मी दिलेल्या 31 प्रकरणांच्या बाबतीत लवकरात लवकर चौकशी करुन सभागृहाला अहवाल सादर करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे हे उद्योगासंबंधी बोलले. उद्योगधंदे कसे वाढतील ? उद्योगधंद्याच्या वाढीसाठी आवश्यक असणारे इन्फ्रास्ट्रक्चर आपण करीत नाही आणि जे करु इच्छितात त्यांना आपण सहकार्य करीत नाही. मी माननीय मंत्री महोदयांना त्यांच्या विभागाचा सचिव कोण आहे असे विचारले. त्यांनी सांगितले छत्रपती शिवाजी.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 16:00

श्री.जयंत प्र.पाटील...

मला एकदा त्यांना भेटण्याचा योग आला. मी त्यांच्या कार्यालयात जाऊन त्यांना भेटलो. या मंत्रालयात अशी परिस्थिती आहे की, जे चांगले सचिव आहेत, त्यांना बाजूला ठेवले जाते. त्यांना सहकार्य केले जात नाही. श्री.छत्रपती शिवाजी यांच्याबद्दल माझे वैयक्तिक मत चांगले आहे. ते या विषयात निपुण आहेत. मंत्रालयात दहा ते बारा सचिव नॉन करप्ट आहेत. श्री.छत्रपती शिवाजी हे अतिशय चांगले सचिव आहेत, नॉन करप्ट असे त्यांचे क्वॉलिफिकेशन असल्यामुळे त्यांना कोणीही घ्यावयास तयार नाही, अशी परिस्थिती या राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. आता ते अदृश्य आहेत. श्री.छत्रपती शिवाजी यांच्या वडिलांना महाराष्ट्राबद्दल आणि छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अतिशय प्रेम होते. म्हणून त्यांनी त्यांच्या मुलाचे नाव छत्रपती शिवाजी असे ठेवले.

सभापती महोदय, शासनाने उद्योगाच्या बाबतीत नियोजनबध्द कार्यक्रम आखलेला नाही. राज्यात उद्योग सुरु करण्यासाठी जे इन्फ्रास्ट्रक्चर पाहिजे ते पूर्णपणे नाही. उद्योग सुरु करण्यासाठी रेल्वे, रस्ते यांची सोय शासनाने केलेली नाही. शासनाने राज्यात अनेक ठिकाणी पंचतारांकित एम.आय.डी.सी.केलेल्या आहेत, त्या ठिकाणी राज्य शासन कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यास तयार नाही. 300 ते 400 कि.मी.वेगाने धावणाऱ्या रेल्वे आज जगात आहेत. या ठिकाणी जागेचा प्रश्न आहे, त्या जागेच्या प्रश्नामध्ये प्रामुख्याने मुंबई शहराच्या जवळची जागा, शहराच्या जवळची जागा घेण्यास लोक उत्सुक असतात, त्याचे कारण तेथे वाहतूक व्यवस्था चांगली असल्यामुळे लोक त्या जागा घेण्यास तयार असतात. रायगड जिल्हयातील माणगाव येथे राज्य शासनाने पंचतारांकित एम.आय.डी.सी.उभी केली, परंतु त्या ठिकाणी रेल्वेची सोय नाही. रस्ते नाहीत. तेथे रेल्वे आणण्यासाठी फक्त 7 कि.मी अंतराचे रेल्वे मार्गाचे काम करावयाचे आहे. परंतु शासनाकडून त्या रेल्वे मार्गाचे काम हाती घेतले जात नाही. आपल्या विभागाचे अधिकारी काय करता हा खरा प्रश्न आहे. त्या एम.आय.डी.सी.चा विकास करण्यासाठी आपल्या अधिकाऱ्यांनी काय नियोजन केले आहे ? त्या ठिकाणी पास्को उद्योग आला, लहान-मोठे उद्योग आले आहेत. 7 कि.मी.रेल्वे मार्ग करण्यासाठी फक्त 15 ते 20 कोटी रुपये खर्च आहे. मी स्वत: रेल्वे आणलेली आहे. 2 कोटी रुपये पर कि.मी खर्च रेल्वेमार्गासाठी केला आहे. त्या ठिकाणी थोडा घाट रस्ता आहे.त्या ठिकाणी रेल्वे मार्ग करण्यासाठी 15 ते 20 कोटी एवढाच खर्च येणार आहे. रेल्वे मार्ग आला तर त्या एम.आय.डी.सी.ची किंमत 100 पटीने वाढणार आहे. त्यासंबंधी शासनाने कोणत्याही

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

प्रकारचे नियोजन आखलेले नाही.

सभापती महोदय, मी सातारा जिल्हयातील खटाव, विटा या परिसरात गेलो होतो. ते हजारो एकर जमीन पडून आहे. मुंबईच्या बंदरातून, तसेच रेल्वेच्या माध्यमातून त्या ठिकाणी जाण्यासाठी सोय केली तर मोठ मोठे उद्योजक त्या ठिकाणी गुंतवणूक करण्यास तयार आहेत. त्याबाबतीत आपण अधिकाऱ्यांबरोबर कधी चर्चा केली आहे काय ? आपल्या राज्यात मोठमोठे खाजगी उद्योजक का येत नाहीत, त्याचे कारण त्यांच्याकडून प्रथम 10 टक्के रक्कम मागितली जाते. परदेशातील मोठमोठया उद्योजकांकडून 25 टक्क्यांपर्यत रक्कम मागितली जाते, म्हणून परदेशातील उद्योजक आपल्या राज्यातून निघून जातात. म्हणून मी श्री.छत्रपती शिवाजी यांचे नाव घेतले, त्यांच्याकडून मला वेगळया अपेक्षा आहेत. देशातील आणि परदेशातील जे उद्योजक आपल्याकडे गुंतवणूक करण्यासाठी येतात, त्यांच्याबरोबर उद्योग सचिव म्हणून त्यांनी सविस्तरपणे चर्चा करावी. आपण उद्योजकांबरोबर व्यवस्थितपणे चर्चा केली तर आपल्याकडे उद्योग निश्चितपणे वाढतील.

महोदय, मी माझा अनुभव सांगतो की, मी माझे व्यक्तिगत काम घेऊन मंत्रालयात सचिवांना भेटीसाठी कधीही गेलेलो नाही. मंत्रालयात कमीत कमी जाणारा आमदार आहे. मी सहा महिन्यातून एखाद वेळा मंत्रालयात जातो. मी माननीय उद्योग मंत्री महोदयांना दोन वर्षापूर्वी भेटावयास गेलो होतो. त्यांना मंत्रालयात नव्हे तर विधानभवनात भेटीसाठी गेलो होतो. त्यांना सांगितले की, माझ्या कंपनीची इंडस्ट्रीयल ऑर्डर झालेली आहे. परंतु दोन वर्षे झाली अद्याप ती फाईल मंत्रालयातून हलली नाही. मी 3 ते 4 हजार लोकांना रोजगार देतो. मी कस्टम डयूटी 300 ते 400 कोटी रुपये भरतो. त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे. तर या राज्यात उद्योग कसे वाढणार ? खरे तर शासनाने आम्हा उद्योजकांना "वेल कम " केले पाहिजे. आम्ही दुबई येथे गेलो तर आम्हाला "वेल कम " करण्यासाठी तेथील उद्योग सचिव येतो. आम्ही कस्टम ऑफिसमध्ये गेलो तर आम्हाला भेटण्यासाठी लोक बाहेर उभे असतात. आम्हाला ते विचारतात की, काय काम आहे ? आम्ही तुमचे काम करुन देतो. तेथील अधिकारी आमची जेवणाची, राहण्याची व्यवस्था देखील करतात. वरुन आम्हाला नमस्कार देखील करतात, अशी तेथील परिस्थिती आहे. या ठिकाणी एखादे काम घेऊन गेलो तर अधिकारी तोंड वाकडे करतात.

3...





श्री.जयंत प्र.पाटील...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री.बाजोरिया हे मंत्र्यांना आणि अधिकाऱ्यांना जाऊन भेटू शकतात, आम्ही त्यांना भेटू शकत नाही....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते 16:05

श्री.जयंत प्र.पाटील.........

महाराष्ट्रातील एकही मराठी माणूस उद्योगपती होऊ शकत नाही. हे काय राज्य आहे? मंत्री महोदयांनी उद्या याची माहिती घ्यावी आणि मला चर्चेला बोलवावे. महाराष्ट्रात पहिले खाजगी बंदर मी सुरु केले आहे. या महाराष्ट्रात बल्क कार्गो बंदर मी सुरु केले आहे. मला विरोध केला जातो. उद्योगाच्या गोष्टी काय करता? टक्केवारी घेऊन काम करणार असाल तर या महाराष्ट्रात उद्योग वाढणार नाहीत. कोणताही उद्योगपती पुढे येणार नाही. मला मंत्री महोदयांनी चर्चेसाठी बोलवावे अशी अपेक्षा आहे. मी या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, कशासाठी उद्योग करायचे, धंदे करायचे? या राज्यात उद्योग वाढू शकत नाही. गुजरातमध्ये या देशातील 86 टक्के कार्गो उतरतो. फक्त 5 टक्के कार्गो महाराष्ट्रात आणि उर्वरित कार्गो देशातील इतर मोजक्या राज्यात उतरतो. गुजरातमध्ये उद्योग वाढतील परंतु या महाराष्ट्रात उद्योग वाढणार नाहीत. उद्योगधंदे वाढायचे असतील तर तुम्ही कायदा केला पाहिजे. ज्या महाराष्ट्रात 896 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे त्यापैकी 25 कि.मी.चा किनारा देखील अद्याप राज्य सरकारने विकसित केलेला नाही. ही या राज्याची परिस्थिती आहे.

सभापती महोदय, बोईसर आणि भिवंडी येथे गुजरातहून माल येतो. आमचे राज्य त्या राज्याशी स्पर्धा करु शकत नाही. हा महाराष्ट्र टाटा, बिर्ला, रिलायन्स यांना आमंत्रण देतो. परंतु महाराष्ट्रीय जयंत पाटलांना आमंत्रण द्यायला तयार नाही. वेळ अपुरा असल्यामुळे अधिक बोलता येत नाही. अन्यथा माझ्याकडे भरपूर उदाहरणे आहेत.

सभापती महोदय, मी उद्योग आणि पाटबंधारे विभागाबाबत बोलणार आहे. उद्योग क्षेत्राबाबत वेगळ्या प्रकारची भूमिका घेऊन काम केले पाहिजे. माननीय उद्योग मंत्र्यांकडून आमची आणखी एक अपेक्षा आहे. उद्योगासाठी शेतीचे पाणी घेता कामा नये. उद्योग उभे करताना शेतीचे पाणी पळवू नका. भरपूर स्पॉट आहेत, त्या ठिकाणी धरणे उभी करता येतील. सिंचन या विषयावर बोलायला लागलो तर चार तासांचा वेळ अपुरा पडेल एवढी प्रकरणे मांडण्यासारखी आहेत.

**तालिका सभापती** (श्री.विनायक मेटे) : माननीय सदस्यांचा वेळ संपलेला आहे. त्यामुळे थोडक्यात मुद्दे मांडून भाषण पूर्ण करावे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, थोडक्यात भाषण पूर्ण करायचे म्हणजे काय? काल विधेयकावर बोलत असताना मी म्हटले होते की, विधेयकावर अधिक चर्चा करणार नाही. परंतु अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना मी सिंचन विषयावर अधिक वेळ बोलणार आहे. त्यामुळे मला आणखी दहा मिनिटे वेळ देण्यात यावा.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील......

महोदय, राज्यात सिंचनाची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. सिंचनासाठी जी धरणे आपण तयार करतो त्यांचे दिवसेदिवस एस्टीमेट वाढविण्याचे उद्योग जोरात सुरु आहेत. या निमित्ताने मी अशी मागणी करतो की, जलसंपदा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे राज्याचे विभाग प्रमुख म्हणून जे सचिव असतात ते टेक्नीकल मधून म्हणजेच खालून प्रमोट होऊन सचिव पदापर्यंत येतात, त्याऐवजी इतर विभागांप्रमाणे आयएएस दर्जाचाच अधिकारी या विभागाचा सचिव म्हणून नेमावा. याचे प्रमुख कारण म्हणजे मागील वर्षात पाटबंधारे विभागाचे बजेट 10 हजार कोटीचे होते पण त्यातून 25 टक्के रक्कम हडप करण्याचे काम हे राज्यकर्ते आणि अधिकारी करीत आहेत, अशी आज सिंचनाच्या बाबतीतील राज्याची परिस्थिती आहे. या अनुषंगाने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सिंचन विभागाची कंत्राटदार म्हणून जी एफ.आर. कन्स्ट्रक्शन कंपनी काम करीत आहे तो राज्यातील जवळपास अर्ध्यापेक्षा अधिक कामे करीत आहेत. तसेच विधान भवनात जेव्हा एंट्री पासेस बंद असतात, आमचे नातेवाईक सुध्दा येऊ शकत नाहीत अशा वेळेस मात्र हा एफ.आर. कन्स्ट्रक्शनचा मालक एस.आर. मुक्तपणे फिरत असतो. तो कधी मंत्र्यांकडे जेवायला जातो तर कधी मंत्र्यांना जेवायला घालतो. या एस.आर. ला 31 मार्च 2012 रोजी 50 टक्के बिले अदा करण्यात आली. तसेच शिर्के नावाचे कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक कामाचे एस्टीमेट वाढवितात अशी सध्याची परिस्थिती आहे. या सर्व प्रकरणांची सीबीआय कडून चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

महोदय, बाणगंगा प्रकल्पाच्या बाबतीत मी सभागृहात नेहमीच सांगत असतो. या प्रकल्पाची एकूण किंमत 400 कोटी होती पण ती आता 500 कोटीने वाढविण्यात आली. ज्या गावात हे धरण आहे ते फक्त 100 लोकवस्तीचे गांव आहे. त्या गावाला फक्त 10 कोटी रुपये जरी दिले तरी ते सर्व लोक उठून बाजूला गेले असते. अशा धरणाची किंमत 500 कोटींनी वाढविण्यात येते आणि अधिकारी मात्र त्याकडे डोळे मिटून पाहतात, त्या वाढीव एस्टीमेटला मान्यता देतात. ही एक प्रकारे जनतेची फसवणूक आहे, जनतेला लुटण्याचे काम सुरु आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदय हॉस्पिटलमध्ये असल्याने देऊ शकणार नाहीत याची मला जाणीव आहे. तसेच ते उद्या नक्कीच मुंबईत येतील याचीही जाणीव मला आहे. ठीक आहे, शासनाने जरी या प्रकरणांची

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.......

चौकशी केली नाही तर आम्ही कोर्टात जाऊ, यावर्षीचा 7/12 त्यांच्याच नावावर लागलेला आहे. अशा प्रकारे जनतेची लूट चालू आहे. लोक आम्हाला विचारतील पण उद्या कदाचित आम्ही सत्तेत नसू पण बाजोरिया जरुर असतील, आम्ही यानंतर आमदार म्हणून निवडून येऊ शकणार नाही पण आमचा पैसा खाणारे, आमचा पैसा लुटणारे हे लोक उद्या मस्टरवर असतील.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

आता सेक्रेटरी आमदार निवडून आणतील. 10 वर्षानंतर तुम्ही दिसणार नाहीत. आज हे जे राज्य चालविले जात आहे ते सेक्रेटरीच चालवित आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या राज्यात एका सेक्रेटरीने 4 हजार कोटी तर दुसऱ्या सेक्रेटरीने 2 हजार कोटी रुपये गुंतवल्याचे आपल्याला दिसून येत आहे. या राज्याची फार वाईट परिस्थिती आहे. या सेक्रेटरींची अगोदर काय आर्थिक परिस्थिती होती याचा आपण कधी विचार करणार आहात की, नाही ? होय आम्ही सांगतो आमची आर्थिक परिस्थिती कशी होती. आम्ही मुंबईमध्ये फुटपाथवर झोपून, कष्ट करुन या ठिकाणी आलेलो आहोत. परंतु हे सक्रेटरी एका मिनिटात कसे काय श्रीमंत झाले ? सक्रेटरी आता फाईव्ह स्टार हॉटेलशिवाय राहत नाही. तुम्ही म्हणता की आम्ही यांना निवडून आणू, त्यांना निवडून आणू. परंतु एक वेळ या देशात व राज्यात अशी येईल की, बाजोरिया साहेब लोक रस्त्यावर येतील.

सभापती महोदय, मी एक जागरुक आमदार आहे. सभागृहात बोलणारा आमदार आहे, जनमानसात व चळवळीमध्ये काम करणारा आमदार असून एका पक्षाचा कार्यकर्ता देखील आहे. आमच्याकडे कोणताही अधिकारी विकासाच्या चर्चेसाठी येत नाही. सभापती महोदय, आपण आमदार आहात, लोकप्रतिनिधी आहात, अनेक संघटना चालविता, शिवाजी महाराजांच्या नावाने संघटना चालविता परंतु आपल्याकडे विकासाच्या कामाची चर्चा करण्यासाठी एक तरी अधिकारी आला होता काय ?

सभापती महोदय, 1925 सालामध्ये या सभागृहात माझे आजोबा आमदार होते परंतु त्यांचे कोठलेही रेकॉर्ड आम्हाला मिळत नाही. माझे आजोबा 1925 मध्ये पहिल्या विधानसभेत सदस्य होते. परंतु त्यांचे कोणतेही रेकॉर्ड आपल्या ग्रंथालयात मिळत नाही. 1937 मध्ये ज्याच्या नावावर सात-बाराचा उतारा होता अशा व्यक्तीला मत देण्याचा अधिकार होता. माझे आजोबा शेतकऱ्यांचे नेते होते, शेतकऱ्यांसाठी त्यांनी लढे दिले होते व जिल्हयामध्ये बहुजन समाजाचे राजकारण करणारे नेते म्हणून त्यांची गणना होत होती. आम्ही लहान होतो त्यावेळेस जिल्हाधिकारी आमच्या घरी येऊन त्यांना भेटायचे व विकासाच्या कामावर चर्चा करायचे. माझ्या आजोबांकडे केवळ एका

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

विशिष्ट संघटनेचे प्रमुख म्हणून बघितले जात होते. परंतु आज अधिकाऱ्यांना मंत्र्यांकडे जाण्यासाठी वेळ नाही तर ते राज्य मंत्र्यांना कोठून वेळ देणार? आज राज्यमंत्र्यांना किंमतच दिली जात नाही.

सभापती महोदय, आपण खऱ्या अर्थाने अधिकाऱ्यांच्या संदर्भात चर्चा करीत नाही त्यामुळे अधिकारी मुजोर झालेले आहेत, गलेलठ्ठ झालेले आहेत. त्यांना वाटते की, जयंत पाटील बोलले की, रावतेंना भेटा, रावते बोलले नाही तर फुंडकरांना भेटा आणि आपले सर्व बरोबर करा हा जो काही प्रकार चालला आहे तो खऱ्या अर्थाने थांबला पाहिजे. सिंचनामध्ये झालेला भ्रष्टाचार, सिंचनामध्ये एकाच ठेकेदाराला दिलेले टेंडर, तसेच सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेले गंभीर आरोप हे फार गंभीर आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते अंतिम आठवडा प्रस्तावावर जोराने बोलले नाहीत. परंतु मला वाटते की, एकाच माणसाच्या नावाने तिघांची टेंडर भरलेली आहेत ही गंभीर बाब आहे. एकाच माणसाने तीन व्यक्तींच्या नावाने टेंडर भरले असेल तर बॅकेतून पैसे काढले असतील... सभापती महोदय, आता कोअर बँकीग आहे. कधी, किती व केव्हा पैसे काढले याची सर्व माहिती आता मिळत असते. त्यामुळे सिंचनाच्या संदर्भात ठेकेदारांची आपल्याला चौकशी करावी लागणार आहे. या चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनास विनंती आहे की, जलसिंचनाच्या प्रकल्पाच्या संदर्भात राज्यशासनाने यासंदर्भात उत्तर दिले पाहिजे. ज्यांनी तीन तीन टेंडर भरलेले आहेत त्यांचे टेंडर रद्द झाले पाहिजे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

जे अधिकारी या रिंगमध्ये समाविष्ट झाले आहेत त्यांना ताबडतोब सस्पेंड करुन त्यांची चौकशी केली पाहिजे अशी मागणी करतो. पुढील पावसाळी अधिवेशन माझे शेवटचे अधिवेशन आहे असे मला वाटते त्या अधिवेशनामध्ये सिंचनाच्या विधेयकावर दोन ते तीन मिनिटे बोलण्याचा मी नक्कीच प्रयत्न करीन, त्यावेळी मी माझे विचार नक्कीच मांडणार आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई या अभिमत विद्यापीठास उत्कृष्टता केंद्राचा दर्जा देणे

**मु.शी.**: रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई या अभिमत विद्यापीठास उत्कृष्टता केंद्राचा दर्जा देणे यासंबंधी माननीय उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांचे निवेदन

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

**----**

(यानंतर श्री. भारवि)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करण्यापूर्वी उद्देश व कारणे काय आहेत हे सांगितले असते तर बरे झाले असते.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच सांगितले की, आपण आयआयटीच्या दर्जाचा इलाईट स्टेटस देण्याचे काम करीत आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, इलाइट स्टेटस देण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे की केंद्र सरकारला काय ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, इलाइट स्टेटस देण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. यासाठी इंटरनॅशनल नॉर्म्स पूर्ण करावे लागतात. त्याप्रमाणे नॅशनल व इंटर नॅशनल नॉर्म्स पूर्ण करण्यात आले आहेत. आपण तसे स्टेटस दिल्यामुळे केंद्र सरकारची सर्व ग्रँट उपलब्ध होऊ शकते.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार

**मु.शी.**: उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार या विषयावर सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, भगवानराव साळुंखे, सय्यद पाशा पटेल आणि नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी उद्योग विभागावर केलेले भाषण मी अत्यंत लक्षपूर्वक ऐकले. मला अपेक्षा होती की, त्यांचे भाषण दिशादर्शक असेल. पण माझी अपेक्षा पूर्णतः फोल ठरली आहे. उद्योग विभाग बेकारी संपविणारा आणि बेकारांच्या हाताला काम देणारा आहे. महाराष्ट्राचे आर्थिक भवितव्य घडविणारा विभाग आहे. महाराष्ट्राला आर्थिक स्थैर्य देणारा विभाग आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनामध्ये आर्थिक क्रांती घडविण्याचे काम उद्योग विभाग करणार आहे. जे निरूद्योगी लोक आहेत त्यांना उद्योगाला लावणारा हा विभाग आहे. या उद्योग खात्याचे मंत्री श्री.नारायण राणे साहेब हे अतिशय कल्पक आणि कुशल दिग्दर्शक आहेत आणि सहायक दिग्दर्शक म्हणून श्री.सचिन अहिर साहेब त्यांच्या जोडीला आहेत. त्यांच्या दिग्दर्शना खाली उद्योग विभाग अतिशय उत्तम प्रकारे वेगाने धाव घेत आहे. उत्तम चित्रपटाची टवाळी करणारे काही प्रेक्षक असतात. हा त्यांचा दोष नाही. तो त्यांच्या स्वभावाचा दोष आहे. काही लोकांना भरारी दिसत नाही. हा त्या व्यक्तीचा दोष नाही. तो व्यक्तीच्या अधूपणाचा दोष असतो. आकाशात उंच ढगात गेलेली भरारी डोळे अधू असतील तर ती दिसणार नाही.

देशात महाराष्ट्र हे औद्योगिकीकरण झालेले एकमेव प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. लघु उद्योगामध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. देशांतर्गत आणि देशाबाहेरच्या उद्योजकांनी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात गुंतवणूक केली आहे. मोटार वाहन उत्पादन आणि माहिती तंत्रज्ञान यामध्ये महाराष्ट्र प्रमुख केंद्र बनले आहे.

यानंतर श्री.रणदिवे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . ..

महाराष्ट्रात निर्यातवृध्दी झोन मोठ्या प्रमाणात उभे रहात आहेत. मला असे वाटते की, हे अतिशय चांगले संकेत आहेत.गेल्या दशकापर्यंत म्हणजे 2010 पर्यंत 4221 विदेशी गुंतवणुकीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. एकूण गुंतवणूक किती झाली होती? गेल्या दशकापर्यंत 84,958 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली होती. त्या पैकी 42 टक्के गुंतवणुकीवरचा खर्च पूर्ण झालेला आहे आणि आपण आता 60 टक्क्यापर्यंतच्या दिशेने वाटचाल करीत आहोत म्हणजे सर्वसाधारणपणे गेल्या दशकामध्ये म्हणजे 2010 पर्यंत 41 हजार कोटी पेक्षा जास्त प्रत्यक्ष उद्योगांवर खर्च झालेला आहे.अमेरिकेची 16 टक्के गुंतवणूक आहे,मॉरिशिअसची 14 टक्के गुंतवणूक आहे, यु.के.ची 60 टक्के आणि इतर देशांची 63 टक्के इतकी गुंतवणूक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्योग विभागा वर तसेच येथील उद्योग विश्वावर जगाने दाखविलेला हा विश्वास आहे आणि त्यामुळे अमेरिकेला आमच्या महाराष्ट्राचा मोह पडतो. याचा अर्थ महाराष्ट्रामध्ये उद्योगघंद्याला प्राधान्य देणे हे शासनाचे धोरण आहे आणि त्यादृष्टीने महाराष्ट्रामध्ये उद्योगधंदे उत्तम दिशेने चाललेले आहेत असे म्हणता येईल.

सभापती महोदय, देशाच्या एकूण उत्पन्नात राज्याचा वाटा 14.07 टक्के इतका आहे. राज्याच्या अर्थ व्यवस्थेची सरासरी वाढ ही 9 टक्क्यापेक्षा अधिक असून विदेशातील गुंतवणूकदारांनी गुंतवलेल्या प्रस्तावांचा हा परिणाम आहे. आतापर्यंत जवळजवळ 17 हजार 207 प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यामध्ये 8 लाख 74 हजार 43 कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्राला अपेक्षित आहे आणि त्यातून जवळजवळ 43 लाख 36 हजार 790 रोजगार उपलब्ध होणार आहेत आणि हे रोजगार महाराष्ट्राला निश्चितपणे पुढे घेऊन जाण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार असून त्यादृष्टीने महाराष्ट्र राज्य वाटचाल करीत आहे. महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. कारण या राज्यामध्ये 320 विशाल प्रकल्प उभे केले जाणार आहेत. त्यामध्ये जवळजवळ 2 लाख 63 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे आणि यातून महाराष्ट्रा मध्ये 3 लाख 11 हजार रोजगार निर्माण होणार आहेत. तसेच 2010 मध्ये सुध्दा 41 हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक झालेली आहे.

सभापती महोदय, निर्यातीच्या बाबतीत सांगावयाचे तर महाराष्ट्रातील प्रमाण संपूर्ण देशाच्या 27 टक्क्यापर्यंत आहे. 2009-2010 या आर्थिक वर्षामध्ये देशाची निर्यात 8 कोटी 45 लाख 12 हजार 500 एवढी होती आणि महाराष्ट्रात ही निर्यात 2 कोटी 28 लाख 18 हजार 375 इतकी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . ..

आहे म्हणजे हे प्रमाण एकूण देशाच्या निर्यातीच्या 27 टक्केच आहे. त्यामुळे आपण जर गुजराथचा विचार केला तर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, तेथील प्रमाण 22 टक्के आहे. माननीय विरोधी पक्षनेते नेहमी शेजारधर्माची आठवण ठेवतात.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले........

विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये 45 टक्के आहे. गुजरातमध्ये फक्त 5 टक्के विदेशी गुंतवणूक आहे. त्यामुळे ती आकडेवारी मला या ठिकाणी द्यावयाची आहे. देशातील उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा वाटा 14.7 टक्के आहे. गुजरातचा वाटा फक्त 7 टक्के आहे. तामीळनाडूचा वाटा 6.8 टक्के आहे. आंध्र प्रदेशचा वाटा 6.7 टक्के आहे. महाराष्ट्राचे सरासरी दरडोई उत्पन्न 74,027 रुपये आहे. गुजरातचे दरडोई उत्पन्न 63,961 रुपये आहे. तामीळनाडूचे दरडोई उत्पन्न 42,330 रुपये आहे. आंध्र प्रदेशचे दरडोई उत्पन्न 44,081 रुपये आहे. देशाच्या एकंदरीत रोजंदारीमध्ये महाराष्ट्राचा वाटा 15.3 टक्के आहे. गुजरातचा वाटा फक्त 9.63 टक्के आहे. तामीळनाडूचा वाटा 15.7 टक्के आहे.

सभापती महोदय, उद्योग खात्याची भरभराट ही सातासमुद्रापलीकडे गेलेली आहे. मला एका गोष्टीचे नवल वाटते की, एकीकडे उद्योग येत नाहीत असे म्हणावयाचे आणि दुसऱ्या बाजूला उद्योग येत असताना त्याला विरोध करावयाचा, ही दुटप्पी भूमिका महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. तिकडे कोकिळेचा कंठ काढावयाचा आणि दुसरीकडे काक कंठाने ओरड करावयाची ही विसंगती आहे. त्यामुळे हे चित्र बदलणे आवश्यक आहे. बेरोजगारी हटवावयाची असेल तर उद्योगधंद्यांची आवश्यकता आहे. महाराष्ट्र समृध्द करावयाचा असेल तर उद्योगधंदे उभे राहिले पाहिजेत. एकीकडे सांगावयाचे की, आपण उद्योगधंदे उभे करीत नाही आणि दुसरीकडे उद्योगधंद्याला विरोध करावयाचा हे महाराष्ट्र फार काळ सहन करणार नाही. त्याची परिणती आताच झालेल्या निवडणुकांमध्ये विरोधी पक्ष भोगत आहे. घरच्याला थप्पड आणि बाहेरच्याला आलिंगन ही नेहमीचेच आहे. गुजरातमध्ये असे आहे, तसे आहे असे सांगितले जाते मग महाराष्ट्रामधले दिसत नाही का ?

सभापती महोदय, या निमित्ताने माझी एक विनंती आहे की, शेतकऱ्यांना जो मोबदला दिला जातो त्या विषयीचे धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. ज्यांची जमीन आपण संपादित करणार आहात, ज्यांची जमीन ताब्यात घेणार आहात त्यांच्यासाठी किमान 20 ते 25 टक्के रक्कम त्या प्रकल्प अहवालामध्ये ठेवण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने राज्य शासनाने निश्चितपणे प्रयत्न

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

करावेत अशी आग्रहाची विनंती मी राज्य शासनाला करीत आहे. महाराष्ट्रातील जे बेरोजगार आहेत त्यांच्या हाताला उद्योगधंद्याच्या माध्यमातून काम दिले जाऊ शकते आणि महाराष्ट्र समृध्दीच्या दिशेने वाटचाल करु शकतो. लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी. हे मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या समाधानासाठी सांगत नाही. मराठी भूमिपुत्रांना उद्योग विभागामध्ये न्याय दिला जावा आणि आमच्या या महाराष्ट्र राज्यामध्ये गरिबी नावाचा जो शाप आहे तो दूर व्हावा म्हणून मी राज्य शासनाला विनंती करीन की, आमच्या खेड्यापाड्यातील जे उद्योजक आहेत त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. त्यांना जर प्राधान्य दिले तर, या भूमीतील उद्योजक उभे राहिले तर निश्चितपणे या महाराष्ट्राविषयी त्यांच्या मनामध्ये असणारी तळमळ आणि तगमग ही जिवंत राहील आणि ते महाराष्ट्राला न्याय देण्याचा प्रयत्न करतील.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म पंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

सभापती महोदय, या माय मराठीच्या दरबारामध्ये जो जागर सुरु आहे. त्या जागराचे आमचे धनी येथे उपस्थित आहेत. मी या निमित्ताने त्या धन्याला मी विनंती करणार आहे की, उद्योग खात्याचा पोत जरा उत्तम प्रकारे नाचवा आणि महाराष्ट्रातील उद्योगांना न्याय द्यावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.संदिप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे. सभापती महोदय, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी माझ्याबद्दल प्रेम दाखविले आहे. त्यामुळे माझ्या ज्ञानात किंवा त्यांच्या ज्ञानात भर टाकण्याची इच्छा झाली आहे. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जल हेच जीवन आहे. या राज्यात आघाडी सरकारचे शासन आहे. हे शासन जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्या भागात सिंचनाचा अनुशेष आहे तो दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे. सिंचनक्षमता वाढविण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य गेली 15 वर्षे सत्तेमध्ये नाहीत. त्यामुळे ते सातत्याने विरोध करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सभापती महोदय, सन 2011-12 या वर्षामध्ये 87 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे. त्यामुळे राज्यामध्ये आजपर्यंत 48.25 लक्ष हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे. सन 2012-13 मध्ये 1.25 लाख हेक्टर सिंचनाखाली येणार आहे.

सभापती महोदय, एका कामाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला आहे. त्या कामाची भिंत सरकली असे ते म्हणाले होते. परंतु त्यांच्याच पक्षाचे राज्यसभेचे खासदार यांनी त्या कामाची तपासणी करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:45

श्री. संदिप बाजोरिया...

सभापती महोदय, विदर्भाचा भौतिक आणि आर्थिक अनुशेष दूर करण्यासाठी हे आघाडी सरकार सातत्याने प्रयत्न करीत असल्यामुळे विदर्भामध्ये अनेक कामे होत आहेत. प्रत्येक वेळी या ठिकाणी विदर्भाचे नाव घेतले जाते. माननीय राज्यपालांनी विदर्भाचा अनुशेष दूर करण्यासाठी विदर्भाला निधी देण्याचे निर्देश दिलेले आहेत. विदर्भाचा निधी दुसरीकडे वळविला जाऊन विदर्भातील विकास कामे कशी बंद पडतील असा प्रयत्न विरोधी पक्षाकडून होत आहे असा माझा आरोप आहे. सिंचनाच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होत नसून कामे चांगल्या प्रकारे होत आहेत आणि जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणण्यासाठी हे आघाडी शासन प्रयत्न करीत आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 259 अन्वये आणलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचा औद्योगिक विकास झाला असे सांगितले जाते. मी महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीचे पुस्तक वाचले. त्यामध्ये जी आकडेवारी दिली ती मी आपल्या माहितीसाठी सांगते. सन 2010-11 मध्ये राज्याचे स्थूल उत्पन्न 10.0 होते ते सन 2011-12 मध्ये 9.1 इतके झाले. म्हणजे स्थूल उत्पन्न 1 टक्क्याने कमी झाले. हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे चित्र आहे काय ? राज्यातील प्रत्येक भागाचा विकास हा उद्योगधंद्याच्या माध्यमातून झाला पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. त्यासाठी सर्व तालुक्यांमध्ये एमआयडीसी स्थापन करण्यात आल्या. ह्या एमआयडीसी स्थापन केल्यानंतर ख-या अर्थाने मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे निर्माण झाले आहेत काय ? बेरोजगारांना रोजगार मिळाला आहे काय ?

सन 2010-11मध्ये नागपूर विभागामध्ये 2687 उद्योग आले, 8628 कोटीची वित्तीय गुंतवणूक झाली आणि 71 हजार लोकांना रोजगार मिळाला. अमरावती विभागामध्ये सन 2011-12मध्ये 1589 उद्योग आले, 759 कोटीची वित्तीय गुंतवणूक झाली आणि 1900 लोकांना रोजगार मिळाला. औरंगाबादमध्ये 4577 उद्योग आले, 5563 कोटीची वित्तीय गुंतवणूक झाली आणि 53 हजार लोकांना रोजगार मिळाला. ही आकडेवारी पहाता या एमआयडीसीच्या माध्यमातून विकास झाला का हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. एमआयडीसीच्या माध्यमातून मागासलेल्या भागात मोठ्या प्रमाणावर उद्योग यावेत यासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मुंबई, पुणे, नाशिक या शहरामध्ये उद्योग येण्यासाठी स्पर्धा असते. या ठिकाणी उद्योग सुरु करण्यासाठी उद्योजकांना पॅकेज दिलेले आहे. भागभांडवलाच्या 30 टक्के त्यांना अनुदान देण्यात येते. परंतु हाच निकष चंद्रपूर आणि गडचिरोली सारख्या भागामध्ये लावला तर तेथे उद्योग येतील काय ? चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये उद्योग यावेत असे सरकारला मनापासून वाटत असेल तर उद्योजकांना भागभांडवलावर 50 टक्के अनुदान दिले पाहिजे. चंद्रपूर, गडचिरोली या भागात खनिज मोठया प्रमाणावर आहे. तेथे मोठया प्रमाणावर खनिजावर आधारित उद्योग येऊ शकतील.

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:45

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, आमच्या विदर्भामध्ये बेराजगारी खूप मोठ्या प्रमाणावर आहे. मी मध्यंतरी बेरोजगारांची नोंदणी करायला सुरुवात केली होती. परंतु 8 दिवसामध्ये 10 हजार मुलांची नोंदणी करुन देखील बेरोजगारांची संख्या कमी झाली नाही. ज्यांना आरक्षणाची सवलत आहे त्यांनाही आपण नोक-या देऊ शकलो नाही. ज्यांना गरज आहे त्यांना नोक-या देऊ शकलो नाही. 8 दिवसामध्ये 10 हजार लोकांची नोंदणी झाली. जेव्हा बेरोजगारांचा मेळावा घेतला होता त्यावेळी नोकरी मिळेल या आशेने 75 हजार मुले त्या मेळाव्याला आली होती. ही जर परिस्थिती असेल तर एमआयडीसी कोणासाठी आहे असा प्रश्न निर्माण होतो. उद्योगासाठी आपण सर्व पायाभूत सुविधा निर्माण करुन देतो, त्यांना रस्ते देतो, पाणी देतो, वरुन अनुदानही देतो. असे असताना जे उद्योग सुरु होतात त्यामध्ये स्थानिक भूमिपुत्रांना नोक-या मिळत नाहीत. आतापर्यंन्त एमआयडीसीमध्ये जेवढे उद्योग सुरु झाले त्यामध्ये किती स्थानिक युवकांना काम मिळाले अशी विचारणा मी जिल्हाधिका-यांना केली.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 16:50

श्रीमती शोभा फडणवीस...

या गोष्टीचा हिशोब मला कुठेही मिळालेला नाही. याबाबतचा हिशोब मला जिल्हाधिकारी यांचेकडे मिळाला नाही. 10 टक्क्यांच्या वर स्थानिक लोकांना नोकऱ्या देऊ शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. विशेषत: नक्षलवादी एरिया असेल, मागासवर्गीय एरिया असेल, अशा ठिकाणी स्थानिकांना मोठया प्रमाणात रोजगार मिळवून दिला पाहिजे.

महोदय,राज्यामध्ये अनेक ठिकाणी एम.आय.डी.सी. स्थापन केल्या आहेत. परंतु एम.आय.डी.सी.च्या विकासासाठी ज्या सोयी-सुविधा पाहिजे, त्या शासन अद्यापपर्यंत देऊ शकलेले नाही. युतीच्या काळात नागपूर येथील बुटीबोरी येथे पंचतारांकित एम.आय.डी.सी. स्थापन करण्यात आली. त्या ठिकाणी सुरुवातीला जेवढे उद्योग आले, (अडथळा) सभापती महोदय, मला आपण संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्यांची भाषणे चालू असताना मी कधीही अडथळा आणला नाही. परंतु मी भाषण करीत असताना मात्र अडथळे आणले जात आहेत हे बरोबर नाही. बुटीबोरी येथील पंचतारांकित एम.आय.डी.सी.मध्ये उद्योग आले पाहिजेत म्हणून शासनाने प्रयत्न केले. तेथे उद्योग येण्यासाठी सुरुवात झाली. परंतु आता बुटीबोरी येथील पंचतारांकित एम.आय.डी.सी.मध्ये उद्योगांनी पाठ फिरविली आहे. त्या ठिकाणी नव्याने उद्योग का येत नाहीत याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. (अडथळा ) मी एम.आय.डी.सी. संदर्भात बोलत आहे. राज्यात जे उद्योग सुरु आहेत, ते कामगार समस्यांमुळे बाहेर राज्यात जात आहेत, अशी स्थिती आहे. या उद्योगांमध्ये जे कामगार काम करीत आहेत, त्यांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. उद्योगास हव्या असलेल्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत, म्हणून आपल्या राज्यात उद्योग येत नाहीत. या राज्यात विजेचा मोठया प्रमाणात तुटवडा असल्यामुळे देखील उद्योग येत नाहीत, या गोष्टीकडे विशेषत्वाने लक्ष देणे गरजेचे आहे. जेव्हा मोठे उद्योग येतात, मोठया वसाहती आपण उभ्या करतो आहोत. त्या ठिकाणी बसस्थानक असले पाहिजे. बसेस पार्किंगसाठी जागा उपलब्ध असली पाहिजे इत्यादी गोष्टीची सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. यासंबंधी नियोजन करताना या प्राथमिक गोष्टींचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे.

( भाषण समाप्त करण्यासंबंधी बेल वाजविण्यात आली. )

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, मला माझे विचार पूर्ण करण्यासाठी बोलू दिले जात नाही, त्यामुळे मी सभात्याग करते. मी माझे विचार व्यक्त करीत असताना सन्माननीय सदस्य आपापसात बोलत आहेत. मी भाषणास नुकतीच सुरुवात केली असताना आपण भाषण समाप्ती संबंधी बेल वाजवित आहात.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांना सांगू इच्छितो की, ही चर्चा 2 तास 40 मिनिटांमध्ये पूर्ण करावयाची आहे. आजच्या कामकाजपत्रिकेत बरेच कामकाज दाखविण्यात आलेले आहे व ते कामकाज आपल्याला संपवावयाचे आहे. आपण ज्येष्ठ सदस्या आहात. मी आपणास बोलण्यासाठी संधी देतो आहे. आपण सभात्याग न करता आपले विचार पूर्ण करावेत.

श्रीमती शोभा फडणवीस : मला माझे विचार व्यक्त करण्यासाठी पुरेसा वेळ न दिल्यामुळे मी सभात्याग करते.

( सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस सभात्याग करतात. )

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रत्येक वेळेला आम्ही या सभागृहात गळचेपी सहन करणार नाही. आम्हाला या प्रस्तावावर बोलायचे होते. परंतु ती संधी देण्यात आलेली नाही. आपण टी.व्ही.वर एक जाहिरात बघतो. त्या जाहिरातीमध्ये पोपटाला डॅण्ड्रफ झाल्याचे दाखविले आहे. प्रत्यक्षात वरुन पावडर पडत असल्याचे दृश्य दाखविले जाते. म्हणजे डॅण्ड्रफ झाल्याचे भासविले जाते. तसा प्रकार या ठिकाणी सुरु आहे. विरोधी पक्षाकडून भ्रष्टाचार कुठे झाला हे सांगितल्यानंतर त्याला सरकारने उत्तर द्यायचे आहे. त्या जाहिरातीमध्ये दाखविण्यात येणारे विडंबन आम्ही या ठिकाणी पाहिले आहे. आम्हाला मंत्री महोदयांचे उत्तर ऐकायचे नाही. आम्ही बहिष्कार टाकून निघून जात आहोत.

(विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडल्यानंतर माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस बोलत असताना त्यावर माननीय सदस्यांना पोटदुखी होण्याचे कारण नव्हते. त्यांना बोलायचा अधिकार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र हे औद्योगिक दृष्टीकोनातून क्रांती आणणारे राज्य आहे हे कोणी नाकारु शकत नाही. 1961 साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. या वर्षी आपण स्व.यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. त्यांचा आजच्या चर्चेच्या निमित्ताने उल्लेख करणे उचित होईल. या राज्यातील शेतकऱ्याला जोडधंदा मिळावा या दृष्टीकोनातून स्व.यशवंतराव चव्हाण यांनी 1 ऑगस्ट, 1961 रोजी उद्योग विकास महामंडळाची स्थापना केली. तसा कायदा निर्माण करण्यात आला. या राज्यात औद्योगिक क्रांती निर्माण व्हावी म्हणून 57 हजार एकर जमीन संपादित करण्यात आली. 233 औद्योगिक क्षेत्रे निर्माण करुन तेथे एमआयडीसी उभी करण्याचे काम केले. महाराष्ट्रातील विकासाची चळवळ ॲग्रो बेस न ठेवता इंडस्ट्रियल बेस करण्यात आली. या राज्यातील तरुणवर्गाच्या हाताला काम देऊ शकणार नाही तोपर्यंत निव्वळ प्रगती नव्हे तर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती देखील निर्माण होण्याची शक्यता नाकारण्यात येणार नाही.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव मांडला त्या माध्यमातून ज्या उणिवा असतील त्या आमच्यासमोर आणण्याचा प्रयत्न होईल अशी आमची अपेक्षा होती. त्या उणिवांबाबत सकारात्मक चर्चा करुन औद्योगिकरण करण्यासाठी जी प्रगती करण्याचा प्रयत्न करीत आहोत त्यामध्ये हातभार लावण्याचा प्रयत्न करतील अशी अपेक्षा होती. विरोधी पक्षाकडे लोकशाहीच्या माध्यमातून जे शस्त्र उपलब्ध आहे त्या शस्त्राचा वापर योग्य त्या सूचना करण्यासाठी केला जातो. निव्वळ भ्रष्टाचार होतो, अयोग्य गोष्टी होतात हे मांडण्यासाठी त्या शस्त्राचा वापर केला गेला हे दुर्दैव आहे. त्या शस्त्राच्या माध्यमातून चांगली चर्चा घडविता आली असती आणि ते योग्य ठरले असते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही मुद्दे या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .........

औद्योगिक दृष्ट्या हे राज्य अग्रक्रमावर नसून मागे चालले आहे असे सांगण्याचा सन्माननीय सदस्यांनी प्रयत्न केला. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी आपल्या भाषणातून उद्योगांशी संबंधित काही गोष्टींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी वस्तुस्थिती मात्र निश्चितच वेगळी आहे असे मी त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्याचे कारण म्हणजे राज्यातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात विचार केला तर उद्योगासाठी जे क्षेत्र संपादित करण्यात आले आहे त्या तुलनेने जीएसडीपीचा विचार करता इतर राज्यांच्या आपण पुढेच आहोत. त्यानुसार आपले स्थूल उत्पन्न 14.07 टक्के इतके असून तामिळनाडू 6.8 टक्के, आंध्र प्रदेश 6.7 टक्के आणि गुजरात राज्याचे हेच प्रमाण 7 टक्केपर्यंतच आहे. मी सभागृहाला आवाहन करु इच्छितो की, आपले राज्य उद्योगाच्या बाबतीत इतर राज्यांपेक्षा अग्रेसर आहे असे म्हणण्यापेक्षा इतर राज्ये आपल्या राज्यापेक्षा किती तरी पुढे असल्याचे चुकीचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न येथे झाला, जसे या राज्यातील औद्यागिकीकरणाला खीळ बसते की काय अशी शंका घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यात आली.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उपस्थित राहिला त्याप्रमाणे आपण उत्तर ऐकण्यासाठी देखील सभागृहात हजर रहावे.

श्री. सचिन अहिर : महोदय, मी देखील सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, माननीय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी उत्तर ऐकण्यासाठी सभागृहात यावे. जेणेकरुन त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात दिलेले स्पष्टीकरण त्यांना ऐकता येईल. तसेच त्यांच्या ज्या चांगल्या सूचना असतील त्या स्वीकारण्याची भूमिका देखील राज्य शासनाकडून घेतली जाईल. आपले राज्य उद्योगाच्या बाबतीत प्रगतीपथावर आहे. देशाच्या पातळीवर इकॉनॉमिकल सर्व्हेचे काम एनजीओज किंवा तज्ज्ञांच्या माध्यमातून केले असता त्यात आपले राज्य अग्रभागी असल्याचे आढळून आले. त्यानुसार एकंदरित एफडीआयचा विचार केला तर आपल्या राज्यात 27667 मिलियन डॉलर्सची गुंतवणूक होत आहे. इतर राज्यांचा विचार करता ती फक्त 2 ते 3 हजार मिलियन डॉलर्स एवढीच आहे. देशाचा विचार करता आपल्या राज्याचा देशाच्या औद्योगिक विकासातील

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ........

वाटा आणि रोजगार मिळवून देण्यातील वाटा 35 टक्क्यापर्यंत गेला आहे. हाच वाटा इतर राज्यांच्या बाबतीत पाहिले तर गुजरात 6 टक्के, तामिळनाडू 5 टक्के, आंध्र प्रदेश 5 ते 6 टक्क्यापर्यंत एवढाच हिस्सा आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ....

सभापती महोदय, महाराष्ट्राने वेगवेगळया क्षेत्रात क्रांती केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये आपण इंडस्ट्रीलायझेशनचा बेस तयार करीत असतांना आपण केवळ एका इंडस्ट्रीला आकर्षित करण्याची भूमिका घेतली नाही. आपल्या राज्याला चांगली बागायती जमीन तसेच मोठा समुद्र किनारा मिळाला असल्यामुळे आपल्याला पोर्ट बेस इंडस्ट्री करता आली. मुंबई शहर हे इकॉनामीक बेसचे शहर आहे त्यामुळे गुंतवणूकदार आकर्षित होऊ शकले. महाराष्ट्र शासनाने उद्योगाच्या संदर्भात पहिल्या पासूनच चांगल्या प्रकारची भूमिका घेतलेली आहे. एमआयडीसीची स्थापना करीत असतांना मल्टीपर्पज इंडस्ट्रीला आकर्षित करण्याचे काम आपण करु शकलो. मला सांगण्यास आनंद होतो आहे की, महाराष्ट्राकडे केवळ पर्टीक्युलर इंडस्ट्री आकर्षित झालेली नाही तर वेगवेगळया इंडस्ट्रीज आपल्याकडे आलेल्या आहेत. केमिकल इंडस्ट्री झोनच्या माध्यमातून, बायो केमिकलच्या माध्यमातून किंवा ऑटो क्लस्टर हब म्हणून या राज्याला मोठा लौकिक मिळालेला आहे. पुढील भविष्य काळात महाराष्ट्रामध्ये ऑटो क्लस्टरच्या माध्यमातून चालना मिळण्याचा प्रयत्न होत आहे. दोन तीन वर्षामध्ये आपण इमेज क्रिएट करण्याचे काम करु शकलो म्हणूनच फॉरेन डायरेक्ट इनव्हेस्टमेंटला आपण मोठया प्रमाणात आकर्षित करु शकलो. सुरुवातीच्या काळात फॉरेन डायरेक्ट इनव्हेस्टमेंटला आपण आकर्षित करु शकत नव्हतो परंतु ते सुध्दा काम आपण यशस्वीपणे पार पडलेले आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाला मा. मंत्री महोदय चांगल्या प्रकारे उत्तर देत आहेत. विरोधी पक्षाने या ठिकाणी तर्क नसलेले मुद्दे उपस्थित केले असतील तर त्याकडे न जाता गेल्या 30-40 वर्षापासून आपल्या राज्यात जे प्रस्थापित उद्योग आलेले आहेत त्या प्रस्थापित उद्योगांचा विस्तार होत असतांना त्यांना आवश्यक असलेल्या गरजा पुरविण्याकडे महाराष्ट्र शासनाचा काय दृष्टिकोन आहे तसेच एमआयडीसीच्या बाबतीत आपल्याला जो अनुभव येतो आहे त्यामध्ये थोडी सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन जे उद्योग आज आपल्याकडे आहेत त्यांचा विस्तार करतांना त्यांना अधिक सवलती दिल्या पाहिजेत अशा पध्दतीची माहिती मा.मंत्रीमहोदयांकडून आम्हाला अपेक्षित आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, जनरल मोटर्स कंपनी आपल्या राज्यात आली असून त्यांनी 757 कोटी रुपयांची इन्व्हेस्टमेंट केलेली आहे. कॅटर पिलर कंपनीने 750 कोटी रुपयांची इन्व्हेस्टमेंट आपल्या राज्यात केलेली आहे. पॉर्निंग कंपनीने 528 कोटी रुपयांची तसेच भारत डायनामिक तसेच पॉस्को कंपनीने 6305 कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये केलेली आहे. फिन्ले कंपनीने सुध्दा आपल्या राज्यात मोठी गुंतवणूक केलेली आहे. मागासलेल्या भागामध्ये सुध्दा आपण उद्योगांना आकर्षित केलेले आहे. उद्योगाला आपण केवळ आकर्षित करण्याचेच काम केले नाही तर तुमच्या असलेल्या उद्योगाची कक्षा वाढावी यासाठी शासन तुमच्या पाठीशी आहे वेळ प्रसंगी जमीन देण्यासाठी तयार आहोत तसेच आम्ही पूर्वी ज्या काही सवलती मान्य केल्या होत्या त्या सवलती वाढवून देण्याचा प्रयत्न करीत आहोत. महिन्द्र अँड महिन्द्र कंपनी आपला एक्सपान्शन प्लाँट इतर राज्यात घेऊन जाणार होती त्यांनी आता तो प्लाँट चाकणमध्ये सुरु केलेला आहे. स्कोडा कंपनीने शेंद्रा व औरंगाबाद एमआयडीसीमध्ये प्लांट एक्सपान्शनची मागणी केलेली आहे. काळ आणि वेळ बदलत चालला असल्यामुळे आपल्याला उद्योगांना तशी सर्व्हीस देखील बदलून द्यावी लागणार आहे.

या चर्चेच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की, काही मंडळी इतर राज्यांशी कळत न कळत तुलना करण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु त्यांच्यामध्ये व आपल्यामध्ये काय फरक आहे याचा जेव्हा आपण बारकाईने विचार करतो तेव्हा एक गोष्ट लक्षात येते की, इतर राज्यांनी उद्योगांना सवलती देण्याची आज काही घोषणा केलेली आहेत परंतु आपण या गोष्टी 25-30 वर्षापूर्वीच उद्योगांना दिलेल्या आहेत. त्यांच्याकडे औद्योगिक पट्टा कोठेच तयार होत नाही म्हणून ते बेस तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यामुळे थोडे अॅट्रॅक्शन निर्माण करण्याचा इतर राज्य प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्रातील एमआयडीसी व महाराष्ट्रातील औद्योगिक धोरणामध्ये एकाच ठिकाणी उद्योगांना सर्व सुविधा देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर....

ज्या सुविधा आपण देण्याचा प्रयत्न करतो तशा प्रकारच्या सुविधा अन्य एक-दोन राज्यामध्ये देण्याबाबतची भूमिका स्वीकारुन त्यामध्ये सारखेपणा आणण्याचा प्रयत्न केला. या पूर्वीच्या काळात नवीन इंडस्ट्री निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेली जमीन देण्याची आपली तयारी होती. तशाप्रकारे आपण एकाच ठिकाणी वीज, पाणी व बाकीचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार करुन एम.आय.डी.सी. च्या माध्यमातून लोकांना प्रोत्साहन देऊन त्या ठिकाणी इंडस्ट्रीयल ग्रोथ तयार करण्याचा प्रयत्न करीत आहोत. इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यामध्ये जिल्हा पातळीवर किंवा विभागीय पातळीवर एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून झालेले औद्योगिकीकरण आपल्याला पहावयास मिळत आहे. त्या करिता जिल्हा स्तरावर आणि तालुका स्तरावर एम.आय.डी.सी. स्थापन करुन औद्योगिक प्रगती करण्याची भूमिका शासनाने घेतली आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, विरोधासाठी विरोध करुन काही गोष्टींची कळत न कळत आपण चर्चा करतो. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपल्या भाषणामध्ये त्यासंबंधी उल्लेख केला. आपल्या राज्यात नवीन इंडस्ट्री आली पाहिजे, सेझच्या माध्यमातून औद्योगिक क्रांती झाली पाहिजे असे आपण एका बाजूला म्हणतो आणि दुसऱ्या बाजूला सेझला विरोध करण्यासाठी काहीही करण्याची तयारी ठेवून सेझ होऊ देणार नाही अशी विरोधी भूमिका घेतो. अशाप्रकारे औद्योगिक विकास थांबविण्याची भूमिका घेतल्यामुळे आपण इंडस्ट्रीयल बेल्टमध्ये प्रगती न करता मागे जात आहोत ही वस्तुस्थिती आपण नाकारु शकणार नाही. जोपर्यन्त स्थानिक स्तरावर पोलिटिकल विल, लिडरशीप तयार होत नाही, लोकांमध्ये मानसिकता तयार होत नाही तोपर्यन्त आपल्याला शेतीला पर्याय सापडणार नाही. शेती असली पाहिजे याबद्दल दुमत नाही. आपली पुढील पिढी ही शेतीवर अवलंबून राहील ही मानसिकता बदलून शेतीला पर्यायी साधन स्वीकारले पाहिजे. ज्या प्रकारे जगामध्ये शेती पिकविली जाते त्या प्रकारे आपल्या राज्यामध्ये शेती करण्यासाठी अनुकूल परिस्थिती नसेल, डोंगरी भाग असेल त्यावेळी त्या ठिकाणी इंडस्ट्रीअल बेल्ट तयार करण्यासाठी लोकांनी पुढाकार घेण्याची भूमिका स्वीकारली तर मोठया प्रमाणात आपल्या राज्यामध्ये उद्योग आणण्यामध्ये आपण यशस्वी होऊ शकतो.

सभापती महोदय, मला सांगण्यास आनंद होत आहे की, एक काळ असा होता की, आमच्याकडे एम.आय.डी.सी. नको असे म्हणणारे लोकप्रतिनिधी आज आमच्याकडे एम.आय.डी.सी. ची मागणी करण्यासाठी येतांना पहावयास मिळत आहेत. पूर्वी आम्ही चुकलो असलो तरी आता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

आमच्या भागामध्ये एम.आय.डी.सी. निर्माण करा त्यासाठी लागेल तेवढी जमीन आम्ही तुम्हाला देण्यास तयार आहोत अशी तरुण लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे. सभापती महोदय, आपण मागील इतिहास चाळून पाहिला तर त्या काळात एम.आय.डी.सी. साठी जमीन मिळविणे कठीण होते. अशा परिस्थितीत आपल्या राज्याच्या नेतृत्वाने विकासाची मानसिकता बाळगून आवश्यक लागणारी जमीन मिळविण्याचा प्रयत्न केला. आज राज्यामध्ये प्रतिकूल पर्जन्यमानाच्या परिस्थितीमुळे पाण्याचा आणि त्याचबरोबर सिंचनाचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. भविष्यामध्ये अशाच प्रकारच्या परिस्थितीला आपल्याला सामोरे जावे लागणार आहे. याचे कारण शेवटी निसर्गाच्या लहरीवर आपल्याला अवलंबून रहावे लागणार आहे. नवीन एम.आय.डी.सी. निर्माण करण्याकरिता लोकांना धाक दाखवून त्यांच्याकडून जमिनी ताब्यात घेण्याचे ठरविले तर लोकांच्या आंदोलनांना तोंड द्यावे लागते. या करिता शासनाने मागील दोन वर्षाच्या काळात आपल्या मानसिकतेमध्ये बदल करुन राज्यामध्ये इंडस्ट्रीयल बेल्ट तयार करण्यासाठी जो कुणी शासनाला जमीन देण्यास तयार असेल त्याच्याबरोबर by means of negotiation and by means of transparency ठेवून वेळप्रसंगी बाजार भावापेक्षा एक रुपया जास्त द्यावा लागला तरी चालेल अशाप्रकारची भूमिका स्वीकारुन एम.आय.डी.सी. निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, एम.आय.डी.सी. निर्माण करण्याकरिता आपला औद्योगिक चेहरा लोकांसमोर दाखवून चालणार नाही तर त्यामधून रोजगाराचा आणि मनुष्यबळाचा चेहरा घेऊन आपल्याला लोकांसमोर जावे लागेल. हीच भूमिका यापुढील काळात एम.आय.डी.सी. निर्मितीबाबत घेतली जाणार आहे. अशाप्रकारे इंडस्ट्रीयल बेल्ट तयार करीत असतांना त्यामध्ये स्थानिकांना रोजगार कसा उपलब्ध करुन देता येईल हे पाहिले जाईल. त्याबाबत माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी आपल्या भाषणामध्ये उल्लेख केला. सभापती महोदय, नवीन औद्योगिक धोरणामध्ये स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत आमच्या उद्योग विभागातर्फे एक जी.आर. काढला म्हणजे आमचे काम संपले अशातला भाग नाही. परंतु नवीन निर्माण होणाऱ्या इंडस्ट्रीमध्ये स्थानिक लोकांना कोणत्या प्रकारचा रोजगार उपलब्ध होणार आहे यासंबंधीची आगाऊ माहिती आपण त्यांना देत नाही किंबहुना त्यांच्या हातामध्ये तशाप्रकारची कारीगिरी आपण तयार करीत नाही,

(यानंतर श्री.भारवि)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर...

तो पर्यंत स्थानिकांना नोकरी देण्याची सरकारची इच्छा असली तरी त्यांना तेथे नोकरी लागताना दिसत नाही. म्हणूनच आता आम्ही नवीन भूमिका घेतली आहे. पुढच्या काळामध्ये जेथे जेथे एमआयडीसी करणार आहोत त्याला लागूनच आपण औद्योगिक प्रशिक्षण देणाऱ्या आय.टी.आय.च्या धर्तीवर नवीन संस्था स्थापन करणार आहोत. आताचे आय.टी.आय.मधील ट्रेड हे कालबाह्य झाले आहेत, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. त्यामुळे नवीन एमआयडीसीच्या परिसरातच अशा संस्था तयार करण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. यामध्ये एमआयडीसीमध्ये भविष्यकाळामध्ये येणारे जे उद्योग आहेत त्यांच्याकडूनच त्यांचा एक अधिकारी डेप्युट करून त्या उद्योगाला आवश्यक असणारा ट्रेड तेथे शिकवला जाईल. त्यामुळे त्यांना आवश्यक असलेला कामगार तेथेच मिळू शकेल. जो पर्यंत तो उद्योग चालू असेल तो पर्यंत ते प्रशिक्षण केंद्र, ती संस्था सुरू राहील. अशा संस्थांमधून स्थानिक उमेदवारांना प्रशिक्षित करून त्याच एमआयडीसीमध्ये रोजगार देण्याची संकल्पना उद्योग विभागातून राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. जेणे करून स्थानिक स्तरावरच तरूण बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एलएसी कशी होते ते सांगितले. एलएसीसारख्या किरकोळ गोष्टीमध्ये जाण्या पेक्षा औद्योगिकदृष्ट्या काही चांगले धोरण मांडण्याबाबत मार्गदर्शन केले असते तर अजून चांगली गोष्ट झाली असती. त्या प्रश्नाला स्पर्श करणे गरजेचे आहे असे मला वाटते. त्यांनी असे सांगितले की, नॅनो, फोर्ड सारख्या कंपन्या राज्या बाहेर गेल्या. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. उद्योजकांना आपण सवलतीच्या दराने उद्योग काढण्यास अनुमती देतो. त्यामुळे टॅक्टफुल डिल्स करणे गरजेचे आहे. काही उद्योग आम्हाला एवढी सवलत द्यावी तरच उद्योग काढू नाही तर मग इतर राज्यांकडे जातो असे सांगतात. आम्हाला त्यांना दाखवून द्यायचे आहे की, आम्ही आमच्या अटी व शर्तीप्रमाणे उद्योग राज्यामध्ये आणू इच्छितो. त्यानुसार आम्ही येथे रोजगार निर्माण करण्याची भूमिका घेऊ शकतो. निव्वळ उद्योजक सांगतो म्हणून त्यांना सवलत देण्याची भूमिका घेतली तर ते चुकीचे ठरेल. इतकेच कशाला यामुळे या अगोदर ज्या उद्योगांना आपण सवलत दिली आहे त्यांच्यावर अन्याय करण्या सारखे होईल. नॅनो किंवा फोर्ड सारख्या

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर...

कंपन्या इतर राज्यात गेल्या असल्या तरी माझे अगदी स्पष्ट मत आहे की, आपल्याकडे औद्योगिक दृष्टया आकर्षित होणारे जे उद्योग आहेत त्यांच्या तुलनेत हे फार नॅनो आहेत. त्याकडे जास्त लक्ष देण्याची आवश्यकता नाही.

आज चायना बेस असलेली फुटॉन्स कंपनी महाराष्ट्र येऊ पहात आहे. सदर कंपनी राजकीय कारणामुळे भारतामध्ये कधीही निवेश करण्यासाठी इच्छूक नव्हती. त्यांनी भारतात चांगले पिसफुल सेक्टर कुठले आहे याचा अभ्यास करून महाराष्ट्राची निवड केली आहे. येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकत नाही, चांगले मनुष्यबळ मिळू शकते या सर्व बाबींचा विचार करून महाराष्ट्राची निवड केली आहे. त्यामुळे चायना बेस असलेली फुटॉन्स कंपनी महाराष्ट्रामध्ये गुंतवणूक करीत आहे. याचाच अर्थ असा आहे की, या राज्याने उद्योगाला पोषक असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. जो पर्यंत आपला सकारात्मक दृष्टीकोन लोकांसमोर नेत नाही तो पर्यंत अशाच गोष्टी होत राहतील.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचा दौरा दुबई पर्यंत असतो. माझी त्यांना विनंती राहील की, त्यांनी दुबईला न जाता आमच्याही कार्यालयाला भेट द्यावी. राज्यामध्ये कोणते उद्योग येणार आहेत यासंबंधी आमच्याशी चर्चा करावी. त्यांची निराशा होणार नाही याची काळजी निश्चितपणे घेण्यात येईल.

माननीय विरोधी पक्ष नेते यांनी डीआयएमसीचा उल्लेख केला आहे. देशाच्या स्तरावर महत्वाकांक्षी योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. मला सांगायला आनंद होतो की, 150 कि.मी.लांबीची रेल्वे लाईन आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी यशस्वी झालो आहोत. त्याचे शेवटचे गंतव्यस्थान जेएनपीटी होते. आता आपण तो मार्ग तेथ पर्यंतच मर्यादित न ठेवता त्याचे गंतव्यस्थान औरंगाबाद, शेंद्रापर्यंत करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. यामध्ये देखील आम्ही निश्चितपणे यशस्वी होऊ.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर . . . .

हा इंडस्ट्रीअल बेल्ट सर्वात जास्त कोणत्या कि.मी.मध्ये येणार असेल तर ते महाराष्ट्र राज्य आहे आणि येथे रेल्वेच्या माध्यमातून डायरेक्ट नऊ लाईन्स् तयार होणार आहेत. तसेच यावर फक्त माल वाहतूक करणाऱ्या गाड्याच धावू शकतात आणि दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीअल कॉरिडॉर म्हणून जेथे-जेथे रेल्वे लाईन असेल, रेल्वे स्टेशन नव्हे, त्याच्या 50 कि.मी. ईस्ट असेल किंवा 50 कि.मी.वेस्ट असेल किंवा त्याही पेक्षा त्याच्या 150 कि.मी.पर्यंत इंडस्ट्रीयलायझेशन साठी बेस तयार करता येईल. तसेच तेथील स्थानिक लोकांना रोजगार देण्याच्या दृष्टीकोनातून हा कॉरिडॉर तयार करण्याची महत्वाकांक्षी योजना केंद्र शासनाच्या मदतीने आपण घेण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, ज्यांनी जपान सारख्या देशाबरोबर एकत्रितपणे त्यांचे जे काही इकॉनॉमिकली स्टॅटीस्टीक्स असतात, मग ती मित्सुबिशी कंपनी असेल किंवा तोशिबा असेल त्यांच्याशी कन्सोलेट करणारी एक मोठया प्रमाणात स्मार्ट सिटीची योजना आपल्याकडे करण्याचे ठरविले. ही योजना देशामध्ये कुठे करावयाची असा जेव्हा त्यांना प्रश्न पडला तेव्हा आपण त्यांना आकर्षित करण्यासाठी अंग्स् आणि यंग्स् या कंपनीला हायर करण्याचे काम केले आणि या राज्याने उद्योगामध्ये कशी प्रगती केली आहे याचे आपण प्रोजेक्शन केले.ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी केला. आपण त्यांना आकर्षित करण्यामध्ये यशस्वी झालो. आज जपान देशाबरोबर औद्योगिक दृष्टीकोनातून पहिली एन्व्हायरनमेंट फ्रेंडली स्मार्ट सिटी कुठे होणार असेल तर ती औरंगाबाद मध्ये यशस्वीपणे होताना पाहिलेली आहे.विदर्भासाठी नॅशनल मॅन्युफॅक्चरींग इंडस्ट्रीअल झ ाोनकरिता नागपूर जवळ 6 हजार हेक्टर जमिनीवर हा महत्वाकांक्षी प्रकल्प घेण्याची भूमिका घेऊन जो मागासलेला भाग आहे,त्यांनाही न्याय देण्याची भूमिका घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.त्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उल्लेख केला. तेथील मागासलेल्या भागामध्ये जास्तीतजास्त उद्योगधंदे कसे आले पाहिजेत यासाठी सुध्दा इंडस्ट्रीच्या बाबतीत नवीन पॉलिसी येणार आहे, त्यामध्ये छोटे-छोटे लघु उद्योग आहेत. याबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे साहेबांनी उल्लेख केला की, माटुंगा लेबर कॅम्पमधून कोणीतरी इंडस्ट्रीसाठी प्लॉटची मागणी करीत आहे. मला असे वाटते की, आपण त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. कारण छोट्या घरामध्ये रहाणारा माणूस सुध्दा जर इंडस्ट्रीयलायझेशन साठी पुढे येत असेल तर मला असे वाटते की, त्याचे स्वागत केले पाहिजे. म्हणून नवीन पॉलिसीमध्ये देखील स्मॉल स्केल इंडस्ट्रीला कशी चालना देता येईल, याचाही विचार आपण केला आहे. मोठमोठ्या ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर . . . .

उद्योगांना बँकींगव्दारे किंवा इतर सेक्टरव्दारे ॲक्ट्रॅक्ट करण्यात येत असेल तर मला असे वाटते की,त्याचे स्वागत केले पाहिजे. म्हणून नवीन पॉलिसीमध्ये देखील स्मॉल स्केल इंडस्ट्रीला कशी चालना देता येईल, मोठमोठ्या उद्योगांकडे बँकींगव्दारे किंवा इतर सेक्टरव्दारे त्यांना ॲक्ट्रॅक्ट केल्याने संबंधितांना रोजगार मिळत आहे. पुढच्या काळामध्ये इंडस्ट्रीअल पॉलिसी करीत असताना छोट्या उद्योगांना प्राधान्य देण्याची भूमिका आपण घेणार आहोत आणि त्यातून त्याना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, मी 2-3 गोर्ष्टीबाबत सांगू इच्छितो.याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही आरोप केले, काही बाबतीत खुलासा मागण्याचा प्रयत्न केलेला आहे.मी माझ्या संबंधित कार्यालयाला सांगितले आहे की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या भाषणाचा इतिवृतांत मागवून घेण्यात यावा.माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे भाषण केलेले आहे किवा त्यांनी ज्या काही शंका व्यक्त केल्या आहेत. त्याचे निरसन निश्चितपणे केले जाईल. त्यासाठी वेळप्रसंगी स्वत: त्यांच्याशी बोलून किंवा पत्राव्दारे निरसन करण्याची आमची तयारी आहे असे मी या चर्चेच्या माध्यमातून सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उल्लेख केला की, आपल्याकडे बंदरे आहेत. पण जगाच्या इतिहासात इंटरनॅशनल सिटी म्हणून डिग्गी पोर्ट निर्माण करण्याचे काम आज एम.आय.डी.सी. किंवा उद्योग विभागाच्या माध्यमातून आणि इतर विभागाच्या माध्यमातून करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून पारदर्शकता यावी याकरता आजही मी आपल्याला सांगू इच्छितो की, एल.ए.सी.प्रक्रिया करीत असताना, संपूर्ण देशात एक नंबरची एल.ए.सी. प्रक्रिया ही एम.आय.डी.सी.ची आहे. तुम्ही एकदा ऑन लाईन अर्ज केला तर तुम्हाला ताबडतोब फिड बॅक करुन उत्तर देण्यात येत आहे. मी यानिमित्ताने सांगू इच्छितो की, कोणीही अर्ज करा आणि तो केल्यानंतर किमान तुमचा अर्ज स्वीकारलेला आहे की नाही किंवा तो पेंडींग आहे काय याबाबतचे उत्तर ताबडतोब देण्याची आमची भूमिका आहे. जेणेकरुन औद्योगिक दृष्टीकोनातून काम करताना टेबलावर हात ठेवण्याची किंवा टेबलाखाली हात ठेवण्याची गरज भासणार नाही अशी राज्य शासनाची भूमिका आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

काही गोष्टी कळत नकळत होत असतात. या ठिकाणी काही गोष्टींचा उल्लेख करीत असताना माननीय मंत्री महोदयांबद्दल सुध्दा सांगण्यात आले. एलएसीच्या झालेल्या गोष्टी तसेच मंत्रालयात फाईल का येतात असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. एका बाजूला विरोधी पक्ष नेते सांगतात की, अधिकारी ऐकत नाहीत त्यामुळे अशा ज्या गोष्टी कळत नकळत घडतात त्या बाबी योग्य आहेत की अयोग्य आहेत हे बघण्यासाठी मंत्री महोदयांना जर फाईल मागवून घ्यावयाची असेल तर तो अधिकार शासन म्हणून आमचा आहे. एखादी फाईल मंत्रालयात मागवून घेतली याचा जर कोणी वेगळा अर्थ काढण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांना जी माहिती मिळाली आहे ती अयोग्य आहे एवढेच या निमित्ताने सांगेन. आमची जी प्रक्रिया आहे ती आणखी पारदर्शक व्हावयास पाहिजे यासाठी सुध्दा काही सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचाही स्वीकार करण्याचा आम्ही प्रयत्न करु. सन्माननीय सदस्यांनी चर्चेच्या ओघामध्ये ज्या काही चांगल्या सूचना केल्या असतील त्याचे निश्चितपणे स्वागत करु. परंतु जे सन्माननीय सदस्य केवळ आरोपासाठी आरोप करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, राजकारणामध्ये किंबहुना सामाजिक दृष्टीकोनातून काम करीत असताना शेवटी राज्य महत्वाचे असते. आपण काय बोलतो आणि लोक काय ऐकत आहेत याचे भान ठेऊनच चर्चेमध्ये आरोप करण्याची भूमिका घ्यावी एवढेच या प्रसंगी बोलून मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**उप सभापती** : आज कोणतीही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येणार नाही.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी.** : उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार

**मु.शी.** : उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार या विषयावर सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, भगवानराव साळुंखे, सय्यद पाशा पटेल आणि नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे चालू )

श्री. राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने सिंचन विभागाशी संबंधित जी चर्चा झाली त्या संदर्भामध्ये उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, जयंत प्र. पाटील, प्रा. सुरेश नवले, श्री. संदीप बाजोरिया, श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी भाग घेतला आणि सिंचन विभागाशी संबंधित विषयाच्या संदर्भात चर्चा केली. या चर्चेच्या निमित्ताने आमच्या विभागाशी संबंधित ज्या बाबी होत्या त्याबद्दल चर्चा करीत असताना विरोधी पक्षाचे नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी विविध मुद्दे मांडण्याचा प्रयत्न केला. ते मुद्दे मांडत असताना त्यांनी अनेक विषयाच्या संदर्भात आरोप करण्याचाही प्रयत्न केला. मला अपेक्षा होती की, किमान उत्तराच्या वेळी विरोधी पक्षाचे नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहावयास पाहिजे. ज्या आरोपांमध्ये काही तथ्यच नाही असे आरोप करावयाचे आणि आरोप केल्यानंतर उत्तर ऐकण्याची क्षमता ठेवावयाची नाही अशा प्रकारची स्थिती किमान आज शेवटच्या दिवशी विरोधी पक्ष नेत्यांच्या आणि इतर सदस्यांच्या माध्यमातून अभिप्रेत नव्हती.

सभापती महोदय, सिंचन विभागाने मागील अनेक वर्षांमध्ये या राज्यामध्ये अत्यंत चांगली कामगिरी केलेली आहे. आपण मागची परिस्थिती लक्षात घेतली तर 1951 पर्यंत 16.60 कोटी

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजेंद्र मुळक .....

रुपयांची गुंतवणूक केलेली होती. त्या माध्यमातून 2.74 लक्ष हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण केली होती. 1960 मध्ये जेव्हा आपल्या राज्याची स्थापना झाली त्यावेळी 3.86 लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण केली होती आणि 289 द.ल.घ.मी. पाण्याचा साठा निर्माण केला. म्हणजे साधारणत: 10 टीएमसी पाण्याचा साठा त्या काळामध्ये निर्माण केला होता. त्यानंतरच्या काळामध्ये दरवर्षी त्यामध्ये वाढ होत गेली. ती वाढ होत असताना राज्याचा निधी असो किंवा केंद्राचा निधी असो, त्या सर्व निधीचा वापर करुन आपण जास्तीत जास्त पाण्याचा साठा निर्माण करण्याचे काम केले त्याचबरोबर सिंचनाच्या क्षेत्रामध्येही वाढ करण्याचा प्रयत्न केला. 1951 मध्ये आणि 1960 मध्ये जी सुरुवात केली त्याबाबत मी सांगितले त्यानंतर मार्च, 2012 पर्यंत आपण या क्षेत्रामध्ये साधारणत 73 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. जून, 2011 पर्यंत 48.25 लक्ष हेक्टर सिंचन क्षमता म्हणजे लागवडीलायक क्षेत्राच्या 21.44 टक्के सिंचन क्षमता निर्माण केली आणि 33,385 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण केला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

सभापती महोदय, 1960 साली पाण्याची साठवण क्षमता केवळ 10 टीएमसी इतकी होती. त्या तुलनेमध्ये सन 2011 च्या अखेर 1180 टीएमसी पाण्याचा साठा करु शकलो. मागील 51 वर्षात सिंचन क्षमता 12 पटीने तर सिंचन क्षमता 115 पटीने वाढलेली आहे.

सभापती महोदय, सिंचन क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी शासनाने 1996 ते 1998 या काळामध्ये वेगवेगळया विभागांसाठी पाच सिंचन विकास महामंडळांची निर्मिती केली. या पाचही सिंचन विकास महामंडळांनी राज्यामध्ये एकूण 775 सिंचन प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. या प्रकल्पांमधून 14,403 द.ल.घ.मी.पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे. या महामंडळांच्या माध्यमातून साधारणत: 509 टीएमसी पाणी साठा निर्माण केला आहे. त्यामुळे 12.81 लक्ष हेक्टरसाठी सिंचन क्षमता निर्माण केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागील 4-5 वर्षांमध्ये राज्यात केवळ 1 टक्का सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे असे सांगितले. परंतु ही वस्तुस्थिती नसून राज्यातील सिंचन क्षमतेमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. त्याच प्रमाणे या महामंडळांच्या माध्यमातून सन 2008-2009 ते 2010 ते 2011 या कालखंडामध्ये 184 घळ भरणीचे प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत. त्यातून 2797 द.ल.घ.मी.पाणी साठवण क्षमता निर्माण केली आहे. त्यामुळे साधारणत: 100 टीएमसी पाण्याचा साठा निर्माण केलेला आहे. या माध्यमातून 3.40 लक्ष हेक्टर सिंचन क्षमता या कालावधीत निर्माण केलेली आहे.

सभापती महोदय, मागील 10 वर्षात निर्मित सिंचन क्षमता व सिंचित क्षेत्राबाबत सभागृहाला माहिती देऊ इच्छितो. सन 2001-02 या वर्षात निर्मित सिंचन क्षमता 37.59 लक्ष हेक्टर इतकी होती व सिंचित क्षेत्र 17.8 लक्ष हेक्टर होते. सिंचित क्षेत्राच्या निर्मित सिंचन क्षमतेच्या टक्केवारीमध्ये सांगावयाचे झाल्यास या वर्षामध्ये 45.32 टक्के वाढ झालेली आहे. मागील 10 वर्षांची तुलना केली तर निर्मित सिंचन क्षमता 47.37 लक्ष हेक्टर निर्माण झाली होती. सिंचित क्षेत्र 49.55 लक्ष हेक्टर निर्माण झालेले आहे. याबाबतची टक्केवारी लक्षात घेतली तर ती 62.38 टक्के इतकी होते. सन 2006-07 ते 2010-2011 पर्यंत निर्मित सिंचन क्षमतेचा वापर 60 टक्क्यापेक्षा जास्त ठेवण्यामध्ये शासनाला यश प्राप्त झालेले आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.राजेंद्र मुळक....

सभापती महोदय, या राज्यात एआयबीपीचा कार्यक्रम राबविण्याचे काम विभागाने केलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

सभापती महोदय, एआयबीपी कार्यक्रम आपल्या राज्यामध्ये सुरु झाला. हा कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्यासाठी केन्द्र शासनाच्या माध्यमातून अनेक राज्यांना निधी मिळत असतो. या कार्यक्रमासाठी जास्तीचा निधी मिळविणारे महाराष्ट्र हे देशामध्ये एकमेव राज्य आहे. या कार्यक्रमांतर्गत आपण 1996-97 ते 2011-12 पर्यन्त 16309 कोटीची मागणी केली होती त्यापैकी आतापर्यन्त 10050 कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. या प्राप्त अनुदानातून अनेक प्रकल्प पूर्ण करण्याचे काम केलेले आहे. जे प्रकल्प निधी अभावी रखडलेले होते तेही प्रकल्प या एआयबीपी कार्यक्रमाअंतर्गत पूर्ण केलेले आहेत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सदस्यांनी या प्रस्तावावर बोलताना गोसीखुर्द आणि जीगाव प्रकल्पाचा उल्लेख केला आणि प्रकल्पाच्या कामामध्ये, पुनर्वसनाच्या कामामध्ये अनियमितता झालेली आहे असे सांगितले. मी सांगू इच्छितो की, गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामासंबंधी शासनाने वडनेरे समिती नियुक्त केली होती. त्या समितीने गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामाचा अभ्यास केला आणि त्याचा अहवाल मागच्या अधिवेशनामध्ये सभागृहासमोर ठेवला. त्या अहवालामध्ये वडनेरे समितीने ज्या सूचना केल्या होत्या त्याचे काटेकोरपणे पालन विभागाच्या माध्यमातून केलेले आहे. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित झालेला आहे. त्या प्रकल्पामध्ये पाणी साठविण्याचे काम देखील केलेले आहे. या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या गावांच्या पुनर्वसनाचे काम, त्यांना सोईसुविधा, नागरी सुविधा देण्याचे काम विभागाच्या माध्यमातून केलेले आहे. प्रकल्पग्रस्तांना घराच्या संदर्भात असो, पुनर्वसनाच्या संदर्भात असो, वाढीव अनुदान ज्यांच्या ज्यांच्या जमिनी या प्रकल्पासाठी संपादित केलेल्या आहेत त्या सर्वांना देण्याच्या बाबतीत शासन निश्चितपणे निर्णय घेणार आहे.गोसीखुर्द प्रकल्प हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित झाल्यानंतर त्या प्रकल्पासाठी अनुदान प्राप्त होत आहे. या प्रकल्पामुळे अडीच लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. चंद्रपूर आणि भंडारा जिल्ह्यामध्ये सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी जीगाव प्रकल्पाच्या बाबतीत काही मुद्दे उपस्थित केले. प्रकल्पाच्या कामाची किंमत वाढली, अनियमितता झाली असे त्यांनी सांगितले. कोणत्याही स्वरुपाचा अभ्यास न करता, त्या जीगाव प्रकल्पाला कधी भेट न देता केवळ काहीतरी कागदपत्रे हातात

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक....

घेऊन सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम कसे केले जाते हे मला या निमित्ताने पहायला मिळाले. जीगाव प्रकल्पाबाबत, गोसीखुर्द प्रकल्पाबाबत शासनाने वडनेरे समिती नेमली होती. विदर्भातील सर्व कामाचा अहवाल वेळेअभावी मी टेबल करणार आहे. कुठे दरसूचीमध्ये बदल झाला, ...

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक ....

अमुक कामामध्ये अनियमितता झाली अशा प्रकारचा आरोप करणे हे बरोबर नाही. कोणत्याही प्रकारची कॉंक्रीट माहिती नसताना सभागृहाला विचलित करुन प्रकल्पाची कामे पूर्ण होऊ नयेत अशा प्रकारची भूमिका विरोधी पक्षाच्या मामध्यातून घेतली गेली. ए.आय.बी.पी.च्या संदर्भात सांगितले. इतरही प्रकल्पाच्या बाबतीत माहिती सांगितली.. दरसूची मध्ये वाढ होत असते, कधी कधी प्रकल्पांच्या किंमतीमध्ये देखील वाढ होते, अशी अनेक कारणे आहेत, ज्यामुळे कधी कधी प्रकल्पांची कॉस्ट एस्कलेट होते. माझ्या विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे मांडले, त्यात काही सकारात्मक मुद्दे मांडण्याचे काम सन्माननीय सदस्यांनी केले. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून या सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, राज्याचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण, राज्याचे उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, आमच्या विभागाकडून व अधिकारी वर्गाकडून येणाऱ्या काळात सिंचनाचे क्षेत्र कसे वाढेल, पाण्याचा साठा जास्तीत जास्त कसा निर्माण करु शकू, महाराष्ट्रातील शेती जास्तीत जास्त सिंचनाखाली कशी येऊ शकेल, यासंबंधी प्रामाणिक प्रयत्न निश्चितपणे आमच्या विभागाकडून केला जाईल, एवढी मी सभागृहाला ग्वाही देतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

---------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.** : वडनेरे समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2012 च्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनात विभागांच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना श्री.ल.ड.वडनेरे समितीचा गोसीखूर्द वगळून उर्वरित प्रकल्प अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे आश्वासित केले होते. त्याप्रमाणे गोसीखूर्द वगळून उर्वरित प्रकल्पासंबंधी अभिप्राय व शिफारशी व त्यावर शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो

**सभापती** : अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.

------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ प्रथम श्री.शिगम 17:40

पृ.शी.व मु.शी.: लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने " विदर्भातील दिग्रस तालुक्यातील अरुणावती धरणाचे सुमारे 24 संधानक पाण्याच्या विसर्गाने वाहून जाणे" या विषयावरील सर्वश्री रणजित पाटील व इतर वि.प.स. यांनी दिनांक 30 मार्च,2012 रोजी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षेवधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.**: लक्षवेधी सूचनेसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक 13 (क) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 305 या लक्षवेधी सूचनासंबधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 305 ही निवेदने छापावीत.)

----

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार

**मु.शी.** : उद्योग, पाटबंधारे व महसूल खात्यात असणारा भ्रष्टाचार

या विषयावर सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, भगवानराव साळुंखे, सय्यद पाशा पटेल आणि नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे चालू )

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, अतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे व सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी महसूल विभागाच्या अनुषंगाने दोन मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी महसूल विभागाच्या संदर्भात गेल्या 10-20 वर्षातील काही प्रकरणे आपणाकडे सादर केली आहेत, ती प्रकरणे माननीय मुख्यमंत्र्यांकडे चौकशीसाठी पाठवावीत, अशी विनंती त्यांनी आपणास केलेली आहे. या प्रकरणामध्ये महसूल विभागाशी जी प्रकरणे निगडीत असतील, त्या प्रकरणांची चौकशी निश्चितपणे केली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी महाराष्ट्र राज्यातील राजकीय व्यक्तींना, शासकीय अधिकाऱ्यांना महाराष्ट्रात एका पेक्षा जास्त फ्लॅट कोटयातून देण्यात आले आहेत, एका पेक्षा जास्त फ्लॅट देण्यात येऊ नयेत, व ज्यांनी एका फ्लॅटपेक्षा जास्त फ्लॅट घेतले असतील त्यांच्या विरुध्द कारवाई व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात..........

सभापती महोदय, महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड कलम 40 अन्वये गृहनिर्माणाकरिता जमीन उपलब्ध करुन दिली जाते. कलम 27 प्रमाणे लोकप्रतिनिधी किंवा अ वर्ग अधिकारी यांच्या गृहनिर्माणासाठी शासनाकडून जमीन उपलब्ध करुन दिली जाते. कलम 27 नुसार त्या संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये दुसरा फ्लॅट नसावा अशा प्रकारचा नियम आहे. या बाबत निश्चितपणे बदल करुन एकदा सवलतीच्या दरामध्ये जमीन मिळवून फ्लॅट घेतला असेल तर त्या व्यक्तीचा राज्यात दुसरीकडे फ्लॅट नसला पाहिजे अशा प्रकारची दुरुस्ती करण्याबाबत शासन निश्चितपणे विचार करेल हे सभागृहाला सांगतो. हे दोन विषय याठिकाणी चर्चेला घेण्यात आले होते एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करणे

श्री.अरुण गुजराथी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व माजी मा. विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी श्री.श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व माजी माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण" या विषयांवरील विशेष हक्क समितीचा अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहात सादर करतो.

हे करीत असताना समितीसमोर आलेल्या सर्व बाबी सखोल विचारात घेता श्री.पांडुरंग फुंडकर, माजी माननीय विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी 3 ऑक्टोबर, 2007 रोजी श्री.श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांच्याशी श्री.समाधान डाबेराव, जिल्हा परिषद सदस्य, बुलढाणा यांच्या जात प्रमाणपत्राबाबत केलेल्या भ्रमणदूरध्वनीची श्री.कर्वे यांनी दखल न घेऊन माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या संसदीय लोकशाही स्थानाला कमी लेखले असून त्यांचा अनादर केला आहे असे समितीचे मत आहे.

2) श्री.कर्वे यांच्या या कृतीमुळे माजी विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांचा तसेच सभागृहाचा विशेषाधिकार भंग व अवमान होत नसला तरी औचित्यभंगाचा मुद्दा निश्चितपणे उपस्थित होतो असे समितीचे मत आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी दूरध्वनीद्वारे माहिती विचारली असता अथवा चौकशी केल्यास यथोचित माहिती देण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचनांचा समावेश शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक 4 जून,2011 रोजीच्या परिपत्रकात करण्यासंदर्भात शासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी समिति शिफारस करीत आहे. जेणेकरुन याबाबत कुठलीही संदिग्धता राहणार नाही. तसेच श्री.श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..........

अमरावती यांच्या गैरवर्तणुकीसंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत आहे व या प्रकरणी पुढे कोणतीही कार्यवाही न करता हे प्रकरण येथेच संपविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

**सभापती :** "श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व माजी मा. विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी श्री.श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व माजी माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण" या विषयांवरील विशेष हक्क समितीचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आहे.

------

नंतर श्री.खर्चे..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री अरुण गुजराथी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की,

1. "श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायाच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा. हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तीमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण" आणि
2. श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "महाराज, माफ करा......!!" या पुस्तकातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण"

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधान परिषद नियम 178 (1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेबाबत**

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते तसेच विरोधी पक्षाचे अन्य सन्माननीय सदस्य मला थोड्या वेळापूर्वी भेटले होते. कालच्या कामकाज पत्रिकेत अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा दाखविली होती व त्यानुसार काल थोडी चर्चा सुध्दा झाली, उर्वरित चर्चा आज घेण्यात आली. पण आजच्या कामकाज पत्रिकेवरील कामकाज पाहिले तर दुपारी 2 वाजून 15 मिनिटांनी या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. अंतिम आठवडा प्रस्ताव हा प्राधान्याने विरोधी पक्षाचा प्रस्ताव असला तरी याचा अर्थ असा नाही की, त्यावर अन्य सदस्यांनी किंवा सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी बोलू नये. त्याप्रमाणे या प्रस्तावावर सत्तारुढ पक्षाच्या एका एका सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. तसेच या प्रस्तावावर आणखी काही सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडण्याची संधी मागितली पण एकूण कालावधी पाहता पीठासीन अधिकाऱ्यांना त्यांना वेळ देता आला नसावा त्यामुळे विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले. वास्तविक या चर्चेसाठी आज वेळ वाढविण्यात आला तरी देखील काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली नाही, त्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळाली असती तर बरे झाले असते. अशा प्रकारे सर्व सन्माननीय सदस्यांनी या संपूर्ण अधिवेशनात ज्या वातावरणात काम केले ते पाहता या सभासदांनाही त्यांचे विचार मांडण्याची संधी मिळायला हवी होती, यादृष्टीने त्यांच्या अडचणीची मी नोंद घेतली आहे.

आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविलेले शासकीय विधेयक आज घेता येणार नाही. आता आपण अशासकीय विधेयके (पुर:स्थापनार्थ) हे कामकाज घेऊ.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य सेवा हमी विधेयक.

**L. C. BILL NO. I OF 2012**

(A BILL TO PROVIDE TRANSPARENT EFFECTIVE AND TIMELY PUBLIC SERVICES TO THE CITIZENS IN THE STATE OF MAHARASHTRA AND TO REGULATE THE MATTERS INCIDENTAL THERETO.)

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 1-महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना पारदर्शक, प्रभावी तसेच उचित कालमर्यादेत शासकीय सेवांचा लाभ मिळावा व तदानुषंगिक बाबींचे विनियमन करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 1 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पोलीस विधेयक.

**L. C. BILL NO. III OF 2012**

(A BILL TO REGULATE AND ADMINISTER POLICE SERVICE OF THE STATE OF MAHARASHTRA AND FURTHER TO REPLACE THE BOMBAY POLICE ACT, 1951, IN ITS APPLICATION.)

श्री. विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 3-मुंबई पोलीस अधिनियम,1951 निरसित करुन त्याऐवजी महाराष्ट्र राज्यातील पोलीस सेवेचे नियमन व प्रशासन करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 3 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO. IV OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTA ACT, 1971.)

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 4- महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त अधिनियम,1971 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 4 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :प्रसवपूर्व निदानतंत्राच्या वापराचे विनियमन करण्याबाबत सुधारणा विधेयक.

**L. C. BILL NO. V OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGULATION OF USE OF PRE-NATAL DIAGNOSTIC TECHNIQUES ACT, 1988.)

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 5- महाराष्ट्र प्रसवपूर्व निदानतंत्राच्या वापराचे विनियमन करण्याबाबत अधिनियम, 1988 यात आणखी सुधारणा करण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 5 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भिषक व शल्यचिकित्सक (दिवाणी व फौजदारी खटल्यापासून मुक्त ठेवणे ) विधेयक.

**L. C. BILL NO. VI OF 2012**

(A BILL TO PROVIDE FOR A PROVISION TO ABSOLVE THE PHYSICIAN AND THE SURGEON FROM CIVIL AND CRIMINAL LAW-SUITS FOR STOPPING MEDICATION BEING ADMINISTERED TO KEEP ALIVE SUCH PERSONS AS ARE SUFFERING FROM TERMINAL DISEASES.)

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 6- मृत्यूपर्यवसायी आजाराने ग्रस्त असलेल्या माणसांना जीवंत ठेवण्यासाठी करावयाचे औषधोपचार बंद करण्याबद्दल भिषक व शल्यचिकित्सक यांना दिवाणी व फौजदारी खटल्यांपासून मुक्त ठेवण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 6 मांडते.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

..6..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सक्तीचे निर्बीजीकरण विधेयक.

**L. C. BILL NO. VIII OF 2012**

(A BILL TO PROVIDE STERELISATION OF CERTAIN PERSONS IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 8- महाराष्ट्र राज्यात विवक्षित व्यक्तींचे निर्बीजीकरण करण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 8 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आज अशासकीय (विचारार्थ) विधेयके घेतली जाणार नसून ती पुढील अधिवेशनात प्राधान्याने घेतली जातील.

**<u>नियम 93 अन्वयेच्या सुचनांवरील निवेदनाबाबत</u>**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 93 च्या सूचनांविरील निवेदनांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात मा. उपमुख्यमंत्री तसेच मा. संसदीय कामकाज मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आम्ही 93 च्या सूचना देत असतो परंतु त्यांची उत्तरे वेळच्या वेळी शासनाकडून येत नाहीत. या अधिवेशनात सत्ताधारी तसेच विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून अनेक महत्वाच्या विषयाच्या संदर्भात नियम 93 च्या सूचना देण्यात आल्या होत्या. आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस असतांनाही बऱ्याच 93 च्या सूचनांवरील निवेदने शासनाकडून प्राप्त इ ालेली नाहीत. नियम 93 च्या सूचनेवर तीन दिवसात शासनाकडून निवेदन आले यावयास पाहिजे असा नियम आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये नियम 93 च्या सूचनेस मान्यता देण्यात आली होती तथापि याबाबत शासनाकडून दखलही घेण्यात आलेली नाही. सन्माननीय सदस्य नियम 93 अन्वये महत्वाच्या विषयावर संसदीय आयुधाद्वारे चर्चा उपस्थित करुन न्याय मिळविण्याच्या प्रयत्न करीत असतात परंतु नियम 93 च्या निवेदनाच्या संदर्भात सदस्यांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. एका अर्थी सदस्यांच्या विशेष अधिकाराचा भंग झाला आहे. म्हणून विधान परिषदेच्या नियम 240 अन्वये ज्या ज्या विभागाच्या सचिवांनी नियम 93 च्या सूचनेवर या अधिवेशनात अद्याप निवेदने दिलेली नाहीत व ज्यांनी सभागृहात शेवटच्या दिवशी आयत्यावेळी निवेदने आणली अशा सर्व खात्याच्या सचिवांविरुद्ध मला हक्कभंग मांडण्याची अनुमती द्यावी अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. आयत्यावेळी जे काही घडते,जे प्रसंग घडतात त्यासंदर्भात सदस्य नियम 93 अन्वयेच्या सूचना देत असतात. नियम 93 च्या सूचना या मंत्र्यांच्या किंवा सरकारच्या विरोधात नसतात तर संपूर्ण वर्षभर

...8..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

खात्याच्या अधिकाऱ्यांनी जे काही काम केलेले असते त्याची खरे म्हणजे ही परीक्षा असते. आता शाळेमध्ये जसे ऑब्जेक्टीव्ह प्रश्न विचारले जातात तशा प्रकारे निवेदनांना होय किंवा नाही अशी उत्तरे विभागाकडून येत असतात. खात्याच्या मार्फत मंत्र्यांनी उत्तर दिले म्हणजे त्या त्या विभागाचा कारभार कसा सुरु आहे हे नियम 93 च्या सूचनेवरून समजून येत असते. तसेच आपल्या खात्यात कशा प्रकारचा कारभार चालू आहे याची माहिती मंत्र्यांनाही या निमित्ताने कळत असते. नियम 93 च्या सूचनेसंदर्भात माननीय सभापती महोदयांनी निदेश दिलेली असतांना सुध्दा त्यासंदर्भात विभागाकडून कार्यवाही होत नसेल तर ते योग्य नाही. मंत्र्यांना काही वेळा अडचणी येत असतात हे आम्ही समजू शकतो. परंतु अधिकाऱ्यांना अशा कोणत्या अडचणी येतात ? अधिकारी मंत्र्यांना सभागृहात तोंड घशी पाडतात ही फार गंभीर बाब आहे. त्यामुळे नियम 93 च्या सूचनांची निवेदने वेळेत सभागृहात यावीत यासाठी मी हा विषय उपस्थित केलेला आहे.

**सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने सभागृहाच्या माध्यमातून किंवा व्यक्तिगत सुध्दा सूचना देत असतो. मी पुढील काळात त्या त्या विभागाच्या सचिवांनी याबाबत गांभीर्याने नोंद घेणे गरजेचे आहेत. विधान परिषदेची नियम 93 अन्वयेच्या सूचनांची निवेदने ही पूर्णतया अंमलबजावणी करण्यासाठी असतात, त्यामुळे यादृष्टीने सचिवांनी लक्ष देणे गरजेचे आहे. विशेष हक्कभंगाच्या दृष्टीने माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व्यक्त केलेल्या भावनांची मी नोंद घेतली असून माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी देखील त्यांची नोंद घ्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय.

-----

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. :औचित्याचे मुद्दे**

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. .... : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. (यापुढे सन्माननीय सदस्यांचे भाषण द्यावे.)

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी**. : .....याबाबत श्री...... वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. () : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.(यानंतर परिच्छेद करावा.)

(येथे सन्माननीय सदस्यांनी दिलेली सूचना व भाषण द्यावे.)

**नियम 93 च्या सूचनेस अनुलक्षून निवेदन**

**पृ.शी./मु.शी**.: ........याबाबत सर्वश्री .......वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. ( मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक ......सभापगृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती/उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

... ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

**सभापती** : अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 24 एकूण काम - 180 तास
मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 30 मि.
गणपूर्ती नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 15 मि.
अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 2 तास 15 मि.
प्रत्यक्षात झालेले कामकाज - 177 तास
रोजचे सरासरी कामकाज - 7 तास 20 मिनिटे

<u>तारांकित प्रश्न</u>

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 4881, कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 4384
स्वीकृत प्रश्न 1913 सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न 189
उत्तरित झालेले अल्पसूचना प्रश्न - 2

<u>लक्षवेधी सूचना --</u>

प्राप्त झालेल्या सूचना -1287, मान्य झालेल्या सूचना 409, चर्चा झालेल्या सूचना - 87
विशेष उल्लेखाच्या 150 सूचना मांडण्यात आल्या.
<u>नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा</u> - प्राप्त झाल्या 13 , मान्य झाल्या 12 , चर्चा झाल्या 9
शासकीय विधेयके संमत- 10 ( परिषद 1 - सभा 9 )
नियम 260 अन्वये 5 प्रस्तावावर चर्चा झाली.
अशासकीय विधेयके प्राप्त झाले 7. स्वीकृत 7. विचारार्थ 4
अर्धा तास चर्चा - प्राप्त झाल्या 180, मान्य झाल्या 118, चर्चा झाल्या 10
अंतिम आठवडा प्रस्ताव - 1

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

"माननीय राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधान परिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 9 जुलै, 2012 रोजी, विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे.

-----

**पृ.शी./मु.शी.**: सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. आता मी सत्र-समाप्तीसंबंधीचा राज्यपालांचा आदेश वाचून दाखवितो.

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2) उपखंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी के.शंकरनारायणन्, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले. )

( सायंकाळी 6 वाजून 04 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

*******

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही